मु. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २४०

REFBK-0003030

पुरातन मराठी साधु कवि —

लेखक - गोविंद कृष्ण

REFBK-0003030

म. ग्रं. सं. ठाणें
विषय कादंबरी
सं. नं. २४०

## दोन शब्द

'मराठी साधुकवि' विरुद्ध प्रोफे. शि. म. परांजपे या मथळ्याखालीं 'गोविंदसुत' यांनीं १९१४ सालीं मुमुक्षूंतून जे लेख प्रसिद्ध केले ते स्पष्टतेसाठीं कमीजास्ती करून जशाचे तसे पुस्तकरूपानें आम्ही प्रसिद्ध करीत आहोंत. गोविंदसुत यांच्या लेखांचें हें चौथें पुस्तक आहे. मागील तीन पुस्तकांस प्रिय वाचकांनीं उदार आश्रय दिल्यावरून सर्व प्रति खपल्या. त्याप्रमाणें या पुस्तकासहि उदार आश्रय मिळेल अशी प्रकाशकास पूर्ण आशा आहे. कांहीं कारणानें प्रति थोड्याच काढल्या असल्यानें मागणीची त्वरा होईल तितकी बरी. या पुस्तकास कागद स्वदेशी वापरला आहे. नाइलाजामुळें कित्येक ठिकाणीं अक्षरें बरोबर वठलीं नाहींत व काना मात्रा ऱ्हस्व दीर्घ वगैरेचे बरेच मुद्रणदोष पुस्तकांत राहिलेले आहेत याबद्दल प्रिय वाचक क्षमा करतील व संदर्भावरून उद्दिष्ट अर्थ ध्यानांत आणून वाचक पुस्तक वाचतील अशी उमेद आहे. मलपृष्ठावर शेवटीं जाहिरात दिली आहे तिकडे वाचकांनीं अवश्य लक्ष द्यावें अशी विनंति आहे. महत्वाचे मुद्रणदोष आढळले त्यांबद्दल पुढें शुद्धिपत्र दिलें आहे त्याप्रमाणें प्रथम दुरुस्ती करून मग पुस्तक वाचण्यास आरंभ करावा अशी विनंति आहे.

आपला

मुक्काम अमळनेर
मकरसंक्रमण शके १८४७
ता. १४ । १ । १९२६

द. प. चिंचळकर.

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | १८ | सातवे | सात |
| ६ प्रस्तावना. | १४ | नाहीं ' अर्थात् | नाहीं ' हें प्रोफे. सा. चें मत अर्थात् |
| " | २१ | उतरणाऱ्या सर्व ग्रंथांवर | उतरणाऱ्या ग्रंथांवर |
| १ | १० | निरसें | निरसे |
| ७ | २३ | सव | सर्व |
| ९ | ७ | आवडी | आवडती |
| १० | १३ | सर्व | गर्व |
| ११ | ३ | शस्त्रव्याख्यात | शास्त्रव्याख्यान |
| १८ | २२ | नांवान | नांवानें |
| २२ | ७ | तराव्या | तेराव्या |
| २४ | १ | त्रिकोणी | त्रिवेणी |
| २५ | ५ | **श्रेयमुत्तमं** | **श्रेयउत्तमं** |
| ३५ | १७ | **अनुभवस्वरूपम्** | **अमृतस्वरूपम्** |
| ३९ | २३ | लागे सज्ञानापाठीं | न लगे अज्ञानापाठीं |
| ४३ | २१ | भिडून | भिनून |
| ५० | १३ | ज | जें |
| ५० | १४ | रडो | रेडा |
| ५२ | १० | ससुखं | सुसुखं |
| ५२ | २५ | हा | हीं |
| ५३ | १ | स्वप्नीसृष्टीला | स्वप्नसृष्टीला |
| ६९ | १३ | जी अद्याप | अद्याप |
| ७२ | १७ | वदावतारी | वेदावतारी |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3030

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

# प्रस्तावना.

आजकाल महाराष्ट्रांत बृहस्पतिवत् वक्ते व धुरंदर लेखक म्हणून जीं विद्वद्रत्नें चमकत आहेत त्यांतील प्रमुख पुण्यपत्तनस्थ सुप्रसिद्ध विद्वद्वर्य **प्रोफेसर शिवराम महादेव परांजपे** एम्. ए. यांनीं "**साहित्यसंग्रह भाग २**" या नांवानें आपले पूर्वीचे कांहीं लेख संग्रहित करून एक पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. त्यांतील पृष्ठ १२८ ते १३९ वर "**महाराष्ट्रांतील वेदांतपर ग्रंथ लिहिण्याच्या पद्धतीचें पर्यालोचन**" या मथळ्याखालीं एक लेख दिला आहे. त्यांत आमच्या अपसमजुती-प्रमाणें प्रोफेसर साहेबांनीं आपल्या विद्वत्तापूर्ण भाषेंतील वक्रोक्ति, व्याजोक्ति, व्यंग्योक्ति, दर्पोक्ति, अन्योक्ति, अतिशयोक्ति, इत्यादि उक्तींच्या व युक्तींच्या शरसंधानांनीं मराठी साधुकवि, त्यांचें साधुत्व, कवित्व, भक्ति त्यांची अविद्वत्ता यांवर खूपच मारा केला आहे! हा लेख प्रो० सा० नी प्रथम **चित्रमयजगत्** मासिकाच्या दिसेंबर १९१३ च्या अंकांत प्रसिद्ध केला होता. आणि आतां त्यांत त्यांनीं किंचित् व क्वचित फेर-फार करून तो जशाचा तसा प्रस्तुतच्या साहित्यसंग्रहात पुन्हा प्रसिद्ध केला आहे. तो आम्ही या ग्रंथाच्या शेवटीं समग्र दिला आहे. परंतु प्रिय वाचकांनीं तो प्रथम वाचून पहावा आणि नंतर **चित्रमयजगत्** मधील या लेखाचें खंडणमंडण आम्हीं **मुमुक्षु** वर्तमानपत्रांत तारिख १२ फेब्रुवारी १९१४ च्या अंकांत सुरू करून पुढील सातवे अंकांत पुरें केलें आहे. तो आमचा खंडणमंडणपर लेख, स्पष्टतेसाठीं किंचित् कमी जास्ता

दुरुस्ती करून जशाचा तसा या ग्रंथांत पुन्हा प्रसिद्ध केला आहे. तोहि वाचकांनीं लक्ष्यपूर्वक वाचावा, अशी विनंति आहे.

चित्रमयजगत् मधील प्रो. सा. च्या लेखाला व आमच्या टीकेला आज उणेंपुरें एक तप झालें. इतक्या अवधींत मराठी वेदांतपर ग्रंथा-संबंधानें प्रो. सा. चा झालेला पूर्वग्रह अद्याप कायम आहे, असें त्यांनीं आपला पूर्वीचा लेख पुन्हा पुस्तकरूपानें संग्रहित करून शिळया कढीला ऊत आणला, त्यावरून सिद्ध होत आहे. आमची पूर्वींची टीका प्रो. सा. च्या मताप्रमाणें अविद्वानानें अविद्वानांकरितां लिहिलेली असल्यामुळें त्यांनीं ती वाचलेली असणें शक्य नसून त्यांच्या ती कदाचित् नजरेस पडलीच असेल तर ती अविद्वानानें लिहिलेली समजून त्यांनीं दुर्लक्ष्य करणें स्वाभाविक आहे. कसेंहि असो, प्रो. सा. नीं आपला लेख पुन्हां प्रसिद्ध केल्यामुळें आम्हालाहि आपला लेख जनताजनार्दनापुढें मांडणें भाग आहे. प्रो. सा. चा लेख विद्वत्तापूर्ण असल्यामुळें तो आतुरतेनें सर्वांच्या वाचण्यांत अवश्य येईलच; पण त्याबरोबरच आमचाहि लेख वाचकांनीं कृपाकरून वाचून "हें चित्र आणि तें चित्र" पहावें. नंतर मराठी साधुकवींचे वादग्रस्त वेदांतपर ग्रंथहि वाचकांनीं कृपाकरून लक्ष्यपूर्वक वाचून पहावे. प्रो. सा. ना संमत असलेले संस्कृत वेदांतपर ग्रंथच त्यांच्याविरुद्ध कशी साक्ष देत आहेत, तें साधार आम्हीं दाखविलें आहे. ते आधारहि पूर्ण नजरेंत घालावे, मराठी साधुसंत व त्यांचे ग्रंथ, यांबद्दल प्रो. सा. चा झालेला ग्रह आणि वेदांतपर ग्रंथाकडे पाहण्याची त्यांची दृष्टि हीं यथायोग्य आहेत कीं काय तें समतोल बुद्धीनें व निर्विकार मनानें ठरवून योग्य तो न्याय द्यावा, अशी वाचकांना आमची विनंति आहे. आमचें म्हणणें एवढेंच आहे कीं, वेदांतपर ग्रंथ शास्त्रीय पद्धतीनें लिहिला असो, किंवा संवादात्मक पद्धतीनें लिहिला असो, त्यांतील सिद्धांत सशास्त्र व स्वानुभूतिपूर्वक, मुमुक्षूंना बोध होण्यासारखे अधिकारयुक्तवाणीनें लिहिले आहेत किंवा नाहीत, त्यांत अपसिद्धांत आहेत कीं काय, तें पाहून

त्यांत जर अपसिद्धांत असतील, स्वानुभव नसून नुसती तर्कप्रतिष्ठा, अनुमान, असेल, तर तो कितीहि मुद्देसूद, आटपसर, व्यवस्थित असला, तरी मुमुक्षूला तो निरुपयोगीच होय. न्यायमीमांसादि शास्त्रें ही वेदांतपर ग्रंथांची कसोटी नसून परमात्मपदाचा अनुभव ही मुख्य कसोटी आहे.

परमात्मवस्तूचा बोध करून देणारा, अनुभवभूमिकेवरून लिहिलेला कोणता वेदांतपर ग्रंथ नित्य पाठांत ठेवण्यायोग्य आहे, हें ठरविण्याचें काम मुमुक्षूंचें आहे. असें असतांना न्यायमीमांसादि शास्त्रीय कसोटीला वेदांतपर ग्रंथ लावून पाहण्याचा प्रो० सा० स मोह झाला यांत आश्चर्य कांहींच नाहीं. विद्वानांचा हा धर्मच आहे. भगवद्गीतेचें रहस्य प्रगट करण्यासाठीं श्रीज्ञानोबांचा अवतार; त्यांनीं गीतेचा रहस्यार्थ " **भावार्थदीपिका** " ऊर्फ **ज्ञानेश्वरी** " लिहून प्रसिद्ध केला. तो पुढें विद्वच्छिरोमणि वामनपंडितांच्या नजरेस पडला तेव्हां तो न्यायमीमांसादि तार्किक पद्धतीशीं जुळेना असें पाहून प्रो० सा० प्रमाणेंच त्या विद्वान् वामनाच्या मनाचा तिळपापड होऊन त्यानें लागलाच **यथार्थदीपिका** ग्रंथ लिहून त्यांत जागजागीं व्याजोक्तीनें व अन्योक्तीनें ज्ञानोबांची हजेरी घेऊन त्यांचा नक्षा उतरला आहे! ती विद्वत्ताप्रचुर यथार्थदीपिका प्रो० सा० ना पसंत असलीच पाहिजे. पण ती स्वानुभूतीच्या कसाला कितपत उतरते, तें आम्हांला तर सांगतां येणें शक्यच नाहीं. कारण आम्ही जसे विद्वान् नाहीं, तसे अनुभवीहि पण नाहीं. परंतु मुमुक्षूंच्या बाजारांत भाव पहावा तों वामनाच्या यथार्थदीपिकेपेक्षां ज्ञानोबांच्या भावार्थदीपिकेवरच विद्वान् व अविद्वान् सर्व मुमुक्षु गिऱ्हाइकांच्या उड्या फार!

पण याच्याहि कारणाचा शास्त्रीयदृष्ट्या प्रो० सा० नीं शोध लावला आहे. ते म्हणतात, " ज्ञानोबांच्या " काव्यीं गुण असो नसो " पण त्यांच्या भिंती चालवणें, रेडा बोलवणें, अशा प्रकारच्या ' साधुत्वा 'वरच ज्ञानोबारायांच्या ग्रंथांचा अशिक्षित समाजांत खप होतो " ! हें प्रो० सा० चें

तर्कशास्त्र खरें असलेंच पाहिजे. कारण, तें खोटें मानलें तर त्यांच्या प्रस्तुतच्या साहित्यसंग्रहावर सपटेंबर १९२५ च्या **विविधज्ञानविस्तारांत** त्या मासिकाच्या निस्पृह व विद्वान् संपादकांनीं जो यथार्थ अभिप्राय दिला आहे कीं, “ **कोणताहि मुद्दा नसतांना शून्यांतून शब्दसृष्टि निर्माण करण्याची शिवरामपंतांची हातोटी विलक्षण आहे !** ” तो अभिप्राय खोटा कसा होईल ? पण मराठी साधु व त्यांचे वेदांतपर ग्रंथ, यांची हुररेवडी करून संस्कृताचा अभिमान धारण करणाऱ्या प्रो. सा. स आमचा असा सवाल आहे कीं, ज्यांत तत्त्वज्ञान आणि भक्ति ओतप्रोत ओतली गेली आहे, असा सर्वोत्कृष्ट व सर्वमान्य उच्च भूमिकेवरील निर्दोष असा संस्कृत ग्रंथ जो भगवद्गीता, तो ग्रंथ तरी शास्त्रीय पद्धतीच्या दृष्टीनें प्रो. सा. च्या कसोटीस उतरतो काय ? तें त्यांनीं शपथेवर सांगावें आणि उतरत नसेल, तर मराठी साधुकवि, त्यांची भक्ति, विद्वत्ता, साधुपणा आणि कवित्व यांचेच प्रो. सा. नीं वाभाडे कां काढावे ?

वयाच्या सतराव्या वर्षापासून सर्व जन्म भगवद्गीतेच्या व्यासंगांत घालून ज्यांनीं गीतारहस्यासारखा आधुनिकदृष्ट्या सर्वोत्कृष्ट व सर्वमान्य ग्रंथ लिहून नव्या जुन्या सर्व विद्वानांना थक्क करून सोडिलें, ते कै. **लोकमान्य टिळक** हे वेदांतपर ग्रंथांचें विवरण कसें असतें व तदनुरूप भगवद्गीतेचें विवरण कशा प्रकारचें आहे, यासंबंधानें लिहितात:—

“ **कोणत्याहि विषयाचें निरूपण शास्त्रीय आणि पौराणिक किंवा संवादात्मक या दोन प्रकारांनीं करतात. भूमितिशास्त्र, न्यायशास्त्र, वेदांतसूत्रें, हीं शास्त्रीय पद्धतीचीं होत. भगवद्गीता ही सशास्त्र असली, तरी संवादात्मक निरूपणामुळें शास्त्रीय पद्धतीची रुक्षता जाऊन गीतेंत सौलभ्य व प्रेमळपणा भरला गेला आहे. व यामुळें शास्त्रीय पद्धतींतील हेत्वानुमानाची केवळ बुद्धिग्राह्य नीरस छकड सुटल्याचें कोणासहि काडीभर देखील वाईट वाटणार नाहीं व मीमांसकांच्या ग्रंथपरीक्षणाच्या सर्व कसोट्या तिला लावून गीतेचें तात्पर्य ठरविण्यास तिनें कांहींच**

ठा णे



पुरुषो वेद। आचार्याद्धैव विद्या।" (छांदोग्य. ६-८-३) "तद्विज्ञानार्थं सद्गुरुमेवाभिगच्छेत्। समित्पाणिःश्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्" वगैरे वाक्यें उपनिषदांतही आहेत. तसेंच गीताभाष्यांत आचार्य म्हणतात "असंप्रदायवित् सर्वशास्त्रविदपि मूर्खवदेवोपेक्षणीयः!"

मराठी साधुकवींच्या ग्रंथांत तुच्छता, फुशारकी, तिरस्कार, इत्यादि प्रो. सा. ना दिसतात. याचें कारण प्रो. सा. काव्यांतील शब्दार्थापलीकडे खोल जाऊन रहस्यार्थ पहात नसल्यानें त्यांच्या समजुतीचा घोंटाळा होतो! एरव्हीं मराठी साधुकवि आधुनिक विद्वानांप्रमाणें अर्ध्या हळकुंडानें पिंवळे होऊन फुशारकी मारणारे खचित नव्हते! ते वज्राहून कठिण, तितकेच मेणाहून मऊ होते! त्यांनीं "फावल्या त्या करूं चेष्टा। निश्चल द्रष्टा होऊनी"! म्हणून फुशारकी मारली, तरी ते पुन्हां "पायींची वहाण पायीं बरी" "बरवा कुणबी केलों। नाहीं तर दंभें असतों मेलों" असेंहि म्हणणारे होते! त्यांच्या वाणींतील व अंतरांतील रहस्य व स्वारस्य न्यायमीमांसादि तर्कशास्त्राला काय कळणार? "जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे"!

भक्तीचे प्रेमाश्रु, तुफानी वेग अशा प्रकारच्या शब्दांनीं प्रो. सा. नीं भक्तीची टवाळी केली आहे. तें गौणभक्तीचें लक्षण होय. मात्र तें ढोंग नसून खऱ्या भक्तीचें पूर्वचिन्ह आहे. आत्मबोधानंतरची खरी भक्ति, जिला पराभक्ति, ज्ञानोत्तरभक्ति, आत्मनिवेदनीभक्ति, तात्त्विकभक्ति म्हणतात, ती उच्चकोटी होय. "स्वस्वरूपानुसंधानं भक्तिरित्यभिधीयते" या श्रीमच्छंकराचार्यांनीं दिलेल्या खऱ्या भक्तीच्या व्याख्येच्या भक्तिमार्गाला प्रो. सा. लागतील तेव्हांच तिची लज्जत त्यांना कळून येईल!

प्रो. सा. ची राश मीन असून आमचीहि तीच आहे. राश ही चंद्रावरून असून चंद्र ही मनाची देवता आहे. म्हणून आमची ही टीका विद्वान प्रो. सा. नां पसंत पडणार नाहीं, हें मनोमनसाक्ष आम्हांस माहीत आहे असें असतांना आमची ही टीका पुन्हां ग्रंथरूपानें

प्रसिद्ध करण्याचें कारण, आजकाल सभा, मंडळें स्थापून, संमेलनें भरवून जिकडे तिकडे वाङ्मयचर्चा चालली आहे. प्राचीन व आधुनिक कवींचीं काव्येंहि कसाला लावून पाहिलीं जात आहेत, अशा प्रसंगीं ज्या मराठी साधुकवींच्या वेदांतपर ग्रंथाला प्रो. सा. नाकें मुरडीत आहेत व गचाळ म्हणून केराची टोपली दाखवीत आहेत, ते ग्रंथ इतर विद्वानांच्या कसोटीला कसेकाय उतरतात, त्यांच्या भाषेला व मांडणीला कोणता कस विद्वानांकडून लागतो, अनुभवाच्या कसोटीला हे ग्रंथ कसे उतरतात, हें कौतुकानें पहावें, तसेच जे कमी कमी दर्जाचे साधुकवि व त्यांचीं गचाळ काव्यें प्रो. सा. नीं गुलदस्तांत ठेविलीं आहेत, त्यांचाहि स्फोट कोणी विद्वान् करतात कीं नाहीं, हें पहावें, हाहि यांत मुख्य हेतु आहे.

प्रो. सा. व आम्ही यांच्यामधील विद्वान्, अविद्वानाचा झगडा म्हणजे तांब्याचें भांडें व मडकें यांच्यामधील हा झगडा असून मातीचें भांडें फुटणार हें दिसतेंच आहे. पण हें धर्मयुद्ध असून प्रवाहपतित कार्य असल्यानें करणें भाग आहे. शिवाय प्रो. सा. चें आमच्यावर प्रेम असल्यामुळें हा झगडा असला, तरी प्रेमाचा झगडा आहे! कृष्णार्जुनामध्येंहि झगडा झाला होता मग आमची ती कथा काय? हें अनिवार्य आहे. प्रो. सा. म्हणतील तें ब्रह्मवाक्य समजून आम्ही तें झेलावें एवढीच आमची योग्यता असतां आम्हीं हा पायरीला पाय लावला याबद्दल प्रो. सा. नीं आम्हाला क्षमा करावी, अशी त्यांना आमची विनंति आहे.

शेवटीं ज्या परमेश्वरानें ही स्फूर्ति दिली त्याच्या चरणीं अनन्य होऊन वाचकांची रजा घेऊन अंतर्धान पावतों.

ॐ तत् सत्!!

मु. अमळनेर,<br>
मिती मार्गशीर्ष वद्य ५<br>
शके १८४७ ता. ५।१२।२५

आपला सर्वांचा<br>
संतदासानुदास<br>
"गोविंदसुत"

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे,

श्री सद्‌गुरवेनमः

# मराठी साधु कवि

विरुद्ध

# प्रोफेसर शिवराम महादेव परांजपे एम्. ए.

लेखकः—गोविंदसुत

जेणें ज्ञान हें प्रबळे । जेणें वृत्ति हे मावळे ।
जेणें भक्तिमार्ग कळे । या नांव कवित्व ४९
जेणें देहबुद्धि तुटे । जेणें भवसिंधु आटे ।
जेणें भगवंत प्रगटे । या नांव कवित्व ५०
जेणें सद्वस्तु भासे । जेणें भास हा निरसें ।
जेणें भिन्नत्व नासे । या नांव कवित्व ५२
जेणें होय समाधान । जेणें तुटे संसारबंधन ।
जया मानिती सज्जन । तया नांव कवित्व ५३

( दास. १४–३ )

सुप्रसिद्ध विद्वद्वर्य प्रोफेसर **शिवराम महादेव परांजपे** एम्. ए. माजी काळकर्ते यांनीं महाराष्ट्रांतील एकंदर वेदांतग्रंथ लिहिण्याच्या पद्धतींचें पर्यालोचन करून विद्वत्ताप्रचुर चुरचुरित लिहिलेला एक लेख गेल्या डिसेंबर १९१३ च्या **चित्रमय जगत्** मासिकांत प्रसिद्ध झाला आहे. त्यांत प्रो. साहेबांनीं न्यायमीमांसादि शास्त्रीय पायावर वेदांत ग्रंथाची इमारत कशी रचावी,

प्रसिद्ध करण्याचें कारण, आजकाल सभा, मंडळें स्थापून, संमेलनें भरवून जिकडे तिकडे वाङ्मयचर्चा चालली आहे. प्राचीन व आधुनिक कवींचीं काव्येंहि कसाला लावून पाहिलीं जात आहेत, अशा प्रसंगीं ज्या मराठी साधुकवींच्या वेदांतपर ग्रंथाला प्रो. सा नाकें मुरडीत आहेत व गचाळ म्हणून केराची टोपली दाखवीत आहेत, ते ग्रंथ इतर विद्वानांच्या कसोटीला कसेकाय उतरतात, त्यांच्या भाषेला व मांडणीला कोणता कस विद्वानांकडून लागतो, अनुभवाच्या कसोटीला हे ग्रंथ कसे उतरतात, हें कौतुकानें पहावें, तसेच जे कमी कमी दर्जाचे साधुकवि व त्यांचीं गचाळ काव्यें प्रो. सा. नीं गुलदस्तांत ठेविलीं आहेत, त्यांचाहि स्फोट कोणी विद्वान् करतात कीं नाहीं, हें पहावें, हाहि यांत मुख्य हेतु आहे.

प्रो. सा. व आम्ही यांच्यामधील विद्वान्, अविद्वानाचा झगडा म्हणजे तांब्याचें भांडें व मडकें यांच्यामधील हा झगडा असून मातीचें भांडें फुटणार हें दिसतेंच आहे. पण हें धर्मयुद्ध असून प्रवाहपतित कार्य असल्यानें करणें भाग आहे. शिवाय प्रो. सा. चें आमच्यावर प्रेम असल्यामुळें हा झगडा असला, तरी प्रेमाचा झगडा आहे! कृष्णार्जुनामध्येंहि झगडा झाला होता मग आमची ती कथा काय? हें अनिवार्य आहे. प्रो. सा. म्हणतील तें ब्रह्मवाक्य समजून आम्ही तें झेलावें एवढाच आमची योग्यता असतां आम्हीं हा पायरीला पाय लावला याबद्दल प्रो. सा. नीं आम्हाला क्षमा करावी, अशी त्यांना आमची विनंति आहे.

शेवटीं ज्या परमेश्वरानें ही स्फूर्ति दिली त्याच्या चरणीं अनन्य होऊन वाचकांची रजा घेऊन अंतर्धान पावतों.

ॐ तत् सत्!!

मु. अमळनेर,
मिती मार्गशीर्ष वद्य ५
शके १८४७ ता. ५।१२।२५

आपला रावांचा
संतदासानुदास
"गोविंदसुत"

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ......
ठाणे,

मराठी ग्रंथ संग्रहालय नं. ७२
ना. ......
ठाणे.

श्री सद्गुरवेनमः

# मराठी साधु कवि

विरुद्ध

# प्रोफेसर शिवराम महादेव परांजपे एम्. ए.

लेखकः—गोविंदसुत

जेणें ज्ञान हें प्रबळे । जेणें वृत्ति हे मावळे ।
जेणें भक्तिमार्ग कळे । या नांव कवित्व ४९
जेणें देहबुद्धि तुटे । जेणें भवसिंधु आटे ।
जेणें भगवंत प्रगटे । या नांव कवित्व ५०
जेणें सद्वस्तु भासे । जेणें भास हा निरसे ।
जेणें भिन्नत्व नासे । या नांव कवित्व ५२
जेणें होय समाधान । जेणें तुटे संसारबंधन ।
जया मानिती सज्जन । तया नांव कवित्व ५३

( दास. १४–३ )

सुप्रसिद्ध विद्वद्वर्य प्रोफेसर **शिवराम महादेव परांजपे** एम्. ए. माजी काळकर्ते यांनीं महाराष्ट्रांतील एकंदर वेदांतग्रंथ लिहिण्याच्या पद्धतींचें पर्यालोचन करून विद्वत्ताप्रचुर चुरचुरित लिहिलेला एक लेख गेल्या डिसेंबर १९१३ च्या **चित्रमय जगत्** मासिकांत प्रसिद्ध झाला आहे. त्यांत प्रो. साहेबांनीं न्यायमीमांसादि शास्त्रीय पायावर वेदांत ग्रंथाची इमारत कशी रचावी,

हें उत्कृष्टरीतीनें प्रतिपादन केलें आहे. त्याबद्दल त्यांचे आभार मानणें अवश्य आहे. परंतु या विद्वत्तापूर्ण पण असंबद्ध लेखानें पुष्कळ वाचकांचा बराच गैरसमज होण्याचा संभव आहे. आणि तारीख ५ जानेवारी १९१४ च्या इंदुप्रकाशांत या लेखाविरुद्ध इंग्रजींत जो टीकात्मक लेख आला आहे, त्यावरून तर आमचें अनुमान खरेंच ठरतें. प्रो. सा. नीं मराठी साधुकवींबद्दल काहीं विचित्र विधानें करून या सुंदर लेखाला गालबोट लावलें आहे, असा इंदुप्रकाशांतील लेखाचा भावार्थ आहे, तो यथार्थ आहे. तरी पण एकंदरींत शास्त्रीय पद्धतीनें वेदांतपर ग्रंथांची मांडणी कशी असावी, याबद्दलची प्रो. सा. ची विचारसरणी यथायोग्य आहे. यामुळें त्यांच्या लेखांतील विचित्र विधानें चुकीचीं, खोटीं, असंबद्ध आहेत कीं काय, याची फारशी चिकित्सा करण्याचें आपल्याला कारण नाहीं. कारण, इसापनीतींतील कोल्ह्या कुत्र्यांच्या गोष्टी खोट्या असल्या, तरी त्यांतील सार तेवढेंच आपण घेतों. स्त्रीपासून आपल्यास सुख होतें, यामुळें तिच्या हाडामांसाच्या देहांतील घाणीची काहीं आपण मांसमीमांसा करीत बसत नाहीं. हेंच मीमांसाशास्त्र येथें लावून आपण गुण तेवढा घेतला पाहिजे. शिवाय प्रो. सा. नीं खोटीं विधानें केलीं असलीं, तरी तीं करतांना विवक्षित व्यक्तींचें नांव घेऊन त्यांच्या कुशीला बोट लावलेलें नाहीं. हेंहि लक्ष्यांत आणिलें पाहिजे.

प्रो. परांजपे विद्वान्, चौकस, शोधक आहेत. ते अळबंळित गळबाळित नसून पक्के आहेत. चिकित्सक व बारकाईनें शोध करणारे आहेत. ते मार्मिक व खोंचदार असून विनोदीहि पण आहेत. त्यांचें स्वदेहावर, तसें स्वदेशावर प्रेम असून अलीकडे तर त्यांचें देवावरहि श्रद्धेच्या द्वारें प्रेम

जडत चाललें आहे. असें **चित्रमय जगत्** च्या गेल्याच अंकांत त्यांनीं श्रद्धेवर एक लेख लिहिला आहे, त्यावरून म्हणावें लागतें. आपल्या प्राचीन विद्यांचा आपल्याला अभिमान असल्याचेंहि ते दाखवीत असतात. टीकाविषयक वक्तृत्वांत व लेखांत तर त्यांचा हातखंडा आहे. अशा गुणालंकरणमंडित पंडिताच्या हातानें लिहिलेल्या **चित्रमय जगत्** मधील उपरिनिर्दिष्ट लेखांत विद्वत्तादि गुणांचें चित्र उमटेल यांत नवल काय ! पण कित्येक अविद्वान् भाविकांना मात्र मराठी साधुकवींबद्दलची प्रो. सा. ची अश्रद्धा पाहून आश्चर्य वाटेल. कित्येकांना तर हा विद्वत्ताप्रचुर लेख, पण त्यांत किंचित्, क्वचित्, फारसे, इत्यादि मख्खीबाज शब्दांचा उपयोग करून तोंड नसलेल्या चक्राकार भाकरी प्रमाणें एकभर नसलेल्या या गरगरीत वाटोळ्या लेखाचें विंचरून व पृथक्करण करून तात्पर्य काढण्याला कठिण पडतें. पण बोलून चालून विद्वान् प्रो. सा. नीं विद्वानांकरतांच हा लेख लिहिला असल्यामुळें त्याबद्दल अविद्वानांनीं कुरकुर करण्याचें कारण नाहीं !

कित्येकांना तर श्रीज्ञानेश्वर, एकनाथ, मुकुंदराज, रामदास, रंगनाथ, इत्यादि साधुसंतांचें अनुभवभूमिकेवरून लिहिलेले अप्रतिम ग्रंथ प्रो. सा. नीं संपूर्ण वाचले तरी आहेत कीं नाहींत, याचीच शंका येते ! पण ही शंका येणें म्हणजे तर्कशास्त्रांत आपण अगदीं अपरिचित आहोंत याचें प्रदर्शन करणें होय. कारण " **पूर्ण ग्रंथ पाहिल्या वीण । उगाच ठेवूं नये दूषण ।** " ( दास. १-१-२५ ) असा समर्थांनीं शिष्टाचार सांगितला आहे. प्रो. सा. नीं बिनादिक्कत नि-

भोंडपणानें आवेशयुक्तवाणीनें मराठी साधुकवींविरुद्ध जो ठांसून ठसठशीत अभिप्राय दिला आहे, तो त्यांनीं मराठी साधुकवींचे समग्र ग्रंथ उलथे पालथे केल्याशिवाय का दिला असेल? आतां हजारों महाराष्ट्रीयांस जे ग्रंथ तन्मय करतात, ते एकट्या प्रो. सा. सच कां बरें आनंद देत नाहींत? याचें कारण प्रो. सा. च्या मतें लोकांची अज्ञानपूर्वक अंधश्रद्धा आणि प्रो. सा. ची कुशाग्रतोत्पादक चिकित्सक बुद्धि या शिवाय दुसरें काय असणार?

कसेंहि असलें तरी प्रो. सा. च्या अणकुचीदार व गोलची दार कमावलेल्या भाषेच्या द्वारें निघालेल्या अपूर्व लेखांत न्यायमीमांसातर्क इत्यादि शास्त्रीयपद्धतीला शोभतील अशींच विधानें आलीं असल्यानें हा लेख विद्वानांचें मन आकर्षण करून घेतो, यांत संशय नाहीं. परंतु त्यांतील कित्येक अपूर्व विधानांबद्दल शंका आहेत. त्या प्रो. सा. पुढें नम्रतेनें मांडाव्या, आणि लेखांतील जो भाग त्यांचा गौरव करण्यासारखा आहे. त्याबद्दल त्यांचा गौरव करावा, तसेंच प्रो. सा. च्या लेखाला दुसरीहि बाजू आहे ती यथामति पुढें मांडावी, म्हणून **चित्रमय जगत्** मधील त्या लेखाचें आपण आतां यथामति निरीक्षण करूं या.

आपण येथें कां आलों, जावयाचें कोठें, आपल्या जीवनाचें खरें ध्येय कोणतें, याचें यथार्थ ज्ञान वेदांतानें होतें, व त्यावरच आपले इहपरलोकचे व्यवहार अवलंबून असल्यामुळें आपल्यास वेदांताची फार आवश्यकता आहे. असें सांगून प्रो. सा. नीं लेखाला सूतउवाच केलें आहे. ही प्रो. सा. ची विचारसरणी निःसंशय

यथार्थ आहे. नरदेहाला येऊन आत्मानात्म, सारासार विचारानें वेदांती हा जगाच्या पलीकडील परमात्मतत्त्वाचा शोध करून तद्रूपतेनें सुखदुःखात्मक जगाहून वेगळा होतो, तो मोक्ष हेंच वेदांताचें रहस्य होय. हल्लींच्या निराशाजनक परिस्थितींत प्रो. सा. सारख्या आधुनिक विद्वानांना अशारीतीनें वेदांताची आवश्यकता भासूं लागली, हें सुचिन्हच होय ! आजकाल संभावितपणा जसा " **विडी पगडी छडी घेरा । हां संभावित लक्षणें** " ! या अनुष्टुपांत येउन बसला असून पगडी ऐवजीं टोपी व घेऱ्या ऐवजीं चेहरा अशी दुरुस्ती करण्याचा प्रसंग आला आहे, त्याप्रमाणें आजकालची विद्वत्ता, ही नाटकें, कादंबऱ्या, विनोदी लेख लिहिणें, वेदांतपर ग्रंथांची टवाळी करणें, इत्यादि कामांत गुंतली आहे. त्या विद्वत्तेला प्रो. सा. वेदांताची गोडी लावूं पहात आहेत, ही फार आनंदाची गोष्ट होय !

यानंतर वेदांतावर ग्रंथ लिहिण्यापूर्वी ग्रंथांत कोणते विषय कोणत्या क्रमानें आणून कोणत्या अंतिमध्येयांत ग्रंथकारानें त्याची इतिश्री करावी, याची आंखणी करून ती अनुबंधचतुष्टयाच्या चौकटींत बसवून नंतर ग्रंथाला आरंभ कसा करावा, वेदांतप्रतिपादनाची पद्धत कशी असावी, याचें प्रो. सा. नीं केवळ शास्त्रीय दृष्ट्या विवरण करून अशा प्रकारचा अभिनंदनीय व अनुकरणीय ग्रंथ * श्रीयुत बाबा गर्दे यांचा युक्लीडच्या सिद्धांताच्या

* टीपः-श्री. बाबा गर्दे यांच्या ग्रंथाचा उल्लेख चित्रमय जगत् मधील लेखांत आहे. तो साहित्यसंग्रहांत केला नाहीं

पद्धतीवर रचलेला वेदांतग्रंथ उत्कृष्ट म्हणून प्रो. सा. नीं पुढें केला आहे. आणि गहन व दुर्बोध वेदांत उकलण्याला जर कांहीं मार्ग असेल, तर तो अशा प्रकारच्या स्पष्ट व्याख्या दिल्यानेंच उकलणार आहे, असें प्रो. सा. ठांसून सांगत आहेत. पण आम्ही म्हणतों कीं, ग्रंथकर्तृत्वाकडे केवळ कला या दृष्टानेंच पहावयाचें असेल, तर न्यायमीमांसादि शास्त्रीय पद्धतीनें पहाणें ठीक आहे. पण वेदांत हा वक्तृत्वबाजीनें किंवा लेखनचातुर्यानें मनोरंजन करून दाखवण्याचा व नुसत्या व्याख्या देऊनहि कळणारा विषयच नव्हे. ग्रंथ वाचून मुमुक्षूचें परमात्मवस्तूशीं तादात्म्य होऊन तो तल्लीन होईल, अशा स्वानुभूतीच्या भूमिकेवरून तो ग्रंथ लिहिला आहे किंवा नाहीं, या कसोटीनें वेदांतपर ग्रंथाकडे पहावयाचें आहे. त्यांतल्यात्यांत न्यायमीमांसादि शास्त्रीय पद्धतीच्या चौकटींत तो बसेल तर उत्तमच आहे. पण शास्त्रीय पद्धतीची उभारणी हें वेदांतपर ग्रंथाचें मुख्य अंग नव्हे. वेदांतपर ग्रंथांत स्वानुभूतीचें तेज उतरण्याला भगवत्कृपेचा प्रसाद व्हावा लागतो. न्याय, मीमांसा, तर्क लागत नाहीं.

" **देवाचेनि प्रसन्नपणें । जेंजें घडे बोलणें । तेंतें अत्यंत श्लाघ्यवाणें । या नांव प्रासादिक " भक्तीवीण अनुवाद, तो विनोद होय** " (दास. १४-३-६) परमात्मतत्त्व सांगण्याला जेथें वेद मुके झाले, श्रुति हरपल्या, तेथें न्यायमीमांसादि शास्त्रीय पद्धतीनें केलेल्या व्याख्या काय सांगणार ? पण प्रो. सा. तर छातीला हात लावून सांगतात कीं, " दुर्बोध व गहन वेदांत उकलण्याला जर कांहीं मार्ग असेल, तर तो प्रत्येक गोष्टीच्या

स्पष्ट व्याख्या दिल्यानेंच उकलणार आहे. दुसरा मार्ग नाहीं " अशा प्रकारच्या स्पष्ट व्याख्या दिल्यानें दुर्बोध व गहन परमात्मतत्त्व उकलत असेल व न्यायमीमांसादि शास्त्रीय पद्धतीच्या अवलंबनानें मर्यादित, व्यवस्थित आणि आटपसर झालेले वेदांतपर ग्रंथ व श्री. बाबा गर्दे यांचा अभिनंदनीय व अनुकरणीय युक्लीड वाचून प्रो. सा. च्या अतःकरणांत जर परमात्मतत्त्वाचा उजेड पडला असेल, व इहपर लोकचा व्यवहार त्यांना ठाम करतां येऊं लागला असेल, तर प्रो. सा. नीं आतां लोकांना अनुग्रह करण्याला व अशा प्रकारच्या शास्त्रीय पद्धतीनें गहन व दुर्बोध विषयांच्या स्पष्ट व्याख्या देऊन ग्रथ लिहिण्याचें मनावर घेऊन जगदुद्धाराचें श्रेय घ्यावें अशी त्यांना आमची आग्रहाची पण प्रेमाची आणि नम्रतेची विनंति आहे. 'जें जपतपादि कोणत्याही मार्गानें प्राप्त न होतां केवळ सत्समागम हाच त्याला रामबाण उपाय आहे,' असें सर्व संत व वेदांतपर ग्रंथ सांगत असून सत्समागम आजकाल दुर्लभ झाला आहे, अशा प्रसंगीं परमात्मतत्त्व स्पष्ट व्याख्या देऊन उकलतें या प्रो. सा. च्या अपूर्व शोधाबद्दल त्यांचे आभार मानणें अवश्य आहे !

परमात्म्याच्या बोधांत रंगलेल्या स्वात्मानुभवी मराठी संतांच्या या अप्रतिम ग्रंथांवर प्रो. सा. नीं या नंतर न्यायमीमांसादि शास्त्रांचा शस्त्रप्रयोग करून विद्वानांनीं विद्वानांकरितां, विद्वानांनीं अविद्वानांकरितां आणि अविद्वानांनीं अविद्वानांकरितां लिहिलेले, असे सव वेदांतपर ग्रंथांचे ताडकन तीन तुकडे करून टाकले आहेत ! यां पैकी विद्वानांनीं केलेले ते संस्कृत व त्यांचे कर्ते महान् पंडीत असून

त्यांनीं नियमित पद्धतीचा अंगीकार करणाऱ्या न्यायमीमांसादि शास्त्रांचा अवलंब केल्यामुळें त्यांचे ग्रंथ प्रो. सा. म्हणतात, मुद्देसूद, व्यवस्थित, आटपसर, झाले आहेत. जणुकाय मुद्देसूद, व्यवस्थित आटपसरपणा, आणि विद्वत्ता यांतच वेदांताचें प्राण आणि अनुभव भरला असून जेवढे विद्वान् तेवढे सर्व वेदांततत्त्वानुभवीच म्हटले पाहिजेत! पण हे पंडीत विद्वान् फारसे भक्त नव्हते असेंहि प्रो. सा. म्हणतात. तर मग भक्तीवांचून या विद्वानांना परमात्मतत्त्वाचा बोध कसा झाला, आणि स्वानुभूतीचे वेदांतपर आटपसर, व्यवस्थित, मुद्देसूद ग्रंथ त्यांनीं कसे लिहिले, हें एक गूढच आहे! आत्मनिवेदनी भक्तीवांचून परमात्मदर्शन होणें शक्य नाहीं व त्या वांचून वेदांतपर, ग्रंथ लिहिण्याला विद्वान् अधिकारीच होत नाहीं. मग या पंडितांचे ग्रंथ सर्वोत्कृष्ट कसे वठले? याचा स्पष्ट खुलासा प्रो. सा. नीं करावयास पाहिजे होता. याच्या उलट अविद्वानांनीं लिहिलेले ग्रंथ प्रो. सा. म्हणतात, बोलून चालून प्रतिज्ञापूर्वक स्त्रीशूद्रादि अल्पबुद्धीच्या लोकांकरितां असल्यामुळें कित्येकांच्या हातून संस्कृत भाषेचा उपमर्द व अगौरव झाला! व त्यामुळें संस्कृत भाषेला गौणत्व येऊन संस्कृत वाणीचे प्रो. सा. म्हणतात, गुणहि लोपले! इतकेंच नव्हे, तर या मराठी साधुकवींनीं संस्कृत ग्रंथनिर्मितीच्या मित्रांबद्दल तुच्छता, तिरस्कार, मोठ्या फुशारकीनें व्यक्त केला! असें प्रो. सा. बिनदिक्कत सांगत आहेत! प्रो. सा. हे जात्या विद्वान् असल्यामुळें संस्कृत आणि मराठी वेदांतपर ग्रंथांचें हें जें पर्यालोचन त्यांनीं केलें, तें परमात्मस्वरूपाच्या स्वानु-

भूतीच्या कसोटीनें केलें नसून केवळ न्यायमीमांसादि शास्त्रीय पद्धतीच्याच कसोटीनें केलें तेंहि योग्यच होय. कारण:—

" कवींस पाहिजे प्रबंध । तार्किकांस पाहिजे तर्कवाद ।
भाविकांस संवाद । गोड वाटे ४४

पंडितांस पाहिजे व्युत्पत्ति । विद्वानांस अध्ययनप्रीति ।
कलावंतां आवडी । नाना कळा ४५

( दास. ७–९ )

असा न्याय आहे. याच्याच बरोवर ' टवाळास आवडे विनोद ' ( ७--९--५१ ) असेंहि समर्थ उद्गारले आहेत ! एखाद्या मोत्यांच्या हाराकडे कारागीर हा कारागिरीच्या दृष्टीनें, श्रीमान् हौसेच्या दृष्टीनें, व्यापारी नफ्याच्या दृष्टीनें, विरक्त त्यागाच्या दृष्टीनें पहातो, त्याप्रमाणें प्रो. सा. सारखे विद्वान् हे वेदांताकडे केवळ विद्वत्तेच्याच दृष्टीनें पाहून न्यायमीमांसादि शास्त्रीय चौकटींत ग्रंथ कसा बसतो, एवढेंच पहाणार हें उघड आहे. म्हणून स्वात्मानुभवी सज्जनांच्या कसोटीला जर हे ग्रंथ उतरले आहेत, तर प्रो. सा. नीं नांवें ठेवल्याबद्दल आपल्यास वाईट वाटण्याचें कारण नाहीं. मात्र संस्कृताचा उपमर्द केला वगैरे जे मराठी साधुकवींवर प्रो. सा. नीं वृथा आरोप केले आहेत, त्याबद्दल त्यांनीं एखादें तरी उदाहरण दिलें असतें तर त्यांच्या म्हणण्यांत काहीं तरी सत्यता आहे असें कोणालाहि वाटलें असतें. असा भयंकर आरोप करतांना

तो उदाहरणांनीं सिद्ध करावा लागतो, हें प्रो. सा. नां आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. अशीं स्थळें जितकें मराठी साधूंचे वेदांतपर ग्रंथ लोकांच्या नित्याच्या पाठांत आहेत त्यांत तरी कोठें दिसत नाहींत. इतकेंच नव्हे तर उलट श्रीज्ञानोबा, रामदास, एकनाथ, यांनीं तर संस्कृताचा मान कायम ठेवून मराठीचा गौरव केला आहे. अशीं स्थळें आम्हांला दाखवतांही येतील. पण प्रो. सा. आपला पुरावा गुलदस्तांत ठेवतात, मग आपण तरी तोंडची वाफ कां दवडा? या पुढें प्रो. सा. म्हणतात, "या मराठी साधु-कवींनीं वेदाध्ययनापासून थेट शास्त्राध्ययनापर्यंत सर्व निरुप-योगी आहे असें एक प्रकारच्या आवेशांत विधान के-ल्याचीं स्थळें थोडी थोडकी नाहींत" पण "**नको शास्त्र अभ्यास व्युत्पत्ति मोठी। जडे सर्व ताठा अभीमान पोटीं**" (समर्थ) हें सांगावयाला प्रथम मराठी साधुकवींनींच आरंभ केला असें नाहीं. हें लोण संस्कृतांतूनच मराठींत आलें आहे!

"**त्रैगुण्यविषयावेदाः निस्त्रैगुण्योभवार्जुन**" (गी. २-४५) **न वेदयज्ञाध्ययनैर्न दानैः। नचक्रियाभिर्न तपोभिरुग्रैः**' (गी. ११-४८) हें तर भगवानच बोलले आहेत.

आचार्य म्हणतातः—

वदंतु शास्त्राणि यजंतु देवान्। कुर्वंतु कर्माणि भजंतु देवताः।
आत्मैक्यबोधेन विनापि मुक्ति--। नं सिद्ध्यति ब्रह्मशतांतरेऽपि ६

न योगेन न सांख्येन कर्मणा नो न विद्यया ।
ब्रह्मात्मैकत्वबोधेन मोक्षः सिद्ध्यति नान्यथा ५८

वाग्वैखरी शब्दझरी शस्त्रव्याख्यातकौशलम् ।
वैदुष्यं विदुषां तद्वत् भुक्तये न तु मुक्तये ६०

( विवेकचूडामणि. )

प्रो. सा. म्हणतात, " अशा प्रकारचीं विधानें मराठी साधुकवींनीं वेदांताच्या एका विशिष्ट आणि श्रेष्ठ भूमिकेवर व-सून केलीं; पण त्याचा व्यवहारावर व वाङ्मयावर परिणाम झाला, हा विद्यादेवीचा उघड उघड अनादर आणि उपमर्द मराठी साधुकवींनीं केला ! त्याचा परिणाम त्यांच्या ग्रंथांवर दिसून येतो ! " यावरून वेदांताच्या श्रेष्ठ भूमिकेवरून केलेल्या वि-धानांनीं विद्यादेवीचा अनादर आणि उपमर्द उघड उघड होतो, हें एक नवीनच आश्चर्य होय ! या वेदांताच्या श्रेष्ठ भूमि-केवरील विधानांनीं व्यवहारावर आणि वाङ्मयावर चांगला का वाईट परिणाम झाला, हें प्रो. सा. कांहींच सांगत नाहींत ! तसेंच त्यांच्या म्हणजे कोणाच्या ग्रंथांवर काय परिणाम झाला, तेंहि प्रो. सा. च्या या मुग्ध लिहिण्यानें स्पष्ट होत नाहीं ! पण वेदांताच्या श्रेष्ठ भूमिकेवरील विधानें श्रेष्ठच असलीं पाहिजेत. त्या श्रेष्ठ विधानांनीं व्यवहारावर व वाङ्मया-वर चांगलाच परिणाम झाला पाहिजे त्याबद्दल दोष देणें म्हणजे मेघांच्या वृष्टीनें दुष्टांचेंहि पोषण होतें म्हणून मेघाला दोष देण्याप्रमाणेंच हें हास्यास्पद नव्हे काय? सत्यवि-धानाला भाडभीड कशाची ? पण वेदांचा, शास्त्रांचा, विद्यादेवीचा उपमर्द आणि निषेध करण्याच्या कामांत मराठी साधूंपेक्षांही

श्रीरामचंद्रप्रभूंना उपदेश करणारे श्रीवसिष्ठमुनी तर फारच पुढें गेले आहेत. ते म्हणतात:—

> भ्रमेणाहं भ्रमेणत्वं भ्रमेणोपासकाजनाः ।
> भ्रमेणेश्वरभावत्वं भ्रममूलमिदंजगत् "। (योगवासिष्ठ)

पण ही वेदांतशास्त्राची चूक नसून व्यतिरेकदृष्टीनें जेव्हां सर्व बाधित करावें लागतें, तेव्हां या सर्वांचा वेदांताच्या श्रेष्ठ भूमिकेवर बसून असाच निपटून निषेध करावा लागतो, तरच निःसंग, निर्गुण तत्त्वाचा मुमुक्षूला बोध होतो, हें प्रो. सा. ना माहीत नाहीं, असें दिसतें. नाहीं तर ते इतके घसरले नसते! मराठी साधुकवि वेदशास्त्राचा अनादर आणि उपमर्द करणारे नाहींत हें प्रो. सा. नीं लक्षांत ठेवावें वेदशास्त्रांचा व वेदांताचा उपमर्द आणि अनादर उघड उघड करणारे व अविश्वास मानणारे यांचा भरणा प्रो. सा. च्या वर्गांतील अज्ञेय, दुर्ज्ञेय, स्वभाववादी, तर्कप्रतिष्ठित आधुनिक विद्वानांतच फार आहे!

अध्यात्मविद्या ही सर्व विद्यांहून श्रेष्ठ आहे, या विद्येची प्राप्ति न्यायमीमांसादि शास्त्रांनी होणार नाहीं. हीं शास्त्रें केवळ मनोरंजनाची एक कला आहे. हीं शास्त्रें कुशाग्रबुद्धीला द्योतक असलीं तरी "**योबुद्धेःपरतस्तुसः**" (गी. ३-४२) अशा अध्यात्मतत्त्वाचा बुद्धीला बोध करूं शकत नाहींत म्हणून वेदांतपर ग्रंथ या शास्त्राच्या कसोटीला लावून त्यांची लांबीरुंदी, आटपसरपणा किंवा मुद्देसूदपणावरून किंमत ठरवावयाची नाहीं. विद्वानांनीं पाहिजे तर ते न्यायमीमांसादि शास्त्रांच्या खलांत कुटून त्यांचा नुसता काथ्याकूटच करावा. पण अतींद्रिय परंतु बुद्धिग्राह्य परमात्मतत्त्व ज्याच्या

बुद्धींत प्रकाशित झालें असेल, त्या संतांनींच त्या तत्त्वाच्या ठिकाणीं इंद्रियांचा, वाणीचा लाग नसल्यामुळें स्वानुभवाच्या बळावर " **प्रत्ययें खुणेशीं बाणावें** [दास १०-१०--२९ ] अशा भाषेंतच तें रहस्य ग्रंथद्वारा प्रगट करावें, तें पाहून स्वानुभवी पुरुषांनीं मान डोलवावी, आणि मुमुक्षूंनीं समित्पाणि होऊन सांप्रदायपद्धतीनें " **शाब्दे परेचं निष्णातम्** " अशा आत्मवेत्त्या पुरुषाला शरण जाऊन त्याच्या मुखानें त्या ग्रंथाचें श्रवण करावें, आणि मनन व निदिध्यासानें त्या तत्त्वाशीं तद्रूप होऊन मुक्त व्हावें, असा या अध्यात्मपर ग्रंथांचा महिमा आहे ! ते ग्रंथ जर अनुभवाच्या कसोटीला उतरणार नाहींत, तर मुमुक्षूच्या नित्यपाठांत कधींहि येणार नाहींत हीच त्यांची कसोटी होय. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव हे श्रीज्ञानोबांचे ग्रंथ, दासबोध आत्मारामादि समर्थांचे समग्र ग्रंथ, मुकुंदराजांचे परमामृत व विवेकसिंधु, एकनाथांचे भागवत, भावार्थरामायण रुक्मिणीस्वयंवर, अभंगांची गाथा, इत्यादि ग्रंथ, तुकाराम, नामदेव, ज्ञानदेवांच्या अभंगांच्या गाथा, हीं सर्व मोक्षाधिकाऱ्यांना परीसच होत ! इतर विद्वानांनां ती केवळ " **मुक्यानहिऱ्यांचीच** " गोष्ट होणार आहे! ( ज्ञाने ६--२६ ) ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात:—

" जिहीं आत्मबोधाचिया आवडी । केली स्वर्गसंसाराची कुरोंडी ।
ते वांचून येथिंची गोडी । नेणती आणिक " ( ६–२८ )
अध्यात्म शास्त्रीं इये । अंतरंगचि अधिकारिये ।
परी लोक वाक्चातुर्यें । होईल सुखिया १७५०
जो जेथिंचें गौरव नेणें । तयासी तें भिंगुळवाणें ।

म्हणोनि अप्रसंगतेणें । म्हणावा कीं तो १६२७

(ज्ञाने. १८)

सारांश, जो वेदांताचें रहस्य जाणत नाहीं, त्याला संतांचे अनुभवी ग्रंथ अप्रासंगिक वाटून त्या बहिरंग्यांनीं ग्रंथांतील केवळ वाक्चातुर्य पाहूनच मान डोलवावी किंवा नाक मुरडावें, असें ज्ञानोबा स्पष्ट सांगतात. पण ही स्पष्टोक्ति प्रोफेसर साहेबांनां कुशारकी, तुच्छता, निरस्कार, वाटतो, तेथें नाइलाज आहे! स्वानुभवी पुरुष मग ते संस्कृत वा प्राकृत असोत, ते अमक्यातमक्याकरतां किंवा विद्वानांना खुष करण्याकरतां ग्रंथ लिहीत नसतात किंवा ते न्यायमीमांसादि विद्या अविद्यात्मक शास्त्रांच्या चौकटींत बसवण्याकरतां ग्रंथ लिहिण्याला बसत नाहींत, ते ढोंगचतुरा करून लोकांचें मनोरंजन करावें म्हणून ग्रंथ लिहीत नसतात; तर मनाला अगम्य, देहातीत, संगनिःसंगातीत अशा शुद्ध बुद्ध स्वयंसिद्ध पण बुद्धिग्राह्य अशा परमात्मतत्त्वाला आपल्या सदसद्विवेकाच्या कुशाग्रतेनें व सद्गुरुबोधानें आपल्या चित्तचतुष्टयाच्या चौरंगी झोपाळ्यावर बसवितात व साहेरवामिनीप्रमाणें स्वैरपणानें त्या परमात्मस्वरूपाच्या बोधाच्या रंगात दंग होऊन निर्भय, स्वच्छंद स्वैरपणाच्या स्वात्मानंदाचे झोंक खात खात अध्यात्मज्ञानी संत हे अनुभवामृताचे घुटके घेत असतात. त्याच्या योगानें त्यांच्या वृत्तिरूप उदरांतून उल्हासानें सहज आलेले तृप्तीचे ढेंकर ते हे मराठी व संस्कृत साधूंचें वेदांतपर ग्रंथ होत!

" तो जें स्वभावें बोले । तें ब्रह्मनिरूपण " !

(दास. १४ ३-२५)

म्हणून अशाप्रकारचे ग्रंथ हे असेच असावे, तसेच असावे,

त्यांनीं येथेंच थांबलें पाहिजे, इतकाच विषय पुढें आणला पाहिजे, इतक्याच मर्यादेंत उभें राहिलें पाहिजे, अशी मर्यादा त्यांनी मांसादि शास्त्रांच्या हातांनीं घालण्याचा कोणासच अधिकार पोंचत नहीं ! पण आजचा काळ व्यक्ति आणि मतस्वातंत्र्याचा असल्यानें त्याचा फायदा प्रो. मा. नीं कां घेऊं नये? हे संस्कृत प्राकृत वेदांतपर ग्रंथ पहाण्याचा विषय मुमुक्षूंचाच आहे. इतर प्रापंचिकाचा नव्हे. मग त्यांच्या टीकेला तरी कोण विचारणार? एखादा गवई देवाचें पद आणि विषयाचीहि लावणी म्हणतो पण दोन्ही प्रसंगीं तो देवाकडे अगर विषयाकडे लक्ष लावीत नसून तें पद अगर लावणी रागरागिणींत, ठेक्यांत कशी उतरते, इकडे त्याचें सर्व लक्ष्य असतें आणि गानप्रिय श्रोते मंडळीहि त्या रागरागिणींतच रंगलेली असते. गवयानें देवाचें पद म्हट-ल्यानें तो जसा देवाचा भक्त होत नाहीं, त्याप्रमाणें न्यायव्याक-रणमीमांसादिकांतील पारंगत शास्त्रीपंडितानें अध्यात्माचा विषय घेऊन शास्त्रीय पद्धतीनें घटपटाची खटपट करून ग्रंथ केला, तरी त्यांत जर अपरोक्षानुभूतीचा प्रकाश नसेल, तर तो ग्रंथ कितीहि उत्तम असो, त्याला अध्यात्मग्रंथ म्हणतांच येत नाहीं व त्या ग्रंथकर्त्या शास्त्र्यालाहि वेदांती, साधु कोणी म्हणणार नाहींत. वेदांतग्रंथ हे अमक्यांनीं तमक्याकरितां केलेले असें मुळीं म्हण-तांच येत नाहीं. कारण कोणीहि मनुष्य दुसऱ्याकरितां असें काहीं करीतच नाहीं. ग्रंथकर्तृत्व किंवा वक्तृत्व हें दुसऱ्याकरितां केल्यासारखें दिसलें, तरी त्यांच्या स्फूर्तीची उत्पत्ति स्वयमेव सहज आणि स्वतःच्या संतोषाकरितांच असते. जगांतलि ज्ञान आणि अनुभव यांचे आघात कवीच्या अहंस्फुरणावर होतात, ते बुद्धि निश्चयानें ग्रहण करते, चित्त चिंतनानें त्यांना उत्रविते,

आणि ते उद्गार परिपक्व झाले म्हणजे ग्रंथरूपानें अगर वक्तृत्व-रूपानें बाहेर पडतात, म्हणून ते बरे असोत, वाईट असोत, तरी त्यांना कृत्रिम असें म्हणतांच येत नाहीं. याकरितां मराठी साधूंचे ग्रंथ जरी प्रोफेसर सा. सारख्या वक्र दृष्टीनें पाहणाऱ्या विद्वानांला गचाळ दिसले, तरी त्यांना ढोंगी म्हणतां येणार नाहीं. ग्रंथ हे बरे असोत, वाईट असोत, पण ते ढोंगधत्तुरा करण्याचें साधन खचित नव्हत. ज्याला ढोंगधत्तुरा करावयाचा असतो, त्याला ढोंग माजवण्यासारख्या दुसऱ्या पुष्कळ गोष्टी आहेत व त्यांत लोक फसतीलहि. पण कवितेंत कोणीहि फसणार नाहीं. स्वानुभवी संतांनीं रचलेले अध्यात्मग्रंथ हे सिद्धांताचे मूर्तिमंत परिस. मुमुक्षुरूप लोहानें श्रवणमननाच्या रूपानें त्या परिसाशीं अनन्य होऊन सुवर्ण बनावयाचें आहे.

या नंतर प्रो. सा. नीं मराठी साधुकवींच्या भक्तियुक्त काव्याचें काव्यमय आविष्करण केलें आहे. "वत्सलता, शांति, इत्यादि स्थायीभावमूलक भक्ति हा एक रस आहे आणि दांडगे-पणानें व तुफानी वेगानें या साधुकवींच्या अंतःकरणांत तो भक्तिरस इतका रसरसलेला होता, कीं तो काव्यामध्यें वाङ्मयाच्या निर्बंधांना धाब्यावर बसवीत होता! तरी तो काव्यांची रसहानि करीत नसे. कारण कवींच्या मनोविकारांची तार अगदीं वरच्या शेवटच्या सप्तकांत चढलेली, त्यांची नाम संकीर्तनांत एकाग्रता झालेली, नारद, वाल्मीकि, शुक, उद्धव, इत्यादि-कांचे उपदेश झालेले, प्रत्यक्ष भगवंताच्या सगुण स्वरू-पाचें दर्शन घडलेलें, अशा रसरसलेल्या भक्तिरसाच्या प्रचंड प्रवाहांत कोणत्याहि रसाची हानि न होतां ज्ञानोबांची प्रतिभासंपन्नता, नामदेवाचा प्रेमळपणा, तुकारामाचें वैराग्य

यांच्या योगानें त्यांचीं काव्यें उत्कृष्ट वठलीं अशा वर्णनानें या तिघां साधुकवींचा प्रो. सा. नीं काव्यमय गौरव करून त्यांना हरबऱ्याच्या झाडावर चढविलें आहे ! पण त्यांच्या काव्याबद्दल एक मजेदार विधान प्रो. सा. नीं केलें आहे तें हें कीं, " केव्हांहि झालें तरी कवित्वापेक्षां साधुत्वाला जनता जास्त मान देते, कारण तें ईश्वरीय आहे. म्हणून " **त्यांच्या काव्यीं गुण असो नसो.** " लोक त्यांच्या काव्यांतील गुणदोषांची पर्वा करीत नसत. लोक केवळ त्यांच्या साधुत्वाला दिपून आणि लोपून जात, " आणि प्रो. सा. च्या मतें परलोकोपयोगी व ईश्वरी साधुत्व कोणतें माहीत आहे का ? नसेल तर ऐका ! भिंतींना चालवणें, रेड्यांना बोलवणें, दगडी देवांच्या तोंडांत घांस भरविणें, दगडी देवतांचीं तोंडें फिरविणें, मेलेलीं माणसें जिवंत करणें, इत्यादि !! सिद्धि सामर्थ्यानें साधुत्व येतें हें विधान किती तरी तर्कप्रतिष्ठित व सयुक्तिक ! कायपण हा अपूर्व विलायती शोध !

**सकल धर्मांमध्यें धर्म । स्वरूपीं राहावें हा स्वधर्म ।**
**हेंचि जाणिजे मुख्य वर्म । साधुलक्षणाचें**

(दास. ८-९-५४)

ही समर्थांची साधुत्वाची व्याख्या अगदीं सपशेल चुकली ! आणि भाबडे बिचारे पूर्वींचे लोक, त्यांना कांहीं या ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेवांचें काव्य पसंत पडलें नाहीं. पण त्यांच्या सिद्धि-सामर्थ्याच्या साधुत्वाच्या श्रद्धेवरच त्यांनीं त्यांचें ग्रंथ व अभंग नित्यपाठांत ठेवले आहेत ! त्यांतील तत्त्वांची कांहीं खऱ्या खोट्याची पर्वा कोणी केली नाहीं ! एका भाबड्यानें पुण्याचे पेढे फार उत्तम असतात, असें ऐकलें होतें, व त्यावर त्याची श्रद्धा

होती. एकदां पुण्यास येऊन त्यानें तेथील ऐश्वर्य पाहिलें, आणि गेला दिपून आणि लोपून ! मग त्याला पुण्याच्या पेढ्यांची आठवण झाली. पैशाचे पेढे मागूं लागला. तीनच मिळूं लागले, तेव्हां निराश झाला. मग त्याला एक लबाड वाणी मिळाला. त्यानें स्वस्तमे पेढे म्हणून शिपतरांत घोड्याची लीद बांधून एक पैशाला दिली ! भोळा विचारा विश्रांतीच्या ठिकाणीं जाऊन पुण्याचे पेढे पुण्याच्या ऐश्वर्याला भुलून दृढभावनेनें खाऊं लागला ! "ऊंः कसेसेच लागतात, पण पुण्याचे पेढे म्हणून खावयाचे" ! अशा भावनेनें त्यानें सर्व पेढे गुण-दोषाची पर्वा न करतां खाउन टाकले ! तद्वत् मराठी साधु-कवींचीं काव्यें केवळ चमत्कारांच्या साधुत्वावरच नमस्कारलीं जात आहेत ! केवढा प्रो. सा. चा दांडगा तुफानी शोध हा ! प्रोफेसर सा. म्हणतात, "सृष्टिक्रमामध्यें कांहीं ज्ञानेश्वरादिकां-सारख्या विभूति फारशा स्वस्त नसतात," त्याप्रमाणें प्रो. सा. सारखे शोधकहि सृष्टिक्रमामध्यें फारसे नसतात, म्हणूनच बरें आहे !

मराठी साधूंचे आद्य गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराज आणि त्या-नंतर नामदेव, एकनाथ, तुकाराम, असे साधु झाले, त्यांच्या काव्याची अशारीतीनें विल्हेवाट लावल्यानंतर त्यांच्या मागून जे मराठी साधु कवि झाले, त्यांची दुर्दशा प्रो. सा. नीं काय केली आहे ती तर पुसूंच नका ! मागून जे भक्तिपंथांत साधुत्वाच्या आणि कवित्वाच्या नांवान पुढें आले ते प्रो. सा. च्या मतें अगदीं कमी कमी दर्जाचे होते ! तशांत सामान्यजनसमूहहि अज्ञान असून परीक्षकपणा आणि चिकित्सकपणा त्यांच्यांत कमी, यामुळें सामान्य

रम्याडोक्या हरिभक्तिपरायण असला तरी तो ज्ञानेश्वर किंवा तुकाराम ठरत असे! अशा प्रकारचा एक काळ माजी कालकर्त्यांनीं देऊन त्या काळांतील ढोंगी साधु आणि भोळे लोक यांचें प्रो. सा. नीं मोठें मजेदार वर्णन दिलें आहे तें असें:—

" आपण साधु होऊन कविता करूं लागलों, कीं विद्वत्ता नसली, आणि वाटेल तें खरें खोटें दडपून दिलें, प्रमाणांचा अभाव असला, तरी प्रमेयाची सिद्धि झाल्याचें ठासून सांगितलें किंवा कसलाहि गचाळ आणि गबाळ ग्रंथ कंटाळ-वाणा होईपर्यंत भराभर लिहिला, तरी तो वाईट म्हणण्याची कोणीहि छाती करणार नाहीं! विद्वत्ता नसेल तर साधुप-णाचा आव आणावा, देवाच्या नांवाखालीं संबद्ध, असंबद्ध, विश्वसनीय, अविश्वसनीय दडपून द्यावें, व कोणीं नांवें ठेवूं लागल्याच, तर त्याला निंदक, नास्तिक, देवद्रोही, भक्तिविरोधी, असा उलट शह द्यावा, अशा युक्तीच्या छ-त्राखालीं ढोंगी साधुत्व व वाईट कवित्व याचा उदय झाला! "

परंतु कोणत्या काळाला व कोणत्या व्यक्तींना उद्देशून हें वर्णन प्रो. सा. नीं दिलें आहे, त्याचा तर संबंध लेखांत पत्ताच नाहीं! एका धनिकानें एका अडाणी को-कण्याबाळूची परीक्षा करून त्याला नोकरींत ठेवण्यासाठीं लगाम घालुन घोडा नदीवरून पाणी पाजून आणण्यासाठीं त्या बाळूच्या हातीं दिला. तो घोडा वाटेनें लगाम तोडून पळून गेला. तुटका लगाम बाळूच्या हातांत राहिला. बाळूला धन्याचें नांव माहित नाहीं, घराचा पत्ता माहित नाहीं.

लगाम हें नांव माहीत नाहीं. लगाम घालून कोणतें जनावर दिलें तेंहि माहीत नाहीं. यजमानाला निरोप कोणाजवळ सांगत आहे त्याचेंहि नांव माहीत नाहीं ! अशा सर्वच नन्नाच्या परिस्थितींत एका गृहस्थाजवळ धन्याला निरोप सांगताना बाळू उद्गारला तें असें:— " अहो तुम्ही ! ज्याच्या येथें राहिलों आहें मी, त्यांना. सांगा तुम्ही, कीं, हातांतल्या ह्यांत होतें, तें पळून गेलें " ! !

या मोघम वाक्यांत शद्ब पुष्कळ झाले, पण अर्थ कांहींच नाहीं ! त्याचप्रमाणें हें मराठी साधुकवींच्या निंदेचें वर्णन मोठें झालें. पण हा दोष कोणत्या कवींवर व त्यांच्या ग्रंथावर लादावयाचा त्याचें तर यांत नांवच नाहीं. ज्या लेखांत प्रो. सा. स्पष्ट स्पष्ट खुलासा करीत जाण्याचा उपदेश करतात, त्यांतच हा मुग्धपणा ! प्रो. सा. चें अंत:करण फार कोमल असल्यामुळें कोणा मराठी साधूकवींच्या मनाला धक्का बसूं नये व कुशीला बोट लागल्यानें गुदगुदल्या ऐवजीं उलट इजा होऊं नये, म्हणून या ढोंगी साधूंचा, त्यांच्या ग्रंथांचा आणि त्या काळाचा प्रो. सा. नीं उल्लेख केला नसावा ! पण भोळसर लोक आणि ढोंगी लोक हे " **गांव तेथें महारवाडा** " या न्यायानें सर्व देशांत सर्व काळीं विद्वानांत तसे अविद्वानांत, प्राचीनांत तसे आधुनिकांत, मराठी तसेंच इंग्रजी शिकलेल्यांत हल्लीं, पूर्वी व पुढेंहि असणारच, पण कवित्त्वाच्या ढोंगानें फसविणारे साधु आणि त्यांच्या काव्यांचा अगदीं टाकाऊ माल चांगल्या भावनेनें विकत घेणारे भोळसट लोक. हा शोध काहीं अपूर्व आहे ! अशा प्रकारचे ढोंगी साधु

3030

व गचाळ ग्रंथ मुमुक्षूंच्या नित्य पाठांत कोणते आहेत, ते हुडकून काढून त्यांना समाजांतून च्यात्र देऊन त्यांचें उच्चाटन करण्यासाठीं त्यांची एक खुलासेवार यादी समाजाच्या हितासाठीं जाहिर रीतीनें प्रसिद्ध करणें, हें प्रो. सा. चें अवश्य कर्तव्य आहे. तें त्यांनीं तात्काळ करावें अशी प्रो. सा. ना आमची आग्रहाची विनंति आहे.

प्रो. सा. म्हणतात, " ज्ञानेश्वरादि मोठ्या साधुकवींनीं विवक्षित भूमिकेवरून विद्वत्तेला जें गौणत्व दिलें, तें या खालच्या दर्जाच्या मंडळींनीं प्रस्थापित केलें. आणि खरी नसेल तर ढोंगी भक्ति असली म्हणजे विद्वत्तेची अपेक्षा नाहीं, अशा हानिकारक मनःस्थितीपर्यंत मजल गेल्यावर व्याकरणन्यायमीमांसादि कुशाग्रतोत्पादक शास्त्रांच्या अध्ययनाची अपेक्षा न बाळगण्याच्या अंदाधुंदींत व बेबंदशाहींत या मंडळींनीं विवेचनाकरतां घेतलेले विषय हलके सलके नसून ईश्वर, माया, पुरुष, प्रकृति, अहंकार, इ० इ० अत्यंत बिकट, अज्ञेय आणि गहन असे घेऊन विद्वत्तेच्या अभावीं त्यांच्या प्रतिपादनांत चक्रवाढव्याजानें घोंटाळे केले आहेत ! आणि त्यांना संस्कृताचा उपमर्द करण्याची गोडी विशेष असल्यामुळें मूळच्या मराठी लेखकांनीं संस्कृताच्या झऱ्यावरील भरून घेतलेल्या सांचवणीच्या पाण्यावरच या खालच्या दर्जाच्या ढोंगी कवींना आपली तहान भागून घ्यावी लागली आहे. " ! प्रोफेसर साहेब जेथपर्यंत अशा साधूंचीं नांवें व त्यांचे ग्रंथ उघड रीतीनें सांगणार नाहींत, तेथपर्यंत प्रो. सा. चें हें म्हणणें खरें मानतां येत नाहीं. पण आजकाल मुमुक्षूंच्या नित्यपाठांत असलेले ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, एकनाथांचे व

रामदास, मुकुंदराय, इत्यादि संतमालिकेंतील साधूंचे ग्रंथ यांत प्रो० सा० म्हणतात, अशा प्रकारचे घोंटाळे बिलकूल झालेले नाहींत. त्यांनीं प्रो. सा म्हणतात ते गहन विषय प्रतिपादनाला घेऊन त्यांचें प्रतिपादन मुमुक्षूंची यथार्थ समजूत पटेल, अशाच रीतीनें केलें आहे, अशी प्रो० सा० पुन्हा एकवार ग्रंथ वाचून पहाण्याची तसदी घेतील तर त्यांचीहि खात्री होईल. ज्ञानेश्वरींतील तेराव्या अध्यायांतील प्रकृतिपुरुषांचा, तसेंच पंधराव्यांतील क्षराक्षर व उत्तम पुरुषाचा निवाडा, अमृतानुभवांतील शब्द, अज्ञान इत्यादिकांचे खंडण, वाचीतच रहावें असें वाटतें ! समर्थांच्या दासबोधानें तर मुमुक्षूंच्या सर्व शंकांचें सहज निरसन होतें ! त्यांचा आत्माराम ग्रंथ तर वेदांताचा आत्माच आहे ! त्याचप्रमाणें मुकुंदराजांचें परमामृत तर खरोखरच अमृततुल्य असून विवेकसिंधुहि तसाच बहारीचा आहे ! एकनाथांचे ग्रंथहि रसाळ, प्रेमळ, व बोधपर आहेत ! मुमुक्षूंच्या नित्य पाठांत असलेल्या कोणत्या साधुकवीच्या कोणत्या ग्रंथांत चक्रवाढव्याजी घोंटाळे, चर्वितचर्वण, सांचवणीच्या पाण्यावर तहान भागवून घेणें झालें आहे, तें प्रो० सा० कृपा करून उघड सांगतील, तर समाजावर त्यांचे महत् उपकार होतील! उघड नांवें घेतलेल्या व नांवें दडवून ठेवलेल्या सर्व मराठी साधुकवींची मुद्देसूद, आटपसर आणि व्यवस्थित अशी शास्त्रीय पद्धतीनें प्रो० सा० नीं वर्गवारी केली आहे. एक वरच्या दर्जाचे साधु म्हणजे "**ज्यांच्या काव्यीं गुण असो, नसो**" तें कांहीं न पहातां त्यांच्या भिंती चालवणें इत्यादि सिद्धिसामर्थ्याच्या साधुत्वा-

ला मान देऊन ज्यांचे ग्रंथ अशिक्षित लोक वाचनात असे अर्थात् ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम. आणि दुसरे, खाल-च्या दर्जाचे ढोंगी साधु ज्यांचीं नांवें व ग्रंथ हीं प्रो सा. नीं गुलदस्तांत ठेविलीं आहेत ते, असे दोन वर्ग केले आहेत. या पैकीं वरच्या दर्जाच्या साधूंनीं संस्कृतां-तील ज्ञानाच्या झऱ्याचें पाणी भरून घेतलें, आणि खालच्या दर्जाच्या असाधुकवींनीं वरच्या दर्जाच्या साधूं-च्या भांड्यांतील सांचवणीच्या पाण्यावर तहान भाग-वली." असें प्रो. सा. म्हणतात. वास्तविक विचार केला तर ज्ञानेश्वर समर्थ, एकनाथ, मुकुंदराज, हे स्वतंत्र स्फूर्तीचे स्वात्मानु-भवी पुरुष होते. त्यांनीं संस्कृताचा मान राखून गहन विषयांचें स्वतंत्र स्फूर्तीनें विवेचन केलें आहे, पण नावडतीच्या मिठाला अळणी म्हणून नांवच ठेवावयाचें झालें, तर स्वतंत्र विचार प्रगट केले असले, म्हणजे संस्कृताचा उघड उघड अनादर व उपमर्द केला म्हणावें, आणि संस्कृताशीं जुळते विचार असतील, तर संस्कृताच्या झऱ्यांतील पाणी घेतलें ह्मणावें मिळून मराठी साधुकवींना " इधर बी थपडी, उधर बी थपडी " विद्वत्तेच्या जोरावर प्रो. सा. नीं वाटेल तशीं नांवें ठेवावीं, हें त्या मराठी साधूंचें दुर्दैव होय !

यानंतर प्रो. सा. नीं जोरानें माजलेल्या गुरु आणि शिष्य यांच्या बंडावर आपल्या विद्वत्ताप्रचुर चुरचुरीत विचारांची मोहीम सुरू केली आहे ! प्रो. सा. म्हणतात " पूर्वीच्या काळांत कांहीं हें गुरु शिष्याचें बंड फारसें नव्हतें. पण विषय दुर्ज्ञेय, ग्रंथ घोंटाळ्याचे आणि लोक अज्ञानी अशा दुर्गुणत्रयाच्या त्रिकूटाचलांतून गुरु शिष्य आणि उपदेश

अशी त्रिकोणी गुरुपरंपरारूपानें प्रगट झाली !" वा: केवढा पण दांडगा आणि तुफानी शोध हा ! जशी काय कोलंबसानें अमेरिकाच शोधून काढली ! प्रोफे० सा० विचारतात, "जेथें ग्रंथाची विवेचनपद्धति स्फटिकासारखी शुद्ध आहे आणि ग्रंथ वाचून समजण्याइतकी बौद्धिक शक्ति वाचकांच्या मनांत आहे, तेथें गुरुशिष्यभावाच्या स्तोमाची हो काय अपेक्षा ?" खरेंच आहे ! प्रो० सा० ची मॅट्रिक परीक्षा होऊन त्यांची ग्रंथ वाचण्याइतकी बौद्धिक शक्ति जेव्हां वाढली, तेव्हां त्यांनीं कॉलेजांत न जातां स्फटिकासारख्या शुभ्र विवेचनपद्धतीचे ग्रथ घरीं वाचूनच ते एम्. ए. झाले ! भौतिक शास्त्रांचें ज्ञान जर बौद्धिक शक्तीनें होतें, तर ब्रह्मज्ञान हें तर बोलून चालून पोकळ ! तें तेव्हांच होईल ! प्रो० सा० म्हणतात कीं, "जें ग्रंथांत लिहितां यावयाचें नाहीं तेवढें कानांत सांगावयाचें शिल्लक राहील, तेवढ्या पुरते गुरु ठेवावे, ही पद्धत ठेवली तर मूर्ख शिष्य आणि ढोंगी गुरूहि कमी होतील !" वहावा ! बौद्धिक उन्नति आणि उत्क्रांति झालेल्या समाजांत मूर्ख शिष्य आणि ढोंगी गुरूंची चलती चालते हें अपूर्वच नव्हे काय ? तर्कशास्त्राचे फवारे उडवीत उडवीत गुरुपरंपरेची ममिांसा करून न्यायशास्त्राच्या सहाय्यानें प्रो. सा. नीं न्यायाधीश होऊन एक निवाडा वाचकांच्या हातीं दिला आहे तो हा कीं, "जुन्या संस्कृत वाङमयाचें परीक्षण केलें, त्यावरून असें सिद्ध होत आहे कीं, त्या जुन्या संस्कृत ग्रंथांत या गुरुशिष्याचीं स्तोत्रें मराठीइतकीं फारशीं कोठें आढळत नाहींत ! लोक ग्रंथ वाचीत असत, आणि

त्यांतील भावार्थ समजून लक्ष्यांत घेत असत. प्रत्येक माध्या गोष्टीसाठीं त्यांना कानमंत्राची जरूर लागत नव्हती. अशिक्षित समाज ही कान फुंकणाऱ्या गुरूंची सुपीक जमीन होय!!" वास्तविक संस्कृत असो, प्राकृत असो, प्राचीन असो, अर्वाचीन असो, "**तस्माद्गुरुं प्रपद्येत जिज्ञासुः श्रेयमुत्तमम्**" (भाग.) हें प्रत्येक वेदांत-ग्रंथाचें सार असतांना तें प्रो. सा. सच क्वचित् प्रसंगीं आढळतें, हें आश्चर्य होय! प्रो. सा. च्या मतें ही गुरुपरंपरा अलीकडे सुरू झाली असेल पण:—

**एवं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् । विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत्** ( गी. ४–१ )

अशा रीतीनें अनादिकालापासून आलेली '**एवं परंपराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः** अशा प्रकारची परंतु '**स कालेनेह महता योगो नष्टः परंतप**' ( ४–२ ) अशा रीतीनें सांप्रत नष्ट झालेली गुरुपरंपरा ही आजकालची नसून वसिष्ठनारदादिकांपासून तों थेट तुकाराम रामदासांपर्यंत चालत आलेली आहे. संस्कृत काळांत अगर प्राकृत काळांत असो, गुरुपरंपरेशिवाय मुक्त झालेला एकहि साधु मिळावयाचा नाहीं. सद्गुरुपदप्राप्तीशिवाय जर मोहच नष्ट होत नाहीं, तर त्यावांचून चालणार कसें? सद्गुरुपदाचा उपदेश हें बंड नसून अध्यात्मांतील मुख्य व आद्य कर्तव्य असल्यामुळें ही परंपरा अलीकडे सुरू झाली म्हणणें अज्ञान होय. आतां खरी गुरुपरंपरा वर सांगितल्या रीतीनें नष्ट झाल्यामुळें ढोंगी गुरु व मूर्ख शिष्य यांची गुरुपरंपरा हल्लीं वाढली आहे ही गोष्ट आम्हांला कबूल आहे. ही जोडी जशी अशिक्षितांत तशीच सुशिक्षितांतहि आहे. व पुष्कळ चांगले चांगले सुशिक्षित लो-

कांहि यांना मारुतीच्या बेंबींत बोट घालून विंचवानें फणका मारला तरी गार लागतें असें म्हणून फसताहेत आणि आयुष्याचा व द्रव्याचा मातेरा करीत आहेत, यांत संशय नाहीं ! परंतु सर्वच बाजूंनीं आपला काळ फिरलेला आहे. त्यांत एवढ्याच गोष्टीची सुधारणा कोण आणि कशी करणार ? ज्या वेळीं विपरीत काल-चक्र फिरून अनुकूल काल प्राप्त होईल, आणि येण्याची वेळहि जवळ आलेली आहे, त्यावेळीं सर्वच ढोंगें आणि सोंगें नाहींशीं होतील, आणि त्यामुळें खोट्याबरोबर खऱ्या साधूंची विनाकारण चाललेली टवाळकीहि बंद होईल !

मनुष्याच्या बौद्धिक उन्नतीची व उत्क्रांतीची प्रोफेसरसाहेबांस मोठी घमेंड आहे. पण बुद्धीची उन्नति आणि उत्क्रांति एकदेशी चालणारी असल्यामुळें तिला दुसरी बाजू गुरुगम्य मार्गानेंच कळावी लागते. वाक्यांतील अर्थ वाक्यांतच असतो. बुद्धीच्या उन्नत अवस्थेनें आपण तो ग्रहण करून त्याचा उच्चारहि करीत असतों आपल्याला तो समजला, अगदीं पक्का समजला, अशी घमेंडहि मारीत असतो. पण डोळा उघडून खरें अर्थरूप होणें हें काम गुरुपरंपरेशिवाय होणेंच नाहीं. बौद्धिक उन्नतीनें व शास्त्रीय पद्धतीनें केवळ शब्दार्थ लावणारे एक महान् विद्वान् शास्त्री राजाकडे याचनेकरितां गेले. राजानें " **अनन्याश्चिंतयंतो माम्** ( गी. ९-२२ ) या गीतेंतील श्लोकाचा अर्थ विचारला शास्त्रीबुवांनीं न्यायमीमांसातर्क-व्याकरणादिकांच्या साह्यानें श्लोकाचे तुकडे पाडपाडून व व्याख्या स्पष्ट करकरून अर्थ सांगितला. राजा म्हणाला, ' तुम्हांला अर्थ समजला नाहीं ! ' शास्त्रीबुवा हिरमुसले होऊन घरीं येऊन डोकें चोळीत व चूक शोधीत बसले व बायकोला ती हकीगत त्यांनीं सांगितली. बायको म्हणाली ' अहो ! तुम्हांला अर्थ कळला नाहीं

असें राजा म्हणाला तेंच बरोबर ! श्लोकांतील " **योगक्षेमं वहाम्यहम्** " हें जर आपल्याला उमजलें असतें, तर तुम्ही राजाकडे याचनेला गेलेच नसतेत ! " तेव्हां शास्त्रीबुवा खरा **अर्थ** समजून उमजले ! तद्वत् या गुरुपरंपरेच्या ज्ञानाची स्थिति आहे. गुरुपरंपरा ही फार पुरातनची असून सर्व संत या एकाच मार्गानें कृतकृत्य झाले. म्हणून हिची टवाळकी करणें महान् पातक आहे. मात्र मानलें तर !

या गुरुपरंपरेच्या मार्गावर प्रो० सा० सारख्या आधुनिक पंडितांचा विश्वास न बसो, पण अगदीं प्राकृतांतल्या प्राकृत आमच्या **जनाबाई व बहिणाबाई** ह्या याबद्दल काय म्हणतात ती त्यांची रसाळ वाणी प्रो० सा० स गचाळ वाटली तरी वाचकांस ती ज्ञानमार्ग दाखविणारी मशालच होईल असें जाणून येथें देतों :—

**संसारीं निधान लाधलेंसे जना । सद्गुरु चरणा सेवीं बापा ॥ १ ॥**
**काया वाचा मन तयाशीं हीं द्यावीं । वस्तु मागुन घ्यावी अगोचर ॥ २ ॥**
**गोचर नव्हे जाण गुरुकृपेवीण । एरव्हीं ती आपणामाजी आहे ॥ ३ ॥**
**असतां सम्यक् परी जना चुकामूक । भुललीं निष्टंक मंत्रतंत्रें ॥ ४ ॥**
**माळ वेष्टन करी टापोर बेती शिरीं । नेम अष्टोत्तरी करीताती ॥ ५ ॥**
**माळ करविता वाचेशीं वदवीता । तया हृदयस्था नेणें कोणी ॥ ६ ॥**
**सोहं आत्मा प्रगट जो दाखवी वाट । सद्गुरु वरिष्ठ तोचि जाणा ॥ ७ ॥**
**तया उत्तीर्णता व्हावया पदार्थी । न देखो सर्वथा जनी म्हणे ॥ ८ ॥**

२

**न लगती वेदशास्त्राचें पठण । परमार्थाची खूण वेगळीच ॥ १ ॥**
**सद्गुरुशीं जाईं शरण सर्वभावें । मग तूं स्वभावें ब्रह्मरूप ॥ २ ॥**
**न लागती तपें व्रतें अनुष्ठानें । आत्मत्वाची खूण वेगळीच ॥ ३ ॥**

न लगती देव तीर्थक्षेत्रयात्रा । आगमींच्या मंत्रा धांडोळावें ॥ ४ ॥
न लगती योग याग प्राणायाम । साधनाचें वर्म वेगळेंचि ॥ ५ ॥
न लगे ब्रह्मचर्य गृहस्थ संन्यास । व्रतांचे हव्यास व्यर्थ तेहि ॥ ६ ॥
न लगती पंचाग्नि धूम्राचें प्राशन । आकाश-वसन नलगे कांहीं ॥ ७ ॥
**बहेणि** म्हणे एका श्रीगुरूवांचोनी । मोक्ष तो गहनीं प्राप्त नव्हे ॥ ८ ॥

३

शब्दाचें बोलणें दृश्य हें तोंवरी । अदृश्य वैखरी हारपलें ॥ १ ॥
तेथें हा श्रीगुरु बोलेल समर्थ । दाखवूनी अर्थ श्रुति-शास्त्रें ॥ २ ॥
बुद्धीचें बोधन चित्ताचें चिंतन । अदृश्य हें जाण हारपलें ॥ ३ ॥
इंद्रियांचें सर्व आकारीं बोलणें । निराकारीं जाण हारपलें ॥ ४ ॥
**बहेणि** म्हणे जेथें अनिर्वाच्य बोली । सद्गुरुमाउली तेचि दावी ॥ ५ ॥

पण हें आम्ही काय करीत आहोंत? हे तर प्रोफेसर सा. च्या मताप्रमाणें मराठी ढोंगी साधूंच्या गचाळ ग्रंथांतील उतारे होत! म्हणून आतां आपण अति प्राचीन संस्कृत काळापासून देवादिकांनींसुद्धां या गुरुपरंपरेचें माहात्म्य कसें वर्णिलें आहे तें पाहूं. खुद्द शंकर पार्वतीला सांगतात:—

वेदशास्त्रपुराणानि इतिहासादिकानि च । मंत्रयंत्रादिविद्यानां
स्मृतिरुच्चाटनादिकम् ॥ ६ ॥

शैवशाक्तागमादीनि ह्यन्ये च बहवो मताः । अपभ्रंशः
समस्तानां जीवानां भ्रांतचेतसाम् ॥ ७ ॥

जपस्तपो व्रतं तीर्थं यज्ञो दानं तथैव च ।
**गुरुतत्त्वमविज्ञाय सर्वं व्यर्थं भवेत्प्रिये ॥ ८ ॥**

गुरुवक्त्रे स्थितं ब्रह्म प्राप्यते तत्प्रसादतः ॥ २२ ॥

**अज्ञानतिमिरांधस्य ज्ञानांजनशलाकया ।**
**चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ६४ ॥**

( गुरुगीता )

आतां आमचे श्रीकृष्ण भगवान् म्हणतातः——

**" तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।**
**उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ "**

( गी. ४-३४ )

तसेंच संस्कृत काळांतील श्रीमच्छंकराचार्य ह्मणतातः---

षडंगादि वेदो मुखे शास्त्रविद्या । कवित्वादि गद्यं सुपद्यं करोति ।
गुरोरंघ्रिपद्मे मनश्चेन्नलग्नम् । ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ॥

( गुरुस्तोत्र )

" उपसीदेद्गुरुं प्राज्ञं यस्मान्बंधविमोक्षणम् " ३५

( विवेकचूडामणि )

अशा प्रकारचीं संस्कृत साधूंचीं शेंकडों वचनें फार प्राचीन कांळांपासून प्रत्येक ग्रंथांतून किती तरी देतां येतील ! तरी पण त्यांपासून प्रोफेसरसाहेबांचें समाधान होईलच असें नाहीं ! म्हणून आधुनिकांनां सर्वमान्य व पृथ्वीपर्यटण करून पाश्चात्यांनाहि थक्क करून सोडणारे **स्वामी विवेकानंद** यांच्या वचनकुसुमांचा गुच्छ करून दिल्यानें तरी गुरुपरंपरेवर रुष्ट झालेल्या प्रोफसर सा. चें समाधान होतेंसें पाहूं:--

"This quickening impulse cannot be derived from books. The soul can only receive impulses from another soul and from nothing else.

We may study books all our lives, we may become very intellectual but in the end, we find that we have not developed at all spiritually. It is not true that a high order of intellectual development always goes hand in hand with a proportionate development of the spiritual side in man. In studying books we are sometimes deluded into thinking that thereby we are being spiritually helped, but if we analyse the effect of the study of books on ourselves, we shall find that at the utmost, it is only our intellect that derives profit from such studies and not our inner spirit. This inadequacy of books to quicken spiritual growth is the reason why, although every one of us can speak most wonderfully on spiritual matters, when it comes to action and the living of a truly spiritual life, we find ourselves so awfully deficient. To quicken the spirit, the impulse must come from another soul. "

" आध्यात्मिक जागृति ही पुस्तकी ज्ञानानें होणें शक्यच नाहीं. चैतन्याचा बोध एका व्यक्तीकडूनच दुसऱ्या व्यक्तीला झाला पाहिजे. दुसऱ्या कोणत्याहि साधनानें हा बोध मिळणार नाहीं. जन्मभर पुस्तकें वाचल्यानें बौद्धिक उन्नति झाली तरी आध्यात्मिक उन्नति कांहीं होणार नाहीं. कारण अत्युच्च बौद्धिक उन्नतीबरोबर आध्यात्मिक उन्नति होईलचअसें नाहीं. पुस्तकी ज्ञानानें जणुं काय आपली आत्मोन्नति झाली असा भ्रम होतो आणि आत्मोन्न-

तीवर आपण उत्कृष्ट रीतीनें व्याख्यानहि देऊं शकतो. पण खऱ्या-खऱ्या विचाराअंतीं हा भ्रमाचा भोपळा फुटतो. सारांश, पुस्तकी ज्ञान हें व्यर्थ आहे. आत्मज्योत प्रज्वालित करण्याला दुसरी व्यक्तीच पाहिजे."

इतक्याहि उपर गुरुपरंपरा हें आम्हीकडील मराठी साधूंनीं वाढविलेलें थोतांड म्हणावयाचें असेल तर खुशाल म्हणावें. आणि विद्वानांना तें पसंत पडत असलें तरीहि वाहवा !

यानंतर प्रो० सा० नीं आपला मोर्चा विद्वत्ता व भक्ति यांच्या तुलनात्मक विचाराकडे वळविला आहे. ते विचारतात कीं, शास्त्र या दृष्टीनें वेदांतपर ग्रंथविवेचनाला विद्वत्ता व भक्ति यांपैकीं कोणाची अवश्यकता आहे ? याचें उत्तर विद्वत्ता हेंच यावें, म्हणून विद्वत्तेचा बडेजाव व भक्तीची विचक्षणा किंबहुना विटंबना प्रो० सा० नीं सुरू केली आहे ! वेदांतविषयाचे आद्य प्रतिपादक श्रीमत् शंकराचार्य हे कांहीं प्रामुख्येंकरून भक्त नव्हते, पण मराठी भाषेंतील आद्य प्रतिपादक श्री ज्ञानेश्वरमहाराज हे विद्वान् व भक्तहि असल्यानें त्यांचे ग्रंथ विद्वत्तापूर्ण व प्रेमळपणानें युक्त असे झाले आहेत म्हणून सांगून त्या भक्तीचे प्रो० सा० नीं गुणानुवाद गाइले आहेत व तेणेंकरून भक्तीबद्दलचें आपलें अज्ञान प्रो० सा० नीं प्रगट केलें आहे ! " भक्तीनें अंतःकरण पवित्र होतें, नेत्र अश्रूंनीं ओले होतात, कंठ सद्गदित होतो, आणि सर्वांग रोमांचित होतें ! " यापलीकडे प्रो० सा० म्हणतात, ग्रंथलेखनांत भक्तीच्याहातून दुसरें काय होणार आहे ? विद्वत्ता फार कठीण आणि भक्ति फार सोपी; जगांत खरी आणि खोटी

भक्ति वाढली कीं, विद्वत्तेची अपेक्षा न राहतां तिला प्रो० सा० च्या मतें गौणत्व येतें ! प्रो ० सा० चा स्वभाव फार भिडस्त, म्हणूनच त्यांनीं भक्तीची जास्त स्पष्ट फोड केली नाहीं. ती त्यांच्याच भाषेंत आम्ही त्यांच्या परवानगीनें स्पष्ट करून सांगतों. अंतःकरण पवित्र होणें, अर्थात् अज्ञानी व अशिक्षित माणसाच्या अंतःकरणांत कांहींच पातक नसतें म्हणून तें पवित्र, त्यानें डोळ्यांना थोडा हिंग लावला कीं झाले नेत्र अश्रूंनीं ओले ! तो थोडा गहिंवरून रडला आणि थंडींत थोडा कुडकुडत उघडा उभा राहिला कीं कंठ सद्गदित होऊन सर्वांग रोमांचित झालेंच ! असें झाल्यावर प्रोफेसर साहेब हे भक्ति सोपी म्हणतात, तें कां खरें होणार नाहीं ? अशा भक्तीचा प्रो. सा. म्हणतात, अज्ञान समाजाशिवाय कोठेंच उपयोग नाहीं आणि ग्रंथलेखनाच्या कामांत तर तिच्यावांचून कांहींच अडणार नाहीं. प्रो. सा. म्हणतात, "या भक्तीचें माहात्म्य अशिक्षित समाजांत वाढतें आणि विद्वत्तेचा वेदांत मागें पडला कीं, भक्तीचें तट्टू अशिक्षित समाजांत पुढें दामटलें जातें" ! यावरून ज्ञानेश्वर महाराजांच्या अंगांत नामसंकीर्तनानें, नारदादिकांच्या उपदेशानें व भगवंताच्या सगुणस्वरूपाच्या दर्शनानें जी दांडगी आणि तुफानी भक्ती संचारून तशा मनःस्थितींत त्यांच्या हातून रसहानी न होतां ग्रंथ झाले असें प्रो. सा. म्हणतात, ती भक्ति अशा प्रकारची अश्रु दाळणारी होती व त्या भक्तीचें तट्टू ज्ञानोबांनीं अशिक्षित समाजांतून आपल्या भिंती चालविणें, रेडा बोलविणें, अशा प्रकारच्या साधुत्वानें दामटीत नेलें. या

मुळें त्यांचे ग्रंथ " त्यांच्या काव्यीं गुण असो नसो " तरी आपले त्या साधुत्वाच्या श्रद्धेनें अशिक्षित लोक वाचतात, अशा प्रकारची ज्ञानोबासारख्या साधूंबद्दल व त्यांच्या काव्याबद्दल आणि भक्तीबद्दल प्रो. सा. ची समजूत असेल तर ती साफ चुकीची आहे. असलीं विधानें आधुनिक किंबहुना अंधुक विद्वानांवांचून दुसरा कोणीहि करणार नाहीं. पाश्चिमात्य विद्या शिकलेले, ते सर्व विद्वान् आणि सुशिक्षित, व या व्यतिरिक्त ते सर्व अशिक्षित, अशी प्रो. सा. ची समजूत असावी ! प्रो. सा. म्हणतात, " विद्वत्ता ही विद्वत्ताप्रचुर विस्तृत ( परंतु आटपसर ! ) ग्रंथांत दिसून येते व भक्ति ही भारूड ग्रंथांतन दिसून येते " भारूड ग्रंथ कोणते ? प्रो. सा. म्हणतात , " ज्ञानग्रहणशक्ति ज्यांची फारशी परिपक्व झालेली नसते अशा लोकांना लहान लहान काव्यें , स्फुट कविता , चुटके , उपाख्यानें, त्रोटक ओंव्या , किंवा परस्परांशीं फारसे संबद्ध नाहींत असे अभंग, हे भारुड ग्रंथ होत. " भारुड शब्दाचा प्रो. सा. च्या भाषेंत थोडक्यांत अर्थ हा कीं , गारुडी हा हातचलाखीनें लोकांना फसवतो तें गारुड आणि ढोंगी साधुकवि जें कवन करून अशिक्षित समाजाला फसवितात . तें भारुड होय . अशारीतीनें भक्त, भक्ति व त्यांचीं काव्यें यांचें विद्वत्ताप्रचुर वर्णन दिल्यावर शास्त्र या दृष्टीनें वेदांताचें विवेचन करण्याला भक्तीचा उपयोग आहे, असें कोणता मायेचा पूत म्हणणार आहे ? वेदांतविवेचनाच्या कामीं प्रोफे० सा० म्हणतात कीं, " या शास्त्रांत विषय कोणते यावेत, त्यांचा क्रम कसा असावा, त्यांतील प्रमेयें प्रमाणांनीं सिद्ध कशीं

करावीं, तीं सुलभ रीतीनें समजून देण्याकरितां काय योजना करावी, इत्यादि गोष्टींत भक्तीचा काय उपयोग होणार ? तिनें फक्त अश्रु ढाळीत व रोमांच उभारीत बसावें ! " पण प्रो० सा० स आम्ही विचारतों कीं, वऱ्हाड सर्व मिळालें, पण नवऱ्या मुलाचाच ठिकाण नाहीं, तर त्या वऱ्हाडाचा काय उपयोग ? तद्वत् विद्वानानें ग्रंथाची सर्व योजना आंखली, पण त्यांच्या अंतःकरणांत परमात्मस्वरूपाच्या स्वानुभूतीचा उदय झाला नसेल तर तो जरी विद्वान् असला, तरी शास्त्रांत मांडणी कोणाची करणार ? कोणता विषय पुढें आणून क्रमशः सांगणार ? प्रमाण प्रमेयें कशाशीं लावणार ? आणि सुलभ रीतीन समजूत तरी काय देणार ? फार तर अपरोक्ष रीतीनें घटापटाची खटपट, झटपट, लटपट, चटपट, वटवट, करीत बसणार, हेंच कीं नाही ? वेदांतग्रंथप्रतिपादनांत प्रो० सा० ची विद्वत्ता हें प्रधान अंग नव्हे, किंवा त्यांची अश्रु ढाळणारी रडकी, किंवा दांडगी तुफानी भक्ति, तसेंच सिद्धिचमत्कारांचें साधुत्व हींहि प्रधान अंगें नव्हत. तर वेदांतपर ग्रंथकार मग तो संस्कृत पंडित असो किंवा मराठी रेम्याडोक्या हरिभक्तिपरायण असो, त्याच्या अंतःकरणांत परमात्मस्वरूपाचा उदय होऊन त्याचा प्रसाद त्याच्या वाणींत उतरला असला पाहिजे. स्वानुभूति आणि प्रसाद हीं वेदांतपर ग्रंथांत मुख्य अंगें आहेत व विद्वत्ता हें उपांग आहे. दांडगी, तुफानी, अश्रु ढाळणारी, ती मुळीं खरी भक्तिच नव्हे, तर तिचा वेदांतपर ग्रंथाला कितपत उपयोग, हा प्रश्नच येथें उद्भवत नाहीं ! मराठी

साधुकवींच्या ग्रंथांना प्रोफे० सा० नाक मुरडीत, पण त्यांचे ग्रंथ मुमुक्षूंच्या नित्यपाठांत आजकाल आहेत, याचें कारण त्या ग्रंथांतील मुमुक्षूंना परमात्मतत्वाचा प्रत्यक् बोध देणारें यथार्थ निरूपण व संतांची प्रासादिक वाणी हेंच होय. हा अनुभव प्राकृत साधूंचे जे ग्रंथ मुमुक्षूंच्या पाठांत आहेत त्यांत दिसून येतो.

परमात्मतत्त्वाशीं तादात्म्य करून देणारी, ती खरी **भक्ति** होय. गुरुशिष्यांच्या अनन्यतेच्या सुखसंवादांतच तिचा उदय होतो. त्याला गुरूहि अधिकारी व स्वानुभवी पाहिजे. शिष्यहि तसाच व्यवसायात्मिका बुद्धीचा अधिकारी मुमुक्षू पाहिजे. "**चित्रं वटतरोर्मूले वृद्धाः शिष्या गुरुर्युवा। गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यास्तु च्छिन्न संशयाः**"( दक्षिणामूर्ति स्तोत्र ) अशा उपदेशानें प्राप्त होणारी भक्ति, जिला पराभक्ति, आत्मनिवेदनी भक्ति, म्हणतात, ज्या भक्तीची " **स्वस्वरूपानुसंधानं भक्तिरित्यभिधीयते** " ( विवेकचूडामणि ३२ ) अशी श्रीमत् शंकराचार्य व्याख्या करितात, " **कर्मज्ञानेभ्योऽप्यधिकतरा** " " **स्वयंफलरूपिणी** " " **अनुभवस्वरूपम्** " आणि जी " **मुख्यतस्तु महत् कृपयैव भगवत् कृपालेशाद्वा** " म्हणजे संतांच्या व देवांच्या कृपेनेंच प्राप्त होणारी, जिच्या योगानें "**पुमान् सिद्धो भवति, तृप्तोभवति, आत्मारामो भवति,** असें ज्या भक्तीचें खुद्द श्रीनारद वर्णन करितात, '**भक्त्यामामभिजानाति**' असें श्रीभगवान् सांगतात अशा प्रकारच्या प्रोफे० सा० च्या विद्वत्तेहून किती तरी उच्च अशा श्रेष्ठ भक्तीला प्रोफे. सा. हे अश्रु ढाळण्यापेक्षां जास्त किंमत न देतां तिला तट्टावर बसवून अशिक्षित समाजांतून तिची

धिंड काढतात व त्या समाजाशीं तिचें लग्न लावतात, विद्वत् समाजांत तिचें पाऊलहि शिरकूं देत नाहींत. हें पाहून प्रोफ. सा. च्या गुणग्राहकतेबद्दल हंसावें, रडावें, कां आश्चर्य करावें, हेंच समजत नाहीं! भक्तीबद्दल प्रोफे. सा. सारख्या वरच्या दर्जाच्या आधुनिक विद्वानांची जर अशी विलक्षण समज, तर खालच्या दर्जाच्या आधुनिक विद्वानांत तिचे काय धिंडवडे निघत असतील हरि जाणे! प्रोफे० सा० ना वास्तविक ज्ञानोबा, नामदेव, तुकाराम, इत्यादि साधूंचें साधुत्व आणि कवित्व मनापासून आवडत नाहींच, पण जनतेला ते परम पूज्य असल्यामुळें जनतेच्या मनाचा तर क्षोभ न व्हावा, आणि आपली अश्रद्धाहि झांकली जावी म्हणून प्रोफे० सा० ना लेखनप्रसंगीं काय काय तरी युक्ति योजाव्या लागल्या आहेत! घटकेंत त्यांचें नामसंकीर्तन, नारदादिकांचा उपदेश, सगुण साक्षात्कार, त्यांचा भक्तिरस, इत्यादि गुणांचें आविष्करण करून, त्यांना वरच्या दर्जांत घालून सौभाग्यवति करावें आणि लागलीच त्यांचें साधुत्व भिंती चालवणें, रेडा बोलवणें, इत्यादि सिद्धिचमत्कारांत लोटून व त्यांच्या भक्तीचें तट्टू अशिक्षित समाजांतून दामटीत नेऊन क्षणार्धांत त्यांना गंगाभागिरथी करावें, अशा रीतीनें इकडे बायकोला आईवरून शिवी देतदेत सासूबाईंना तुम्ही फार चांगल्या म्हणून तोंड देखली स्तुति करावी अशा प्रकारची प्रोफे० सा० ना किती तरी भाषेची कुतर ओढ करावी लागली असून त्यामुळें वाचकांना प्रोफे० सा० चं खरें मत काय हें न समजतां बुचकळ्यांत पडावें लागत आहे, याबद्दल प्रोफे० सा० ची, वाचकांची का मराठी

साधूंची कींव करावी, तेंच समजत नाहीं! एकंदरींत प्रो. सा. ना आम्ही नम्रतेनें पण स्पष्ट सांगतों कीं, खऱ्या भक्तीचा जिव्हाळा जर अंतःकरणांत नसेल, तर न्यायमीमांसातर्कव्याकरणादि शास्त्रांतील कुशाग्रतोत्पादक बुद्धि असली तरी तिचा वेदांतग्रंथ लिहिण्याच्या कामीं कांहीचाहि उपयोग नाहीं हें प्रोफे० सा० नीं लक्ष्यांत ठेवावें.

**" म्हणोनि थोरपण पऱ्हां सांडिजे । व्युत्पत्ति अवघी विसरिजे । जई जगा धाकुटें होइजे । तैं जवळीक माझी ॥ "**

(ज्ञाने ९-३७८)

असें भगवान् सांगतात, तें कशाला?

" इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन ।
न चाशुश्रूषवे वाच्यं नचमांयोऽभ्यसूयति "

(गी. १८-६७)

म्हणजे धर्मभ्रष्ट, अभक्त यांना हें शास्त्र सांगूंच नको, असें खुद्द भगवान् सांगतात, तर भक्तीवांचून नुसती विद्वत्ता वेदांतग्रंथांत काय करणार आहे? सुईच्या नेढ्यांतून राळे फेंकण्याच्या कसबाचा व्यवहारांत कांहीं उपयोग नाहीं म्हणून नाना फडणीसाकडे आलेल्या कसबी मनुष्याला नानांनीं सुया व राळे देऊन एका बाजूला फेंकीत बस म्हणून सांगितल्याची गोष्ट प्रसिद्धच आहे. तद्वत् केवळ अश्रद्धेची विद्वत्ता, आणि न्यायमीमांसादि कुशाग्रतोत्पादक शास्त्रें यांस वेदांतमार्गांत महत्व नाहीं.

प्रोफे० सा० म्हणतात, मराठी साधु कवींचे ग्रंथ हे अज्ञान समाजाला झेंपणारे भारुड ग्रंथ असून ते

त्रोटक चुटके, स्फुटें, उपाख्यानें, असे असतात. यावरून नाथांनीं केलेला तव्वल ओझ्याचा ग्रंथ भावार्थरामायण, भागवत, समर्थांचे समग्र ग्रंथ रंगनाथी योगवासि , इत्यादि हे सर्व त्रोटक चुटके व असंबद्ध स्फुटेंच समजावयाचीं काय ? उलट पक्षीं आचार्यांनीं केलेली चर्पटपंजरी, आत्म-बोध, तत्त्वोपदेश, इत्यादि काव्यें त्रोटक नाहींत काय ? वास्तविक मराठी भारुडांतील एकेक ओंवी किंवा अभंग सूत्रमय असतो. परमार्थांत तसा प्रपंचांतहि मनुष्याला त्याचा संकटकाळीं व इतर प्रसंगीं मोठा आधार असतो.

**" आलीया भोगासी असावें सादर "**

**" ठेविलें अनंतें तैसेंची रहावें "**

**" तुका म्हणे नाहीं चालत तांतडी "**

इत्यादि शेंकडों सूत्रांचा समाधानीला अज्ञान्यांत तसा विद्वानांतहि कोटेशनला उपयोग करतात यावरून या प्रासादिक वाणींतून निघालेल्या भारुडांची किंमत कमी समजतां येत नाहीं ! प्रो० सा० यांनां असंबद्ध म्हणतात, हें आश्चर्य होय ! ताकांतून लोणी हें जसें सार निघतें, तद्वत् मराठी साधुकवींच्या त्रोटक अशा प्रत्येक स्फुट अभंग, ओंवी, इत्यादिकांतून वेदांताचें सर्व सार भरलेलें आहे. केशवस्वामी, रंगनाथस्वामी, सोहिरोबा, समर्थ, नाथ, नामदेव तुकाराम, इत्यादिकांचीं श्लोकअभंगादि स्फुटें, भारुडें समर्थांचे मनाचेश्लोक इ० हीं प्रो० सा० सारख्या विद्वानालाहि चटका लावून सोडतात ! या स्फुटांचा उकल करण्याला वेदोपनिषदें आधाराला आणावीं . लागतात. कारण

नं.
ना.

त्यांतील सार सर्व या स्फुटांत असलें, अंशम सारभूत त्रोटक चुटक्यांनीं व स्फुटांनीं मागल्यापुढल्या संदर्भासकट प्रो० सा० पुढें यावें, तेव्हांच प्रो० सा० त्यांना संबद्ध म्हणणार, नाहीं तर तीं असंबद्ध, अर्थात् लोण्यानें गाय, दूध, दहीं, ताक, इत्यादि परिवारासकट पुढें यावें तरच तें संबद्ध, नाहीं तर लोणी असंबद्ध, असें म्हणण्या-प्रमाणेंच या स्फुटांना असंबद्ध म्हणणें हास्यापद नव्हे काय? प्रो० सा० म्हणतात, " खटपटीचा व सज्ञानपणाच्या अव-श्यकतेचा कर्ममार्ग मागें पडला, व सोपा आणि अडाणी-पणामध्यें ही समजण्याला शक्य असा भक्तिपंथ पुढें सरसा-वला "! पण कर्ममार्ग केवळ चित्तशुद्धीच्याच अवश्यकते-चा आहे. श्रीमच्छंकराचार्य म्हणतातः—

> अमृतत्त्वस्य नाशास्ति वित्तेनेत्येव हि श्रुतिः
> ब्रवीति कर्मणो मुक्तेरहेतुत्वं स्फुटं यतः ७
> चित्तस्य शुद्धये कर्म न तु वस्तूपलब्धये ११
>
> ( विवेकचूडामणि. )

सारांश. चित्तशुद्धीलाच कर्माची अवश्यकता असून भक्तीला आत्मज्ञानाची अवश्यकता आहे, आत्मज्ञानावांचून आत्मनिवेदनी भक्तिच होत नाहीं हें वर आम्ही दाखविलेंच आहे, त्यावरून भक्तीची योग्यताच श्रेष्ठ ठरते. भक्ति ही विद्वानांना मात्र अति दुर्लभ आहे, कारण भक्ताला अभिमानगलित व्हावें लागतें व तें विद्वानांच्या हातून होणें शक्य नाहीं !

> " नवल अहंकाराची गोठी । विशेषें लागे सज्ञानापाठीं ।
> सज्ञानाचे झोंबे कंठीं । नाना संकटीं नाचवी "!
>
> ( श्रीज्ञाने. १३–८२ )

यावरून प्रोफेसर साहेब! भक्ति सोपी का कर्म सोपें सांगा पाहूं?

प्रो. सा. नीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें काव्य प्रतिभासंपन्न, विद्वत्तापूर्ण व प्रेमळपणानें भरलें आहे असें प्रतिपादन केलें आहे. हें ज्ञानोबांचें सुदैवच होय! पण न्यायमीमांसादिशास्त्रांबद्दल ज्ञानोबांचा अभिप्राय येथें दिला, तर तेहि प्रो. सा. च्या मतें कमी दर्जांत येतील. ज्ञानोबांनीं एकट्यांनींच प्रो. सा. च्या कृपेला पात्र व्हावें, हें आम्हालाहि वैषम्यच वाटतें! म्हणून तो अभिप्राय येथें देणें अवश्य आहे:—

"पैं व्याकरणीं चोखडा। तर्कीं अतिगाढा।
परी एक आत्मज्ञानीं फुडा। जात्यंध तो ८३४

तें एक वांचूनि आघवां शास्त्रीं। सिद्धांत निर्माण धात्री
परी जळो तें मूळ नक्षत्रीं। न पाहें गा ८३५

तैसें शास्त्रजात जाण। आघवेंचि अप्रमाण।
पार्था अध्यात्मज्ञानेंवीण। एकलेनी" ८३९

(ज्ञाने० १३)

यावरून ज्ञानोबाहि प्रो. सा. च्या मतें खालच्या दर्जांत आलेच पाहिजेत!

वेदांत ग्रंथ कसा लिहावा, याची मराठी साधूंना कल्पनाहि नव्हती अशी प्रो. सा. ची समजूत आहे. पण ती चुकीची असल्याबद्दल अनेक मराठी साधु कवींचे उतारे

विस्तारभयास्तव येथें न देतां फक्त समर्थांचे ग्रंथांतून येथें कांहीं ओंव्या मासल्यासाठीं देतों. वेदांतपर ग्रंथांला प्रासादिक वाणी पाहिजे त्याचें वर्णन :–

“ जया अंतरीं भगवंत । अचल राहिला निवांत ।
तो स्वभावें जें बोलत । तें ब्रह्मनिरूपण २५
अंतरीं बैसला गोविंद । तेणें लागला भक्तिछंद ।
भक्तीवीण अनुवाद । आणीक नाहीं २६
त्याचे भक्तीचें कौतुक । यानांव प्रासादिक ।
सहज बोलतां विवेक । प्रगट होय ३४

अशा प्रासादिक वाणींतून निघणारें कवित्व कसें असावें त्याचें वर्णन समर्थांनीं सविस्तर दिलें आहे त्यांतील थोडकाच मासला देतों. समग्र वर्णन दासबोध दशक १४ समास ३ यांत व अन्यत्राहि आहे.

कवित्व असावें निर्मळ । कवित्व असावें रसाळ ।
कवित्व असावें प्रांजळ । अन्वयाचें ३६
कवित्व असावें भक्तीबळें । कवित्व असावें अर्थागळें ।
कवित्व असावें वेगळें । अहंतेसी ३७
कवित्व असावें सोपें । कवित्व असावें अल्परूपें ।
कवित्व असावें प्रज्ञासाक्षेपें । प्रबंधाचें ३९
नाना युक्ति नाना बुद्धि । नाना कळा नाना सिद्धि ।
नाना अर्थान्वय साधी । या नांव कवित्व ४२
नाना साहित्य नाना दृष्टांत । नाना तर्क धातुमत ।
नाना संमति सिद्धांत । पूर्वपक्षेसी ॥ ४३

शंका आशंका प्रत्युत्तरें । नाना वाक्यें शास्त्राधारें ।
तुटे संशय निर्धारें । निर्धारितां ४९

जेणें देहबुद्धि तुटे । जेणें भवसिंधु आटे ।
जेणें भगवंत भेटे । या नांव कवित्व ५०

जेणें सद्वस्तु भासे । जेण भास हा निरसे ।
जेणें भिन्नत्व नासे । या नांव कवित्व ५२

जेणें सद्बुद्धि लागे । जेणें पाषांड भंगे ।
जेणें विवेक जागे । या नांव कवित्व ५१

जेणें होय समाधान । जेणें तुटे संसारबंधन ।
जयास मानिती सज्जन । या नांव कवित्व ५३

ऐसें कवित्वलक्षण । सांगतां तें असाधारण ।
परंतु कांहींएक निरूपण । बुझावया केलें ५४

(दास १४-३)

कवित्व कसें असावें याबद्दल जे वर विचार समर्थांच्या ग्रंथांतून थोडक्यांत दिले आहेत, तसेच त्यांच्या हातून प्रासादिक ग्रंथ निर्माण झालेले महाराष्ट्रास विदित आहेतच. मराठी साधुकवींच्या प्रासादिक ग्रंथांकडे ते प्राकृत ह्मणून पहावयाचे नाहींत, अशी आधुनिक विद्वानांप्रमाणें जुन्या शास्त्रीपंडितांची- हि समज आहे खुद्द नाथांचे चिरंजीव हरिशास्त्री नाथांच्या ंथांकडे ढुंकून पहात नसत. पण काशीच्या पंडितांना जेव्हां ग्रंथ पाहून मान डोलवावी लागली तेव्हां हरिशास्त्र्यांचे डोळे घडले. सारांश, मराठी साधुकवींच्या ग्रंथांना विद्वानांनीं नाक रडणें आजकालचें नसून पूर्वापार आहे. पण त्याचा शेवट त्र पश्चातापांत आहे.

मराठी साधुकवींच्या साधुत्वाची, काव्याची व भक्तीची अशा रीतीनें बोळवण केल्यावर प्रोफे० सा० नीं वेदांतपर ग्रंथ हल्लींच्या काळीं कसे तयार व्हावे याबद्दल एक गोडसें सारभूत 'सरमन' दिलें आहे ! पहिल्यानें एक निर्विवाद गोष्ट सांगितली आहे कीं, 'वेदांतविवेचनाला पद्यरचनेपेक्षां गद्य रचना विशेष चांगली हें सूचना देऊन आतां सांगण्याची जरूर नाहीं, कारण आजकाल तूं आपला ग्रंथ ओवींमध्यें किंवा अभंगांत लिही, असें आग्रहानें कोणाला सांगितलें तरी तो ऐकणार नाहीं !' पण हे प्रोफे० सा० चें म्हणणें सपशेल चुकीचें आहे ! विस्तृत आणि स्पष्ट खुलासा होण्याकरतां गद्यरचना चांगली खरी, पण अधिकारी पुरुषानें मुमुक्षूंकरितां जे निर्विवाद ग्रंथ लिहावयाचे ते पद्यरचनेंत लिहिण्याची जी पूर्वपरंपरा आहे तीच यथायोग्य आहे. वेदोपानिषदें, भारत, रामायण व मराठी साधुसंतांचे ग्रंथ हे पद्यरचनेंत झाले आहेत याचें कारण हें कीं पद्यरचना ही सूत्रमय असून मुमुक्षूंच्या पाठांत रहात असल्यानें त्या ग्रंथांना दीर्घायुत्व येतें म्हणून कोणतेहि त्रिकालाबाधित सिद्धांत हे पद्यरचनेंतच असणें अवश्य आहे. वेदशास्त्र, वैद्यशास्त्र, ज्योतिषशास्त्र, त्याचप्रमाणें वेदांतशास्त्रहि पद्यरचनेंतच पूर्वापार असल्यानें पठणानें तोंडपाठ होऊन तें पाठकांच्या रोमारोमांतून भिडून हाडीं खिळतें व अशा रीतीनें या उपयुक्त विद्या परंपरेनें जिवंत राहतात, हें निर्विवाद आहे. हल्लीं वेदांत ग्रंथ पद्यांत लिहिण्याला कोणाला आग्रहानें सांगितलें तरी लिहिणार नाहीं असें प्रो. सा. ह्मणतात तें खरें, पण त्याचें कारण मात्र गद्यरचना उपयुक्त आहे ह्मणून नव्हे, तर लिहिणाराचा

शंका आशंका प्रत्युत्तरें । नाना वाक्यें शास्त्राधारें ।
तुटे संशय निर्धारें । निर्धारितां ४४

जेणें देहबुद्धि तुटे । जेणें भवसिंधु आटे ।
जेणें भगवंत भेटे । या नांव कवित्व ५०

जेणें सद्वस्तु भासे । जेण भास हा निरसे ।
जेणें भिन्नत्व नासे । या नांव कवित्व ५२

जेणें सद्बुद्धि लागे । जेणें पाषांड भंगे ।
जेणें विवेक जागे । या नांव कवित्व ५१

जेणें होय समाधान । जेणें तुटे संसारबंधन ।
जयास मानिती सज्जन । या नांव कवित्व ५३

ऐसें कवित्वलक्षण । सांगतां तें असाधारण ।
परंतु कांहींएक निरूपण । बुझावया केलें ५४

(दास १४–३)

कवित्व कसें असावें याबद्दल जे वर विचार समर्थांच्या ग्रंथांतून थोडक्यांत दिले आहेत, तसेच त्यांच्या हातून प्रासादिक ग्रंथ निर्माण झालेले महाराष्ट्रास विदित आहेतच. मराठी साधुकवींच्या प्रासादिक ग्रंथांकडे ते प्राकृत म्हणून पहावयाचे नाहींत, अशी आधुनिक विद्वानांप्रमाणें जुन्या शास्त्रीपंडितांचीहि समज आहे खुद्द नाथांचे चिरंजीव हरिशास्त्री नाथांच्या ग्रंथांकडे ढुंकून पहात नसत. पण काशीच्या पंडितांना जेव्हां ते ग्रंथ पाहून मान डोलवावी लागली तेव्हां हरिशास्त्र्यांचे डोळे उघडले. सारांश, मराठी साधुकवींच्या ग्रंथांना विद्वानांनीं नाक मुरडणें आजकालचें नसून पूर्वापार आहे. पण त्याचा शेवट मात्र पश्चातापांत आहे.

मराठी साधुकवींच्या साधुत्वाची, काव्याची व भक्तीची अशा रीतीनें बोळवण केल्यावर प्रोफे० सा० नीं वेदांतपर ग्रंथ हल्लींच्या काळीं कसे तयार व्हावे याबद्दल एक गोडसें सारभूत 'सरमन' दिलें आहे! पहिल्यानें एक निर्विवाद गोष्ट सांगितली आहे कीं, 'वेदांतविवेचनाला पद्यरचनेपेक्षां गद्य रचना विशेष चांगली हें सूचना देऊन आतां सांगण्याची जरूर नाहीं, कारण आजकाल तूं आपला ग्रंथ ओंवीमध्यें किंवा अभंगांत लिही, असें आग्रहानें कोणाला सांगितलें तरी तो ऐकणार नाहीं!' पण हे प्रोफे० सा० चें म्हणणें सपशेल चुकीचें आहे! विस्तृत आणि स्पष्ट खुलासा होण्याकरतां गद्यरचना चांगली खरी, पण अधिकारी पुरुषानें मुमुक्षूंकरितां जे निर्विवाद ग्रंथ लिहावयाचे ते पद्यरचनेंत लिहिण्याची जी पूर्वपरंपरा आहे तीच यथायोग्य आहे. वेदोपनिषदें, भारत, रामायण व मराठी साधुसंतांचे ग्रंथ हे पद्यरचनेंत झाले आहेत याचें कारण हें कीं पद्यरचना ही सूत्रमय असून मुमुक्षूंच्या पाठांत रहात असल्यानें त्या ग्रंथांना दीर्घायुत्व येतें म्हणून कोणतेहि त्रिकालाबाधित सिद्धांत हे पद्यरचनेंतच असणें अवश्य आहे. वेदशास्त्र, वैद्यशास्त्र, ज्योतिषशास्त्र, त्याचप्रमाणें वेदांतशास्त्रहि पद्यरचनेंतच पूर्वापार असल्यानें पठणानें तोंडपाठ होऊन तें पाठकांच्या रोमारोमांतून भिडून हाडीं खिळतें व अशा रीतीनें या उपयुक्त विद्या परंपरेनें जिवंत राहतात, हें निर्विवाद आहे. हल्लीं वेदांत ग्रंथ पद्यांत लिहिण्याला कोणाला आग्रहानें सांगितलें तरी लिहिणार नाहीं असें प्रो. सा. ह्मणतात तें खरें, पण त्याचें कारण मात्र गद्यरचना उपयुक्त आहे ह्मणून नव्हे, तर लिहिणाराचा

कुमकुवतपणा होय ! अध्यात्मशास्त्र हें सर्व शास्त्रांहून श्रेष्ठ व आद्य आहे! तत्संबंधी ग्रंथ पद्य वा गद्य लिहिण्याला परमात्म्याच्या स्वानुभूतीचा प्रसाद वाणींत उतरल्याशिवाय मुमुक्षूंना उपयुक्त, सर्वांगसुंदर व सिद्धांतपर असा अधिकारयुक्त वाणीनें लिहितां येणें शक्यच नाहीं व अनधिकारी पुरुषानें लिहिलेला ग्रंथ सांप्रदाय पद्धतीवांचून लिहिला गेला असेल, तर नित्यवाचनांत आधारभूत म्हणून येणें शक्यच नाहीं. असे आत्मसाक्षात्कारी भक्तिमान् पुरुष आजकालच्या आधुनिक काळांतील विद्वानांत कोण आहेत ? आजकालच्या पद्यरचना करणाऱ्या आधुनिक विद्वानांच्या काव्यांची धांव तर 'गुलबशीचें फूल, गुलाब, भृंग, मधमाशी, धबधबा तारकापुंज उद्यान, वनवास, चंद्रकिरण, उषःकाल, संध्याराग, वटवाघूळ, केरसुणी' इत्यादि भ्रामक व नश्वर वस्तूंच्या पलीकडे फारशी जातच नाहीं. त्याच प्रमाणें गद्यरचना नाटकें, कादंबऱ्या, विनोदी लेख, भाषाशास्त्र, इतिहास, टीका, सुधारणा, राजकारण, यांच्या पलीकडील उच्च, निरंतर, शाश्वत अशा अध्यात्मविचारांचें नांवच घेत नाहीं ! याच वाङ्मयसेवेंत नरजन्माची इतिश्री करावी, करमणुक करून घेऊन जिवाला रंजवावें व काळ घालवावा हेंच ध्येय आजकालच्या विद्वानांपुढें आहे. इतक्यांतून कोणी वेदांताकडे वळलाच तर परमात्मतत्त्व सत्य आहे किंवा नाहीं, या मुख्य मुद्याबद्दलच त्याच्या मनाची धरसोड असणार ! सारांश, वेदांतपर ग्रंथ ज्ञानेश्वर, समर्थ, मुकुंदराज, एकनाथ, इत्यादि संतांसारखे अधिकारी कोणी असतील तर मग त्यांनीं पद्य कां गद्य लिहावा, हा प्रश्न आणि तो मग त्यांच्याच स्फूर्तीवर राहणार हें उघड आहे.

वेदांतावर तुटक, त्रोटक चुटके लिहिण्याचें बंद केलें पाहिजे असें प्रोफे० सा० म्हणतात, पण मुमुक्षूंच्या मनाला चटका लावणारे हे त्रोटक आणि तुटक चुटचुटीत चुटके सत्पुरुषांच्या स्वानुभूतीच्या स्वच्छंदांतील सहजोद्गार असल्यानें ते अत्युच्च विचाराला साह्यभूत होऊन परमात्म्याशीं तेव्हांच तादात्म्य करतात. सबब अशा प्रकारच्या तुटक, त्रोटक चुटक्यांना मज्जाव करणें वाजवी नाहीं !

" कोठला तरी अभंग अगर ओंवी घेऊन आपला सिद्धांत प्रस्थापित करावा, ही पद्धतहि फारशी चांगली नाहीं. कारण एक अभंग एका अर्थाचा असला तर दुसरा त्याच्या उलट अर्थाचा दाखवून देतां येत असतो. यामुळें खऱ्या सिद्धांताचा निश्चय करणें कठीण पडतें. " असें प्रो. मा. चें ह्मणणें आहे. पण तेंहि चुकीचें आहे. सिद्धांत प्रतिपादन करणारा हा प्रामाणिकपणानें आपला सिद्धांत प्रथमतः स्वतःच्या बुद्धीनें प्रस्थापित करतो व त्या सिद्धांतावर स्वानुभवी संतांच्या तेजस्वी वाणींतील वचनांच्या आधाराचा शिक्कामोर्तब करून मखलाशी करीत असतो. एरव्हीं त्या सिद्धांताला बळकटी येत नाहीं. आतां एकाच्या उलट दुसरें वचन असतें, हें खरें. पण तें निरनिराळ्या प्रसंगाला अनुसरून असतें. ह्मणून ज्याप्रमाणें कृष्णा-कोयनेचा प्रवाह निरनिराळ्या प्रांतांतून पण एकाच पर्वतांतून एकमेकांविरुद्ध दिशेनें आलेला दिसला, तरी त्यांचा नुसता संगमच नसून प्रीतिसंगम होऊन एकाच समुद्राला मिळतो तद्वत् वेदांतांतील वेदोक्त पण भिन्न भिन्न अर्थाचीं वचनें निरनिराळ्या प्रसंगानुरूप एकमेकांविरुद्ध दिसलीं तरी सर्व वचनांच्या अर्थाचे ओघ परिणामीं एकाच परमात्मस्वरूपाच्या

बोधांत मिळून जातात. समोरासमोर तोंड करून चार दिशेला बांधलेल्या चार गाईंना जर चारा एके ठिकाणीं घालतां येतो, तर चार दिशेला तोंड असल्यानें काहीं विरोध येत नाहीं, तद्वत् शद्वार्थानें जरी विरोधवाक्यें निरनिराळीं दिसलीं, तरी रहस्यार्थानें जर तीं एक असलीं तर तो विरोध नव्हे. परमात्मतत्त्व " अणोरणीयान् " आणि " महतो महीयान् " आहे, या दोन्ही वाक्यांत शब्दार्थानें भेद असला तरी रहस्यार्थानें तीं एकच आहेत. पृथ्वीप्रदक्षिणला पूर्वेकडून पश्चिमेकडे जा किंवा पश्चिमेकडून पूर्वेकडे जा, दिशांचा विरोध दिसला, तरी येणार एकाच पूर्वस्थलावर. म्हणून " **वेद शास्त्र श्रुति स्मृति । तेथें वाक्यभेद दिसती । ते सर्वहि निवडती । सद्‌गुरूचेनि वचनें २६ पूर्वपक्ष आणि सिद्धांत । शास्त्रीं बोलिला संकेत । त्याचा होय निश्चितार्थ । साधुमुखें** " ( दास. ६–२–२८ ) एकंदरींत प्रोफे० सा० ना जी विरोधी वाक्यांची अडचण वाटते तशी ती नाहीं. वेदोपनिषदांमध्येंहि अशीं परस्परविरोधी वाक्यें असल्याचें प्रोफे० सा० कबूलच करतात. प्रोफे० सा० जेव्हां सांप्रदायदीक्षा घेऊन वेदांताकडे पहातील, तेव्हां त्यांना ही अडचण भासणार नाहीं !

प्रोफे० सा० म्हणतात, " आपल्यांत आणि विशेषतः आपल्या वेदांतांत गडबडगुंडा आधींच झालेला आहे. त्यांत नवीन ग्रंथकारांनीं जास्त भर घातली नाहीं तर त्यांना कोणी रागावणार नाहीं " ! गोष्ट अगदीं खरी आहे ! पण ती निम्मे खरी व निम्मे खोटी आहे ! आपण जरी गुंडे असलों, तरी आपल्यांत गडबडगुंडा

झालेला आहे हें खरें; परंतु गुंड्या वेदांतांत गडबड उ-
डण्याचें कारण नाहीं ! आपल्या दृष्टीचा गडबडगुंडा
झाला. कीं तो आपला दोष दृश्य पदार्थावर लादणें म्हणजे
काविळीनें आपल्याला जग पिवळें दिसलें म्हणून जगच
पिवळें, आपले डोळे पिवळे नसून स्फटिकासारखे शुभ्र
आहेत असें मानण्यासारखेंच हें हास्यकारक होय !
कारण " **ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवोब्रह्मैव ना परः** " हा
वेदांत इतका सत्य आणि त्रिकालाबाधित आहे कीं
त्यांत गडबडगुंडा होण्याचें कारणच नाहीं ! स्वात्मा-
नुभवी संतांनीं लिहिलेले वेदांतपर **ग्रंथ** सांप्रदायपद्धति
सोडून केवळ आपण परीक्षण करणारे जिज्ञासू म्हणून
विलायती चष्म्यांतून ते पाहूं लागलों तर आपला गडबड-
गुंडा उडून 'अति शहाण्याचा बैल पुन्हां रिकामा' असें
होणें स्वाभाविक आहे ! परंतु आपला दोष त्या वेदांत
ग्रंथांवर लादणें योग्य नाहीं ! जे **ग्रंथ** अनुभवाच्या क-
सोटीला उतरणार नाहींत असे वेदांतपर **ग्रंथ** मुमुक्षूंच्या
पाठांत असल्याचें दिसून येत नाहीं. प्रोफे. सा. स कोण-
त्या वेदांतग्रंथांत गडबडगुंडा दिसतो तें त्यांनीं कृपा
करून प्रसिद्ध केलें तर लोकांवर उपकार होतील !

स्वात्मानुभवी संतांनीं लिहिलेल्या ग्रंथांसंबंधानें आप-
ल्या अंतःकरणाचा गडबडगुंडा उडण्याचें कारण, पाश्चि-
मात्य शिक्षण होय. लहानपणापासून या शिक्षणाचें बाळ
कडू मिळूं लागल्यानें पूर्वपरंपरेचे संस्कार पार नष्ट होतात
व इंग्रजी शिक्षणानें चवचालपणा येतो तो चौकसपणा-
सारखा वाटून आपली बुद्धि आतां कुशाग्रतोत्पादक झाली

असें वाटूं लागतें. त्या चत्रचाल बुद्धीला मग तत्त्वज्ञान वाचावेंसें वाटूं लागलें तर स्पेन्सर, क्यॅन्ट, शोपेन-हॉर, इत्यादि पाश्चिमात्य तत्त्ववेत्यांचे तर्कप्रतिष्ठित पण अननुभवी ग्रंथ प्रथम हातीं येतात. त्यांच्या वाचनानें विघातक अशी चिकित्साबुद्धि उत्पन्न होऊन ती हाडीं खिळते. आपले वेदांतपर ग्रंथ अधिकारी पुरुषाला शरण जाऊन त्याच्या मुखानें श्रवण करावयाचे असतांना ती पद्धत सोडून कुशाग्रतोत्पादक विलायती चष्म्यानें परीक्षण कर-ण्याच्या दृष्टीनें अर्थात् केवळ दोषैकदृष्टीनें पहाण्याची संवय लागल्यामुळें त्या दृष्टीला मग त्या ग्रंथांत सर्वत्र गड-बड गुंडा दिसतो ! पण हा आपल्या दृष्टीचा दोष आहे, हें कांहीं त्याच्या लक्ष्यांत येत नाहीं ! सांप्रदाय-परंपरेनें श्रवण, मनन, निदिध्यास, तसेंच भजन, पूजन, आत्मनिवेदनादि नित्यनैमित्तिक कर्म ईश्वरार्पण करून आपण कर्मांत असून कर्मातीत " **न मां कर्माणि लिंपंति** " कसे आहोंत तें समजून घेऊन सहज, सरळ आणि सुखावह मार्गानें मोक्ष प्राप्त करून घेण्याचा मार्ग खुंटतो आणि सर्व गडबडगुंडा उडतो ! वेदांत ग्रंथांत गडबडगुंडा असण्याचें कारण नाहीं. विलायती विघातक चिकित्सा एकदां बुद्धींत शिरली ह्मणजे ती कोठपर्यंत जाईल याचा नेमच नाहीं. ' नामस्मरणाच्या बडबडीनें काय होणार आहे ' ? अरे ! घेण्याची संवय करून तें पचनीं तर पाडून पहा ! पण वळणच सुटलें तें पुन्हां लागणार कसें ? बापाची आज्ञा व्यक्तिस्वातंत्र्याच्या दृष्टीनें पाहिलें तर कां पाळावी या चिकित्सेनें बापापरी बाप रुष्ट झाला आणि व्यवहारशून्य

तेच्या शिक्याचा डाग पडला ! संध्येचा अर्थ समजल्यावांचून संध्या कां करावी अशा चिकित्सेनें संध्या लहानपणापासून कायद्याबाहेर गेली आणि अर्थहि गेला ! अशा रीतीनें आचारांत आणि विचारांत, तसाच वेदांतासंबंधानेंहि आपल्यांत मात्र गड-बडगुंडा उडून ' **तेल गेलें तूप गेलें आणि धुपाटणें हातीं आलें** " असें झालें आहे ! राजस, गोंडस आणि सात समुद्र ओलांडून तमसानदींतून आलेली म्हणून परिणामीं तामस अशी ही पाश्चिमात्य विद्या जी आपल्याला स्वतंत्रता देण्या-करतां इकडे अवतरली व आमच्या रोमरोमांत शिरून जिनें आपल्याच तंत्रानें वागण्याची व्यक्ति आणि मतस्वातंत्र्याची स्वतंत्रता आपल्यास दिली, ती पाश्चिमात्य विद्या, अविद्या-रूपानें आधुनिक विद्वानांच्या अंतःकरणांत शिरली. तिनें सांप्रदायपद्धतीनें वेदांतग्रंथ श्रवण करण्याची परंपरा मोड-ल्यामुळें आधुनिक विद्वानांच्या मनाचाच मुळीं वेदांततत्त्वा-संबंधानें गडबडगुंडा झाला आहे !

प्रोफे० सा० म्हणतात, " वेदांतग्रंथ हे लोकांना घोंटा-ळ्यांत घालण्यासाठीं नसून घोंटाळ्यांतून लोकांना काढण्या-साठीं आहेत. हें ध्येय पुढें ठेवून ग्रंथ केला पाहिजे. " हें म्हणणें अगदीं बरोबर आहे आणि विद्वानांनीं नव्हे, तर संस्कृत व मराठी साधुसंतांनीं केलेले संस्कृत प्राकृत ग्रंथ अगदीं असेच आहेत ! आधुनिक विद्वानांना त्यांत घोंटाळा दिसत असेल, तर तो दृष्टीचा दोष आहे. जे ग्रंथ केवळ न्यायमीमांसातर्कप्रतिष्ठादिकांच्या विद्वत्तेवर रचलेले आहेत, ते व्यवस्थित, आटपसर, पद्धतशीर दिसले, तरी त्यांत स्वानु-भूतीचा अंश नसल्यामुळें त्यांत मात्र घोंटाळा उडालेला

आहे, ही गोष्ट खरी आहे. याचें उदाहरण पहाण्याला फार दूर जाण्याला नको. प्रोफे० सा० च्या या शास्त्रीय पद्धतीनें लिहिलेल्या लेखांतच आम्हां अविद्वानांना तरी घोंटाळा दिसतो ! ज्या ज्ञानेश्वरमहाराजांसारख्या प्रतिभासंपन्न साधूंच्या भक्तींत प्रोफे० सा० ना प्रथम नामसंकीर्तन, नारदादिकांचा उपदेश, सगुण साक्षात्कार दिसतो, व त्यामुळें ज्यांचें काव्य अप्रतिम, रसहानि नसलेलें असें प्रोफे० सा० ना दिसतें, तीच भक्ती घटकेंत सोपी, केवळ अश्रु ढाळणारी, रडकी, रोमांच उभे करणारी, तर लागलीच ती फुशारकी मारणारी, संस्कृताचा व वेदाध्ययनादिकांचा उघड उघड उपमर्द, अनादर व बेपर्वाई करणारी तसेंच तिच्यांतं दांडगा गुण, तुफानी वेग दिसावा, ती भक्ती आपलें तट्टू अशिक्षित समाजांत दामटीत आहे असें दिसावें, त्या भक्तीनें ज साधुत्व येतें त्याचे योगानें साधूंच्या अंगांत भिंती चालवणें, रेडा बोलवणें, अशाप्रकारची शक्ति उत्पन्न होऊन "त्यांच्या काव्यीं गुण असो नसो" तरी त्या सिद्धिसामर्थ्यावरच त्या साधूंचे ग्रंथ अशिक्षित समाजांत प्रसृत होत असल्याचें दिसावें, अशा प्रकारचा या लेखांत चक्रवाढव्याजानें वाढत जाणारा घोंटाळा आम्हांसारख्या अडाण्यांना कां दिसावा ? प्रो. सा. च्या या धरसोडी लेखावरून आम्हांसारख्या अप्रबुद्धांनीं भक्तिपंथाबद्दल व साधुत्वाबद्दल काय निष्कर्ष काढावा ? किंवा प्रोफे० सा० चा हा लेख केवळ विद्वानांच्याच मनोरंजनाकरतां त्यांनीं लिहिला असल्यामुळें आम्हाला तिकडे पहाण्याचाच अधिकार नाहीं ? कित्येक म्हणतात प्रोफे० सा० च्या विद्वत्तापूर्ण लेखांतील मख्या भलत्यालाच कळावयाच्या नाहींत. तें तत्त्वच न्यारें ! असल

कदाचित. पण वेदांतासारख्या गहन आणि परम पवित्र विषयांत या मख्या आणि पोटांत एक, ओठांत दुसरें आणि कृतींत तिसरेंच, असें असेल, तर प्रोफे० सा० च्या हातून असें होणें योग्य आहे काय? विद्वत्ता-प्रचुर विनोद, भाषेचें सौंदर्य, मख्या दाखवावयाच्या असतील, तर त्याला इहलौकिक विषय पुष्कळ आहेत. वेदांतासारख्या पवित्र गंभीर विषयांत अतिक्रमण कां करावें?

प्रोफे० सा० म्हणतात "शास्त्र हें कांहीं कोणाचे घरचें नाहीं. मनुष्याच्या बुद्धीच्या आकलनशक्तीप्रमाणें प्रत्येकाच्या बुद्धीला जितकें कांहीं नवीन सुचेल, तितकी त्यांत भर घालून तें वृद्धिंगत करावयाचें, अशी वृत्ति असली म्हणजे स्वाभाविकपणेंच त्या शास्त्राला प्रामाणिकपणा येतो." हें म्हणणें अगदीं बरोबर आहे. पण हें भौतिक शास्त्रांनाच लागू आहे. अध्यात्मशास्त्राला लागू नाहीं. भौतिकशास्त्रें हीं आमच्या घरचीं नाहींत. कारण आपणच जर वास्तविक सृष्टि किंवा सृष्टपदार्थ यांपैकीं कांहींच नव्हे, प्रत्यक्ष शरीरहि आपल्या घरचें नसून कालाधीन आहे, तर हीं भौतिकशास्त्रें आमच्या घरचीं कशीं म्हणतां येतील? अर्थात् भौतिकशास्त्रें हीं सृष्टिकर्त्या परमेश्वराच्या घरचीं असून परमेश्वर जशी बुद्धि देईल त्याप्रमाणें नवीन नवीन शोध लावून त्या शास्त्रांत भर घालावी, हें मानवी जन्मास आलेल्या प्रत्येकाचें त्यांतही विशेषेंकरून प्रोफे० सा० सारख्या विद्वानांचें अवश्य कर्तव्य होय. पण अध्यात्मशास्त्राची गोष्ट भौतिकशास्त्रांहून फार वेगळी आहे. अध्यात्मशास्त्र हें जसें परमेश्वराच्या घरचें तसेंच तें खुद्द आमच्याहि घरचें आहे. इतकेंच नव्हे,

तर अध्यात्मशास्त्राच्या साह्यानें जें शुद्धबुद्ध स्वयमेव असें तत्त्व जाणावयाचें तें तर मूर्तिमंत आपणच असल्यामुळें आमच्या जवळच्या मंडळींनीं म्हणजे मनश्चक्षुरादिकांनीं सत्समागमाच्या साह्यानें अध्यात्माची एकदां ओळख करून घेतली कीं, ज्ञान, भक्ति, वैराग्य न सांगतां पाठी लागतें ! अशाप्रकारचें हें शास्त्र मूळचेंच आत्म-स्वरूप, आनंदरूप, सुखरूप आहे. तें मूळचेंच, प्रमाण-शीर प्रामाणिक आहे, तर त्यांत भर कोठून, कशाची, कशी व कोणी घालावयाची ? जें आध्यात्मिक तत्त्व **स्वयंयोगसंसिद्ध** व **"प्रत्यक्षावगमं धर्म्यं ससुखं कर्तुमव्ययम्"** ( गी० ९-२ ) असें आहे, तें प्रमाणांनीं सिद्ध काय करावयाचें ! प्रत्यक्षाला प्रमाण तें कशाला पाहिजे ? हातच्या कंकणाला आरशाची काय जरूर आहे ? आतां 'भ्रांतिकृत चमत्कार' मात्र असा झाला आहे कीं जें आपलें ज्ञान—आत्मज्ञान–तें आपल्याला पारखें व अप्रत्यक्ष झालें आहे आणि ज्या भौतिकाचें अस्तित्व आणि सत्यत्व केवळ ज्ञानेंद्रियपंचकावरच अवलंबून आहे, म्हणजे ज्ञानेंद्रियांनीं दाखवावें तेव्हांच जें सत्य भासतें, तें आपल्याला प्रत्यक्ष असें वाटत आहे ! बरें, या ज्ञानें-द्रियांचें अस्तित्व तरी अंत:करणपंचक व प्राणपंचकावर आणि अंत:करण व प्राण हे मिथ्यासृष्टींतील अनुक्रमें आकाश आणि 'आकाशात वायुः' या तत्वांतून आलेले. आकाश म्हणजे शून्य; शून्य म्हणजे कांहीं नाहीं. अर्थात् निद्रेच्या शून्य स्थितींतून ज्याप्रमाणें स्वप्नी पुरुष व स्वप्न ह्या सत्यत्वाला यावीं आणि त्या स्वप्नसृष्टीनें स्वप्नी पुरुषाला

व स्वप्नी पुरुषानें स्वप्नीसृष्टीला सत्यत्व द्यावें अशा प्रकारें 'अहोरूपमहोध्वनि:' हें त्या परस्परांतच चालावें, त्याप्रमाणें ज्ञानेंद्रियांतील द्रष्टा व पंचभूतात्मक दृश्य, मिळून दृश्यद्रष्टारूप सृष्टी ही ज्या एका शुद्ध परमात्म्याच्या निद्रेच्या अज्ञान शून्य स्थितींतून सत्यत्वाला आली आहे, तीच आपल्याला प्रत्यक्ष झाली आहे! अशा प्रकारची ही योगनिद्रा, जिला महामाया असें म्हणतात, त्या मायेची भ्रांती घालविण्याला परमेश्वराच्या निद्रेंतील श्वासोच्छ्वास जे वेद आणि श्रुति त्या देखील समर्थ नाहींत, तेथें बुद्धीला सूक्ष्मता आणि कुशाग्रता देणाऱ्या व्याकरण, न्याय, मीमांसादि शास्त्रांचा व प्रत्यक्ष, अनुमान, शाद्ब इत्यादि शाद्बिक प्रमाणांचा काय उपयोग होणार? ही योगनिद्रा जाऊन अध्यात्माची जागृति येण्याला केवळ सत्समागम आणि सद्गुरुकृपा हेंच एक दिव्यांजन आहे, असेंच संस्कृत व ओबडधोबड प्राकृत सर्वच वेदांतग्रंथ एकवाक्यतेनें सांगत आहेत. उभयतांत मतभेद बिलकूल नाहीं. समर्थ म्हणतात, "अध्यात्मज्ञान हें हातींचे हातीं सप्रचीत रोकडा ब्रह्मसाक्षात्कार" (दास. १७-३-३) (दास ७-८-३६) असें आहे. म्हणून प्रोफे० सा० म्हणतात तसें अमुक गोष्टी प्रत्यक्ष अनुमानानें सिद्ध होतात, अमुक गोष्टी 'बाबावाक्यं प्रमाणा'नें मानाव्या लागतात, अशा प्रकारच्या मनोभावनेच्या शास्त्रीय अनुमानांत पडण्याचें बिलकूल कारण नाहीं.

प्रोफे० सा०चें आणखी असें म्हणणें आहे कीं, " मनुष्याच्या बुद्धीला अमुक गोष्टी समजण्यासारख्या आहेत, व अमुक गोष्टी अतींद्रिय आहेत, असा स्पष्ट विषयविभाग करून दाखवून माझ्या बुद्धीला इतकें समजतें, व याच्या पलीकडच्या गोष्टी मी श्रद्धायुक्त असल्यामुळें मानतों किंवा अश्रद्धा-

वान् असल्यामुळें मानीत नाहीं, असें जें खरें खरें असेल तें स्पष्ट सांगावें. खरें सांगितल्यापासून कोणत्याहि शास्त्राची कधींहि हानि झालेली नाहीं." यावरून प्रो. सा. हे आपण अज्ञेयवादी आहोंत असें व्यक्त करतात. पण अध्यात्मज्ञान तर "**प्रत्यक्षावगमम्**" असें आहे तेथें मानवी मानभावीपणा काय कामाचा? प्रो. सा. च्या ह्मणण्याप्रमाणें "मला काय कळतें व काय कळत नाहीं," हें सांगायला कशाला पाहिजे? ज्याच्या बुद्धीला जें कळतें आणि वळतें तें तो कृतींत वठवून सांगतच असतो. "**पिंडे पिंडे मतिर्भिन्ना**" या म्हणींत आणखी हल्लींच्या मतस्वातंत्र्याच्या काळाची भर पडल्यामुळें समर्थांच्या वचनाप्रमाणें "**मतामतांचा गलबला। कोणी पुसेना कोणाला। जो जे मतीं सांपडला। तयासी तेंचि थोर**" (दास ११–२–२५) वाटतच आहे, म्हणून कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, हा जो प्रभाव दिसत आहे तो ज्याच्या बुद्धीला जितकें कळतें, त्याच्याच कृतीचा परिणाम आहे. या व्यतिरिक्त जें जें मनुष्याच्या बुद्धीला अद्याप कळूं व वळूं लागलें नाहीं आणि त्यामुळें खऱ्या गोष्टी-बद्दल कळवळा अद्याप येऊं लागला नाहीं त्या गोष्टी कोणाच्या बुद्धीला काय कळल्या अगर काय कळल्या नाहींत, किंवा जें एकाला कळलें तें दुसऱ्याला कळेलच असें नाहीं, ह्मणून त्यासाठीं या खऱ्याखोट्याचा व कळण्या न कळण्याचा निवाडा करून त्याचें शास्त्र लिहून ठेवण्याची जरूर नसून उपयोगहि होणार नाहीं. मग शास्त्राची प्रवृत्ति कां? तर ज्या गोष्टी सर्वांनाच अतींद्रिय परंतु बुध्दिग्राह्य आहेत, त्या गोष्टी बुध्दि-वानाच्या बुध्दींत उतरविण्याकरितांच शास्त्राची प्रवृत्ति आहे.

अध्यात्मज्ञान--आत्मज्ञान--हें एक अशांपैकींच अतींद्रिय परंतु बुद्धिग्राह्य असें शास्त्र आहे. माझा मी कोण हें कळणें जितकें अवश्य आहे तितकें तें शक्यहि आहे. ज्याला माझा मी कोण हें कळलें त्याला सर्व त्रिभुवनाचें ज्ञान झाल्याचें श्रेय येतें अशी श्रुति आहे. अशा प्रकारचें ज्ञान आपल्याला झालें आहे, म्हणून तुह्मीहि या मार्गाला लागा, हें सांगण्यासाठींच संतांचा अवतार असून त्यांनीं तें ' उपासनेची आण वाहून ' ( दास ६-१-२० ) सांगितलें आहे ! समर्थांनीं तर " **लटकें सांगेल तो अधम । लटकें मानील तो अधमाधम** ! " ( दास १०-८-२५ ) अशा जोरदार स्पष्टोक्तीनें सांगितलें आहे ! अशा स्पष्टोक्तीमुळें त्यांच्या ग्रंथांतून ते प्राकृत असूनहि ओज आणि तेज भरलेलें आहे ! हा प्रभाव शास्त्रांचा नसून अनुभवाचा आहे. म्हणून अशा ग्रंथांतून खरें खरें स्पष्ट स्पष्ट सांगितलें नाहीं ही शंका घेण्याचें व खरें न सांगितल्यामुळें कोणाची हानि होईल, अशी भीती बाळगण्याचें प्रो. सा. ना मुळींच कारण नाहीं. आतां जो अश्रध्दावान् असेल, ज्याला कांहींच मानावयाचें नाहीं व विचार करावयाचा नाहीं, आडमार्गानेंच जावयाचें असेल, त्याचा मुळीं हा विषयच नव्हे. अश्रध्दावानाची गति काय होते, ती भगवान् सांगतात.

> अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परंतप ।
> अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसारवर्त्मनि   गीता ९-३

ह्मणून अध्यात्मज्ञान हें श्रध्दावान् मुमुक्षूकरितांच आहे, इतर विद्वानांकरितां नाहीं. श्रद्धा ह्मणजे अंध श्रद्धा नव्हे, श्रद्धा ह्मणजे ' बाबावाक्यं प्रमाणम् ' नव्हे, श्रद्धा ह्मणजे भोळा भाव नव्हे, श्रद्धा ह्मणजे नुसताच विश्वास नव्हे, तर श्रद्धा ह्मणजे आचार्य ह्मणतात:--

**शास्त्रस्य गुरुवाक्यस्य सत्यबुद्ध्यवधारणम् ।**
**सा श्रद्धा कथिता सद्भिर्यया वस्तूपलभ्यते** " (वि. चू. २६)

यावरून सत्यबुद्धीचा जो निश्चय ती श्रद्धा होय. निश्चय हा विचाराशिवाय होत नाहीं. म्हणून, सत्यनिश्चयापर्यंत विचाराची जी वाढ ती श्रद्धा होय. अर्थात् श्रद्धा व सत्यवस्तु यांच्या दरम्यान फक्त साधनाची अपेक्षा असते. याशिवाय कोणत्याहि तऱ्हेचा संशय मिळून नसतो. किंबहुना श्रद्धा म्हणजे ज्ञानच होय. आतां श्रद्धा म्हणजे केवळ भावना असें जरी धरून चाललें तरी भावना ही अस्तिपक्षीं किंवा नास्तिपक्षींहि करतां येईल. परमेश्वर आहे अशी किंवा नाहीं अशीहि भावना करतां येईल. पण नास्तिक भावनेपेक्षां आस्तिक भावनाच परिणामीं कल्याणप्रद होत असेल तर आस्तिक श्रद्धेचाच स्वीकार कां करूं नये? बापाचें वडीलपण मानणें हीं भावना व 'बापाचे काय च्यार चव्वल लागतों?' ही पण भावनाच; परंतु आस्तिक भावनेनें वडिलांचें वडीलपण जाणून त्यांच्या आज्ञेंत राहिल्यानें जर संसार सुखाचा होऊन इहपरलोकीं कल्याण होत आहे, तर नास्तिकत्वाच्या आडमार्गांत शिरून अकल्याण करून कां घ्यावें? अध्यात्म हें मुळीं रोकड्या प्रचीतीचेंच शास्त्र आहे म्हणून तेथें आस्तिक श्रद्धाच अवश्य होय.

महाराष्ट्र भाषेंतील वेदांतपर ग्रंथांचें पर्यालोचन करून मराठी वेदांतपर ग्रंथ व त्यांचे कर्ते कसे असतात, आणि कसे असावेत याबद्दल प्रोफे० सा० नीं जें लेखरूपानें सार काढून वाचकांच्या हातीं दिलें, त्यासंबंधानें आमच्या अल्प

बुद्धीला जें बरें वाईट वाटलें तें आम्हीं स्पष्टपणें वाचकांपुढें ठेवलें आहे. आमच्या मतें मराठी वेदांतग्रंथ आणि संस्कृत वेदांतग्रंथ ही जी प्रोफे. मा. नीं विभागणी केली, ती बरोबर नाहीं. वेदांतग्रंथ, मग ते संस्कृत वा प्राकृत असोत शास्त्र या दृष्टीनें शास्त्रीपंडितांनी केलेला परोक्ष वेदांतग्रंथ आणि परमात्म्याशीं तादात्म्य झालेल्या संतांनीं स्वानुभवानें केलेला अपरोक्ष वेदांतग्रंथ, असे वेदांतपर ग्रंथांचे दोन विभाग करावयास पाहिजेत. भगवद्गीता, अवधूत गीता इ० गीता व भागवत योगवासिष्ठ, इ० हे संस्कृत ग्रंथ असूनहि स्वानुभवाचे आहेत, यामुळें त्यांत प्रमाणप्रमेयांची फारशीं चर्चा केलेली नाहीं. यथार्थदीपिकेसारखे प्राकृत वेदांतग्रंथ असूनहि ते शास्त्रीपंडितांनीं केलेले आहेत, यामुळें त्यांत अनुभूतीचा प्रकाश दिसत नाहीं. संतांनीं केलेले ग्रंथ केवळ स्वानुभवाच्या रंगांत दंग होऊन त्या भूमिकेवरून केलेले असल्यामुळें जरी ते प्रोफे० मा० सारख्या न्यायमीमांसादिशास्त्रसंपन्न मंडळीला ओबडधोबड अगर गचाळ दिसले, तरी स्वात्मानुभवी पुरुष त्यांत रंगून जातात! या रंगून जाणाऱ्या मंडळींत कांहीं विद्वान् शास्त्रीपंडितहि रमतांना आम्हीं पाहिले आहेत! स्वानुभूतीचा प्रकाश नसून केवळ न्यायमीमांसादि अलंकारांनीं मंडित झालेले ग्रंथ पाहून केवळ शास्त्रीपंडित त्यांत रमतात. वास्तविक वेदांतग्रंथवाचन हें कांहीं अध्यात्मज्ञानप्राप्तीचें मुख्य साधन नव्हे. सांप्रदाय पद्धतीचा अवलंब हें मुख्य आहे. त्याविरहित वेदांतग्रंथ आपल्याच बुद्धीनें वाचले, तर नुसता तर्कटी वाचाळपणा बोकाळतो! अध्यात्मप्राप्तीला सत्समागम आणि सद्गुरुकृपा याशिवाय दुसरें

साधन नाहीं. गुरुप्रचीतीनें आत्मप्रचीतीला जें आलें तें संतांनीं शब्दांनीं कसें वर्णिलें आहे, त्याचा पडताळा पहाण्याला अपरोक्षानुभवाचे ग्रंथ हे आरसे असून त्यांत तत्त्ववेत्त्यांनीं आपलेंच मुख आपण पहावयाचें आहे. यावरून आह्मी तर्क-व्याकरणन्यायमीमांसादि शास्त्रांची किंमत कमी समजतों असें मात्र नाहीं. ज्यांनीं या शास्त्रांत जन्मच्या जन्म घालविले आहेत, त्यांची योग्यता काय सांगावी! स्थूल शरीराला अन्नपाणी हें जीवन आहे. अर्थात् अन्नपाणी हें स्थूल शरीराचें परब्रह्मच होय, तद्वत मानससृष्टींतील व्यवहार चालण्याला शब्द हें जीवनच आहे. शब्दाच्या पोटांतच सर्व शास्त्रें गूढरूपानें भरलेलीं असून शब्दार्थाचीं पोषक द्रव्येंच हीं तर्कव्याकरणादि शास्त्रें असल्यामुळें तीं मानससृष्टींतील परब्रह्मच होत! ह्मणून या शास्त्रांची योग्यता कमी नाहीं. पण सर्व संस्कृत प्राकृत वेदांतग्रंथकारांनीं परमात्मतत्त्वबोधाच्या कामीं या शास्त्रांचा जो निषेध केला आहे, त्याचें कारण हीं शास्त्र परमात्मतत्त्वाला परोक्ष आहेत. पण मौज अशी झाली आहे कीं, हरीचें यथार्थ स्वरूप प्रतिपादन करणें याचें नांव वास्तविक 'हरिकीर्तन' असतांना हल्लीं पहावें तों संगीताचीं पदें, पेटी सुभाषितादि मनोरंजनाच्या गोष्टी हींच कीर्तनाचीं अंगें होऊन बसलीं असून हरीचें यथार्थ प्रतिपादन बाजूसच राहिलें आहे. समर्थ ह्मणतात:—

छपन्न भाषा नाना कळा। कंठ माधुर्य कोकिळा।
परी तो भक्तिमार्ग वेगळा। भक्तचि जाणती ॥ २९ ॥
श्रीहरीवांचून जे कळा। ते जाणावी अवकळा।

देव सांडून वेगळा। प्रत्यक्ष पडला ॥ ३१ ॥
करितां देवाचें दर्शन। आडवें आलें रागज्ञान।
तेथें धरूनियां मन। स्वरामार्गें लाविलें ॥ ३५ ॥
मन ठेवूनि ईश्वरीं। जो कोणी हरिकथा करी।
तोचि एक संसारीं। धन्य जाणावा ॥ ३७ ॥
(दास. १४-५)

ही जी हरिकथेची, तीच संस्कृत प्राकृत वेदांतग्रंथांची स्थिति आजकाल झाली आहे. हरिकथेंतील वक्ते आणि श्रोते हे हरीला सोडून रागज्ञानतालज्ञानांतच गर्क होतात, तर वेदांतग्रंथकर्ते व वाचक हे परमात्मस्वरूपाच्या यथार्थ प्रतिपादनानें लक्ष्य वस्तूकडे न पाहातां न्यायमीमांसातर्कव्याकरणादिकांच्या दृष्टीनेंच परोक्ष विचार करतात. पण ज्यांचा मनोधर्म अगदीं पराकाष्ठेपर्यंत, इतकेंच नव्हे तर परेच्याहि पलीकडील तत्त्वापर्यंत जाऊन उद्दीपित झाला आहे, अशा संतांच्या तोंडांतून निघालेल्या सहजोद्गारांत जर कोणतेंच हीनरसत्व भासत नाहीं असें प्रोफे० सा० कबूल करतात, हें '**सहज बोलणें हित उपदेश**' हा जर संतांच्या वाणीचा महिमा आहे, तर समर्थ म्हणतात, 'सहज सोडून सायासांत पडणें' (दास० १४-८-२५) हाहि दोषच होय. मुख्य मुद्दा हा कीं, प्रोफे० सा० हे काव्य या दृष्टीनें संतांच्या वेदांताकडे पहातात. पण काव्यगुण तर त्यांत दिसत नाहीं, व लोकांत तर ते ग्रंथ पूज्य मानले जातात! मग तर्कशास्त्रानें प्रोफे० सा० अनुमान काढतात, कीं भिंती चालवणें इ० चमत्काराच्या साधुत्वावर हे अकाव्य ग्रंथ विकले जातात! आह्मीं म्हणतों, या संतांच्या

अपरोक्ष ग्रंथांकडे न्यायमीमांसादिकांच्या दृष्टीनें पाहूं नका, तर अनुभवाच्या दृष्टीनें संतांच्या स्वयंस्फूर्तीच्या सहज निघालेल्या वाणींत ओज आणि तेज कसें आहे तें स्वरूपानुभव घेऊन मग पहा! शास्त्रें हीं मुळीं परोक्ष आहेत. जेथें प्रत्यक्षता नाहीं, तेथेंच तर्क चालवावा लागतो. प्रत्यक्षता नाहीं तेथेंच न्यायाधीश नेमून न्याय करावा लागतो आणि मीमांसा तरी अप्रत्यक्षतेची; प्रमाणप्रमेयें व जहदाजहदादि लक्षणा तरी त्याकरितांच. शास्त्रालंकारांनीं शृंगारलेले ग्रंथ हे मनोरंजनार्थ होत आणि संतांचे ग्रंथ हे स्वात्मानुभव देणारे असल्यामुळें भवरोग दूर करण्याला त्रैलोक्यचिंतामणीची मात्राच होत! संतांचे ग्रंथ हे अनुभवाच्या भूमिकेवरून लिहिलेले आहेत, असे उल्लेख त्यांच्या ग्रंथांतून स्पष्ट केलेले आहेत. ज्ञानेश्वरांनीं तर जागजागीं श्रोत्यांना जागं करून सांगितलें आहे कीं, निवृत्तिसद्गुरूंनीं जो अनुभव दिला तो मी आपल्यापुढें मांडीत आहें! समर्थ दासबोधाच्या आरंभीं ह्मणतात, 'नाना ग्रंथांच्या संमति। उपनिषदें वेदश्रुति। आणि मुख्य आत्मप्रचीती। शास्त्रेंसहित' दास १-१-१५ अशा आधारावर मी हा ग्रंथ केला आहे! अशा तऱ्हेचे उद्गार सर्व संतांच्या ग्रंथांतून आहेत आणि त्यांच्या त्या प्रतिपादनावरूनहि ते उद्गार खरेच ठरतात. अपरोक्षज्ञानाच्या वेदांतग्रंथांपैकीं संस्कृत ग्रंथापेक्षां दासबोध, ज्ञानेश्वरी, विवेकसिंधु आदि प्राकृत ग्रंथांत विशेष हा आहे कीं, प्राकृत ग्रंथ हे प्रो० सा० च्याहि मताप्रमाणें बोलूनचालून प्रतिज्ञापूर्वक स्त्रीशूद्रादिकांतील मुमुक्षूंना वेदांततत्त्व सहज रीतीनें कळावें, अशा दृष्टीनें लिहिलेले असल्यामुळें व संस्कृताची अडचण राहूं

नेय म्हणून संस्कृतांतील ज्ञानभांडार मराठी साधुकवींनीं अशा कांहीं कुशलतेनें, काव्यरसिकतेनें, आपल्या अनुभवाच्या स्वतंत्र विचारानें, आणि सर्वांना समजण्याला सुलभ अशा रीतीनें, प्राकृतांत आणलें आहे कीं वाहवारे वाहवा ! प्राकृत ग्रंथ म्हणजे केवळ उघडें परब्रह्मच साधुसंतांच्या ग्रंथरूपानें अवतरलें आहे कीं काय, असें तज्ज्ञ वाचकांस वाटतें ! अशा प्रकारचीं कित्येक स्थळें दाखवितांहि येतील, परंतु आधींच वाचक या विषयाला कंटाळले असतील, म्हणून आम्हांला विस्तार करतां येत नाहीं. संस्कृत ग्रंथ केवळ संस्कृतज्ञांकरितांच असल्यामुळें त्यांत इतकी स्पष्टता नसते. तथापि आचार्यादि संतांनींहि संस्कृतांत अविद्वानांना उघड कळण्यासारखी फारच स्पष्टता केली असून संस्कृत भाषा फार सोपी, सर्वांना कळावी अशीच घातली आहे. यावरून मुमूक्षूंविषयीं त्यांची कळकळ दिसून येते.

मराठी साधुकवींच्या साधुत्वाबद्दलहि प्रोफे० सा० ची गैरसमज झालेली दिसते. साधुत्व हें ईश्वरीय आहे, तसें कवित्व देखील ईश्वरी देणगी आहे. पण साधुत्वाची इतिकर्तव्यता भिंती चालवण्यांत आणि रेडा बोलवण्यांत नाहीं. हे चमत्कार जसे प्राकृत साधूंनीं तसेच आचार्यादि संस्कृतज्ञांनींहि केले आहेत. पण चमत्कार करणें ही कांहीं साधुत्वाची कसोटी खचित नव्हे. तसें असेल तर सर्व गारुडी, हिप्नॉटिझमचा खेळ करणारे, मनकवडे इ० हे सर्व साधुच झाले असते ! कित्येक संत ऋद्धिसिद्धींचा केवळ प्रसंगानुसार उपयोग करीत असतात. बाकी पर-

मार्थांच्या कामास प्रोफे० सा० नीं ईश्वरीय मानलेले चमत्कार हे विघ्नच असल्यामुळें ज्ञानेश्वरादि संत त्यांचा निषेधच करीत असत हें प्रो० सा० नां माहीत नाहीं. हे चमत्कार अज्ञ जनांवर छाप बसविण्याकरितां नसून दुष्टांचा दुष्टपणा व विद्वानांचा गर्वपरिहार करण्यासाठीं संत त्यांचा उपयोग करीत असतात. वामनाच्या विद्वत्तेचा गर्वपरिहार करण्यासाठीं समर्थांनी रुद्रावतार धारण केला, ज्ञानोबांनीं चांगदेवाचा गर्वपरिहार करून त्याला चमत्कारांपासून पराङ्मुख केलें. कान्हू पाठकाची अशीच कथा आहे. समर्थांनीं तर जनस्वभाव प्रकरणांत या चमत्कार करणाऱ्या गोसाव्यांचा चांगलाच समाचार घेतला आहे! दासबोधांतहि चमत्कारावर कोरडा ओढलाच आहे!

निरूपणीं सामर्थ्यसिद्धि । श्रवण होतां दुराशा बाधी ।
नानाचमत्कारें बुद्धि । डळमळूं लागे ३३
सिद्धि आणि सामर्थ्य जाहालें । तेणें देहास महत्व आलें ।
पुढें बेचाड बळावलें । देहबुद्धीचें ४०
होतां शरीराचा अंत । सामर्थ्यहि निघूनि जात ।
शेखीं अंतरला भगवंत । कामनागुणें ४३
(दास. ५--२)

अशा रीतीनें मराठी साधूंनीं या चमत्कारांचा निषेधच केला आहे. तें कशाला? दगडाच्या मूर्तीला जेऊं घालणारे व देवळें फिरविणारे खुद्द नामदेव हे या चमत्कारांबद्दल काय म्हणतात पहा:—

प्रस्तराचा देव बोलत भक्तांतें । सांगते ऐकते मूर्ख दोघे ॥ १ ॥

ऐशांचें माहात्म्य जे कां वर्णितातीं । आणि म्हणविती तेणें भक्त ॥२॥
परंतु ते नर पामर जाणावे । त्यांचे नायकावे बोल कानीं ॥ ३ ॥

यावरून अध्यात्मज्ञानाच्या साधुत्वाची इतिकर्तव्यता चमत्कारांत नसून समर्थ म्हणतात ' **मुख्य निःसंदेहपणेंचि सिद्ध बोलिजे** ' ( दास.५-१०-४० ) म्हणजे निःसंदेह होऊन जो परमात्मरूप झाला, तोच्च खरा साधु, तोच खरा भक्त, आणि तोच खरा मुक्त होय. जो स्वरूपीं स्वरूपाकार झाला, अर्थात् जो विभक्त नव्हे तो भक्त. म्हणून मराठी साधुकवींच्या साधुत्वाबद्दल व भक्तीबद्दल प्रोफे० सा० नीं जो आपला भलताच ग्रह करून घेतला आहे व भक्तीची टवाळी केली आहे ती चुकीची असून खऱ्या भक्तीचा हा उघड उघड अनादर व उपमर्द होय !

विद्वद्वर्य शिवराम महादेव परांजपे, एम्, ए, यांच्या लेखांची ही दुसरी बाजू आह्मी यथामति वाचकांपुढें मांडली आहे. तथापि त्यामुळें वेदांतपरग्रंथ न्यायमीमांसादि शास्त्रांनीं युक्त केवळ मनोरंजनार्थ काव्य या दृष्टीनें कसा असावा याबद्दल प्रोफे. सा. नीं जें सर्वोत्कृष्ट विवेचन केलें आहे, त्याची किंमत यत्किंचितही कमी होत नाहीं. कोणत्याहि गोष्टींचा दोन्ही बाजूंनीं विचार करून हंसक्षीरन्यायानें निवाडा करून सार ग्रहण करण्याचें काम सज्जन वाचकांचें आहे. प्रवृत्तींतील एका गृहस्थानें ' अ ' च्या एका बऱ्या वाईट कृत्याचें वर्णन देऊन शेवटीं सार काढलें कीं, ' अमुक कृत्य ' अ ' नें केलें नसतें, तर असा प्रसंग आला नसता. तें कृत्य ' अ ' नें केलें हो त्यानें मोठी चूक केली. ' दुसऱ्या एका निवृत्तिपंथांतील गृहस्थानें ' अ '

च्या त्याच कृत्याचें वर्णन देऊन अभिप्राय दिला कीं, ' होणाराप्रमाणें बुद्धि होते, **जें जें होणें ज्या ज्या वेळीं। तें तें न चुके कदा काळीं।** म्हणून ' अ ' ला या कामांत कोणत्याहि तऱ्हेनें दोष देतां येत नाहीं. ' एकानें कर्तृत्वाच्या दृष्टीनें ' अ ' कडे पाहिल्यामुळें त्याला सर्व दोष दिसले, तर दुसऱ्यानें होष्यमाणाच्या दृष्टीनें पाहिल्यामुळें त्याला तेंच कृत्य निर्दोष दिसलें. पण एवढ्यावरून कर्तृत्वाच्या दृष्टीनें पहिल्या गृहस्थानें जें वर्णन केलें, त्याची किंमत कमी होते असें बिलकूल नाहीं. तद्वत् प्रोफे० सा० च्या विद्वत्ताप्रचुर लेखाची किंमत आधुनिक विद्वानांत कमी होणें शक्यच नाहीं. आपल्या जीवनाचें खरें ध्येय काय आहे, हें ज्याला वेदांतपरग्रंथांवरून भिक्षुवृत्तीनें जाणून परमार्थ साधावयाचा आहे, त्यानें साधुकवींच्या काव्यांकडे कावेबाजपणाच्या काव्यानें पहावें अगर ज्ञानयुक्त भक्तीच्या प्रेमानें पहावें आणि तें पहात असतांना विनोदाची अगर आडपडद्याची भाषा वापरावी कीं नाहीं, आणि तशी ती प्रोफे० सा० नीं वापरली आहे कीं काय, हा विचार अगदीं बाजूला ठेवून प्रो० सा० च्या लेखाकडे पाहिलें तर तो लेख गद्य काव्य या दृष्टीनें फारच चटकदार वठला आहे, यांत संशय नाहीं! विद्वानांचें सहज बोलणें सुद्धां विद्वत्ताप्रचुर आणि विनयशील असतें, मग जेथें संस्कृत, इंग्रजी, मराठी वेदांतपर ग्रंथांचें सूक्ष्म परिशीलन कुशाग्रतोत्पादक दृष्टीनें व बुद्धीनें करून जो लेख प्रोफे० सा० नीं न्यायमीमांसातर्कादिकांनीं युक्त लिहिला आहे, तेथें तो सर्वोत्कृष्ट वठेल यांत नवल तें

काय ! शिवाय प्रो० सा० च्या टीकारूप काव्यदृष्टीच्या जात्यांत कित्येक चांगले मराठी साधु व ग्रंथ ' सकट घोडे बारा टक्के ' या न्यायानें ' इंद्राय तक्षकाय स्वाहा ' म्हणून भरडले गेले असले, तरी श्रीकृष्णानें लाक्षागृहाच्या आगींतून प्रियभक्त पांडवांना बाहेर काढावें, त्याप्रमाणेंच समाजांनीं पूज्य मानलेल्या श्रीज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव या मूर्ति मोठ्या चतुरतेनें प्रो० सा० नीं त्या भरडण्यांतून वगळून दाखवून लोकांना खुषींत ठेवलें आहे ! ही प्रोफे० सा० ची धूर्तता अवर्णनीय आहे ! तसेंच मराठी कवींच्या एकेकट्या अभंग ओव्या इ० काव्यांतील भक्तिरसाची प्रोफे० सा० नीं स्तुति करून आदरच व्यक्त केला आहे यावरून या साधुमूर्तींबद्दल तरी प्रोफे० सा० च्या अंतःकरणांत पूज्यबुद्धि वसत असावी, असें म्हणावें लागतें. तसेंच प्रोफे० सा० नीं वेदांतपर ग्रंथ कसे असावेत ह्याची दिशा दाखवितांना जागजागीं जे कित्येक उद्गार काढले आहेत, ते निःसंशय फार मननीय व माननीय आहेत. विस्तारभयास्तव त्या अनेक उद्गारांपैकीं एकच उद्गार येथें देतों:—

" श्रीज्ञानेश्वरमहाराज किंवा श्रीतुकाराममहाराज यांच्यासारख्यांनीं निरनिराळ्या प्रसंगांच्या ओघानें निरनिराळे उद्गार काढलेले आहेत, ते एकत्र करून त्यांच्या वचनांत कोठें विरोध असतील तर त्यांची एकवाक्यता करून ब्रह्म, माया, जगदुत्पत्ति, जीवात्मा, मोक्ष इत्यादि अनेक विषयांसंबंधानें त्यांच्या मतांचा निष्कर्ष काय निघतो याविषयीं संगतवार आणि पद्धतशीर असे ग्रंथ तयार झाले, तर ते फार

महत्त्वाचे होतील, व तसले वेदांतावरील निश्चयात्मक ग्रंथ महाराष्ट्र वाङ्मयाला आज पाहिजे आहेत. अध्यात्म-विषयक प्रश्न पुष्कळ आहेत आणि बिकटहि आहेत. त्यांचीं समाधानकारक उत्तरें कळावीं, अशी पुष्कळांची उत्कट इच्छा आहे."

यावरून प्रोफे. सा. ची परमार्थतत्त्व कळून घेण्या-बद्दल किती उत्सुकता आहे हें उघड दिसून येतें. अगाध विद्वत्ता असून परमार्थाकडे प्रवृत्ति होणें, हा योग अपूर्व असून तें ईश्वरी देणें आहे असे समर्थांनीं एके ठिकाणी ( दास. १४–५–४ ) उद्गार काढले आहेत. देव करो ! आणि प्रोफे. सा. ची, तशीच महाराष्ट्रीयांची ही उत्कट इच्छा शुक्लेन्दुवत् वृद्धिंगत होवो, अशी परमेश्वरापाशीं आमची विनंति आहे ! ज्या वेळीं कोणत्याहि गोष्टीची उणीव भासून तिची उत्कट इच्छा लोकांत पराकाष्ठेची वाढते, त्याच वेळीं अवतारी पुरुष उत्पन्न होऊन ते मुमुक्षुजनांच्या त्या उणीवा दूर करून उत्कट इच्छा तृप्त करीत असतात. वेदोपनिषदांतील विरोधांची एकवाक्यता करण्याला आचार्यांसारखे अवतारी पुरुषच योग्य होत, व श्रीज्ञानेश्वर अगर श्रीतुकाराममहाराज यांसारख्या संतांच्या वाणींतील विरोधी भासणाऱ्या वचनांची एकवाक्यता करून ब्रह्म, माया, जगदुत्पत्ति, जीवात्मा, मोक्ष इत्यादिकांचा निष्कर्ष काढण्याला ज्ञानदेव, तुकाराम यांच्या सारखेच सत्पुरुष निर्माण झाले पाहिजेत. आणि महाराष्ट्राच्या या उत्कट इच्छेनें ते लवकर निर्माण होतीलच होतील !

तथापि जशा प्रकारचा वेदांतग्रंथ प्रोफे. सा. च्या मतें

आजकाल महाराष्ट्राला पाहिजे आहे, तशा तऱ्हेचा ग्रंथ प्रस्तुतच्या आधुनिक कालाला अनुसरून तयार करण्याला आजकाल असलेल्या विद्वान् मंडळींत कोण लायक आहेत असा प्रश्न कोणीं केल्यास आम्ही प्रोफे० सा० कडेच प्रथम बोट दाखवूं! प्रोफे० सा० कडून अशा प्रकारचा ग्रंथ निर्माण होणें सृष्टिक्रमामध्यें अलबत् शक्य असल्या-चीं सुचिन्हेंहि पण दिसत आहेत, ही आनंदाची गोष्ट होय! विद्वत्ता आणि भक्ति या दोन नद्यांच्या ग्रंथरूप प्रीतिसंगमावर या जीवानें परिशीलनाचें स्नान व बुद्धीचें सर्वस्व दान करून आपल्या जीवनाचें ध्येय काय, आपण येथें आलों कां, पुढें जावयाचें कोठें, आपण करावयाचें काय इत्यादि सर्व गोष्टींचा यथास्थित विचार करून या भवसागरांतून तरून जावें, ही जी विद्वद्वर्य प्रो० सा. ची उत्कट इच्छा; तिलाच मुमुक्षुत्व असें म्हणतात, आणि ती प्रो. साहेबांच्या हातून लवकरच ग्रंथ निर्माण करील, अशी आशा आहे. अनुकूलतेनुरूप मुमुक्षु हा जप, योग, भजन, पूजन सत्कर्म इत्यादिकांनीं परमेश्वराला आळवीत असतो. विद्वान् मुमुक्षूंनीं परमात्म्याच्या यथार्थतेच्या वर्ण-नाचा ग्रंथ करून परमेश्वराला आळविणें, हें अशांपैकींच एक साधन आहे. ज्याच्याकडून जशा प्रकारचा ग्रंथ पुढें यावयाचा असतो, त्याच्या अंतःकरणांत तशाप्रकारचे विचार प्रथम घोळत असतात. प्रो. सा. च्या अंतःकरणांत अशा-प्रकारचे विचार फार दिवस घोळत असलेच पाहिजेत, असें त्यांच्या लेखांवरून स्पष्ट दिसतें, आणि ते विचार आम्हांसारख्या अविद्वान्रूपी दरिद्रयाच्या 'उत्पद्यन्ते विलीयन्ते'

अशा मनोरथांसारखे नसून विद्वत्तेच्या श्रीमंतींतील असल्या-मुळें ते विचार अंत:करणांतच जिरून जाणारे नाहींत. अंत:करण हें एक ग्रंथोत्पत्तीचें गर्भाशयच होय. प्रो. सा. च्या अंत:करणरूप गर्भाशयांत वेदांताच्या उत्कृष्ट अशा उच्च विचारांच्या रूपानें गर्भधारण करून जें बालक उचंबळ्या खात आहे व गुंडेपणानें गडबड करीत आहे, त्यामुळेंच **चित्रमय जगत्** सारख्या मासिकांत श्रद्धा, मराठी वेदांत-ग्रंथांचें पर्यालोचन, एक वेदांतविषयक गोष्ट, अशा प्रकारचे एखाद्या मराठी साधुकवीप्रमाणें वेदांतपर त्रोटक आणि स्फुटवजा चुटके प्रो० सा० हे अलीकडे लिहीत असतात. हे वेदांतपरग्रंथ निर्मितीचे प्रो० सा० स डोहाळे होत असल्याचें सुचिन्ह व्यक्त करीत आहेत! त्या सुविचारांची संगतवार, पद्धतशीर आणि आटोपसर अशी एकत्र ग्रंथि होऊन ग्रंथरूपानें तिची प्रसूति होऊन प्रो० सा० चें पोट मोकळें झाल्याशिवाय त्यांना व महाराष्ट्राला समाधानाला दुसरा मार्गच नाहीं! ग्रंथोत्पत्तीला विद्वत्ता, ज्ञान, भक्ति आणि वैराग्य, यांचा संगम लागतो, आणि विद्वत्ता ही पर-मार्थाकडे धांव घेऊं लागली तर भक्तीला व वैराग्याला तेव्हांच प्रसवते! प्रो० सा० नीं इंग्रजी, संस्कृत, मराठी या तिन्ही भाषेंतील वेदांतग्रंथांचें विचारपूर्वक परिशीलन केलें आहे व न्यायमीमांसा--तर्कव्याकरणादि शास्त्रांचाहि त्यांस चांगलाच व्यासंग आहे, ही दुधांत साखरच होय! यामुळें त्यांनां त्रिखंडपंडित हें नांव दिल्यास वावगें होणार नाहीं!

विद्वत्तेची तर त्यांच्यांत उणीव नाहीं, निराशेचें वैराग्य तर

त्यांना प्राप्त झालेंच आहे! आतां भक्तीची अनुकूलता पाहिली तर भक्तीची पूर्वस्थिति श्रद्धा होय. जो गुण अंगीं भिनून जातो तोच इंद्रियांच्या द्वारें बाहेर पडत असतो. यास अनुसरूनच प्रो० सा० नीं श्रद्धेवर विद्वत्ताप्रचुर असा लेख **चित्रमय जगत्** च्या नवंबर १९१३ च्या अंकांत नुकताच प्रसिद्ध केलेला सर्वांनीं वाचला असेलच. श्रद्धेचा अतिरेक भक्ति होय. म्हणून तिनेंहि श्रद्धेच्या मागून प्रो० सा० ना माळ घातलीच पाहिजे, आणि प्रस्तुतच्या लेखांत प्रो० सा० नीं दांडग्या व तुफानी परंतु वत्सलता व शांतीयुक्त अशा भक्तीचें जें सर्वोत्कृष्ट वर्णन प्रथम दिलें आहे, त्यावरून त्यांना खऱ्या भक्तीची बरीचशी कल्पना झाली आहे, यांत संशय नाहीं! मात्र प्रो. सा. ची साधुत्वाची व्याख्या जी अद्याप भिंती चालविणें, रेडा बोलवणें यांतच घुटमळत आहे, तसेंच खऱ्या भक्तीचे विचार अंतःकरणाच्या पवित्रतेपासून ते अश्रू ढाळून रोमांच उभे करण्याच्या दरम्यानच घोंटाळत आहेत, आणि प्रो. सा. च्या अध्यात्मविचाराचा सूर अंतःकरणपंचक, प्राणपंचक, ज्ञानेंद्रियपंचक, कर्मेंद्रियपंचक व विषयपंचक या पांच पंचकांच्या प्रपंचांतील अगदीं शेवटच्या म्हणजे खालच्या विषयपंचकांत बसूनच अगम्य व अज्ञेयत्वाच्या खर्ज्यांत चालला आहे, पण प्रपंचाहून पलीकडच्या पराकाष्ठेच्या, इतकेंच नव्हें तर परेच्याहि परल्या अत्युच्च शिखरावर चढून तेथून या नश्वर जगाकडे पहात पहात खरें साधुत्व, भक्ति आणि अध्यात्म यांच्या एकतानतेमध्यें प्रो. सा. चा सूर उच्च अशा परमात्म्याशीं तन्मयतेच्या षड्ज्यांत चालूं लागेल, तर तो परमात्म्याच्या खऱ्या स्वरूपांत

तल्लीन होऊन फारच फार बहार करील यांत संशय नाहीं ! तशा एकतानतेंतून जी फारच अप्रतिम ग्रंथरूप चीज बाहेर पडेल ती स्पष्टोक्तीनें वेदांतांतील गडबडगुंडा काढून टाकून प्रो. सा. चें स्वतःचें व महाराष्ट्राचें मन तल्लीन करून सोडील यांत शंका नाहीं ! अशाप्रकारें प्रा. सा. ची विद्वत्ता ही श्रद्धाभक्तिसमन्वित झाल्यावर ती काय एक करणार नाहीं ! प्रो. सा हे हल्लीं स्वस्थचित्त झाले असल्यामुळें रिकामपणाची फुरसत नाहीं असें त्यांना म्हणतांच येत नाहीं. प्रो. सा. हे सार्वजनिक हितेच्छु असल्यामुळें 'सोशी जगाचे आघात' हें जें संतांचें अनेक लक्षणांपैकीं एक लक्षण, तेंहि त्यांच्या आंगीं आहेच. होणारा ग्रंथ टीकारूपच असणार व टीकाविषयक लेखाला प्रो. सा. चा हातखंडा आहेच ! सारांश, एवंगुणविशेषणविशिष्ट अशा प्रो. सा. च्या श्रद्धाभक्तिसमन्वित विद्वत्तेच्या त्रिवेणीसंगमाचा प्रवाह वेदांतग्रंथरूपानें सर्व महाराष्ट्रभर लवकरच पसरून महाराष्ट्रीयांस त्यांत निमज्जन करावयास सांपडेल यांत संशय नाहीं ! आणि मराठी वेदांतग्रंथ कसा असावा, याबद्दलचा त्यांचा प्रस्तुतचा लेख ही त्यांच्या हातून होणाऱ्या भावी ग्रंथाची प्रस्तावनाच होय ! आतां प्रो. सा. कडून हा ग्रंथ होण्याला एकच अवधि आहे तो हा कीं, प्रत्यक्ष भगवान् सुद्धां धांवा केल्याशिवाय कोण्या भक्ताकडे धांवून जात नाहींत म्हणून प्रो. सा. नांहि ग्रंथ निर्माण करण्याबद्दल सर्व महाराष्ट्रीयांनीं प्रार्थना केली पाहिजे. आणि ती आम्ही सर्व महाराष्ट्रीयांच्या वतीनें मोठ्या नम्रतेनें आणि प्रेमानें करीत आहोंत, त्याला कोणी विरुद्ध असतील असें

वाटत नाहीं. प्रो. सा. या प्रेमाच्या विनंतीचा अनादर करतील असेंहि वाटत नाहीं. म्हणून आम्ही प्रो. सा. नां हात जोडून नम्रतेनें प्रार्थना करतों कीं, महाराज !

विद्वत्केसरि ! बध्यतां परिकरो वेदांतग्रंथोत्तमम् ।
निर्मातुं, जनताहि तिष्ठति भवच्छब्दामृतौघोत्सुका ! ॥१॥
तथास्तु ! तथास्तु ! ! तथास्तु ! ! !

आतां प्रो. सा. च्या विद्वत्ताप्रचुर लेखांवर आम्ही टीकेचें अकांडतांडव अगर कोल्हेकुई करून जें यथेच्छ तोंडसुख घेतलें, त्याबद्दल प्रो. सा. ची माफी मागणें अवश्य आहे. आमच्या या टीकेसंबंधानें बहुतांचीं बहुत मतें कानावर येतात. कित्येकांचें म्हणणें आम्हांसारख्या अप्रबुद्धांनीं जो मार्ग बरासा वाटेल त्या मार्गानें जावें, उगाच थोरामोठ्या विद्वानांच्या उठाठेवी करून लहान्या तोंडीं मोठा घांस घेणें हवें कशाला ? कित्येकांचें म्हणणें हंसक्षीरन्यायानें सार ग्रहण करून स्वस्थ चित्तानें हरिस्मरण करीत रहावें, आम्हांसारख्यांनीं वादांग वाढविणें विहित नव्हे. कित्येक म्हणतात कीं, सर्वांचें प्रेम विघडूं न देतांना जें आपल्या मनाला योग्य दिसेल तें स्पष्टपणें सज्जनांच्या पुढें ठेवून तत्संबंधीं खरें सार सज्जनांकडून ऐकून घेण्याला लाजूं नये, व आहारीं व्यवहारीं सख्या बापाची सुद्धां भीड धरूं नये ! अशीं बहुतांचीं बहुत मतें आहेत आणि ज्याच्या त्याच्या परीं तीं बरोबरहि आहेत. हे सर्व आक्षेप लेख लिहिण्यापूर्वीं आमच्यापुढें येऊन दत्त उभे राहिलें होते व त्यामुळें आमची लेखणी कांकूं करीत होतीच. पण शेवटीं दुराग्र-

हानें आमच्यावर पमडा बसवून हें आमच्या हातून कृत्य घडविलें त्याला नाइलाज झाला ! याबद्दल प्रोफे. सा. ची आम्ही सपशेल माफी मागतों ! प्रत्येक जीव हा स्वांगानें परिपूर्ण असल्यामुळें जितक्या प्रकृति तितक्या सर्व नारायणाच्या मूर्तिच असून विद्वान् मूर्ति तर प्रत्यक्ष विष्णूचाच अवतार म्हणूनच '**विद्वान् सर्वत्र पूज्यते**' म्हणतात. विद्वत्तेची जननी सरस्वति, तिचा पिता ब्रह्मदेव, त्याचा पिता विष्णु. म्हणून विष्णुरूप जे विद्वान् त्यांचें म्हणणें शिरसावंद्य मानावयाचें असतांनां त्यावर उलट टीका आम्ही करणें योग्य नाहीं. पण इतका सर्व उमज असूनहि टीकेची स्फूर्ति प्रबल झाली, त्याला कारण संस्कृत प्राकृत संतांच्या संबंधानें आमच्या अंतःकरणांत लहानपणापासून वसत असलेली पूज्यबुद्धि होय. ज्या मायबाप संतांनीं पैसा, लौकिक मिळविण्याकरितां नव्हे, तर आम्हां पामरांच्या उद्धारार्थ वेदोपनिषदांतील सर्व संस्कृत ज्ञानभांडार अगदीं सोप्या प्राकृतांत आणलें, अर्थात् जे वेदोपनिषदांचा स्पष्ट हेतु व अर्थ 'प्रकट करणारे, म्हणून वदावतारीच होत, जे आपल्या वचनतेजानें मुमुक्षूंना जागें करितात, ज्यांच्या केवळ स्मरणानेंच आम्हांला परमार्थाची स्फूर्ति होते, एवंच, परमार्थरूप जीवींचें जविन, म्हणून देवांहूनहि श्रेष्ठ जे संत, त्यांची व त्यांच्या ग्रंथांची सामान्यांत गणना करून कवि व काव्याच्या कसोटीशीं त्यांना घांसून त्यांवर बरी वाईट टीका करणें व तीहि आमच्यांतीलच श्रद्धाळू व आस्तिकपणा दाखविणाऱ्या विद्वानांनीं करणें हें आमच्या मनाला फार कडू लागतें ! तशांत आडपड्यानें छद्मी

गोळी घालणें तर फारच घातक होय! व तसा प्रकार प्रोफे सा. च्या लेखांत झालेला आहे अशी आमची समजूत होऊन आमचें मन या टीकेला प्रवृत्त झालें! श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, '**जैशी आपुली जननी। नग्न दाविलिया जनीं। ते तीर्थचि परी पतनीं। कारण होय!**' (ज्ञाने १६-२१८) तद्वत् कवि व काव्य या दृष्टीनें संतांकडे पाहून त्यांच्यावर कुत्सित टीका करणें अप्रशस्त होय! ही आमची समजूत भोळवट, चुकीची किंवा स्वतंत्रतेच्या सुधारलेल्या काळानुरूप मूर्खपणाचीहि असेल, परंतु ती आहे खरी व प्रोफे. सा च्या विद्वत्ताप्रचुर लेखाबद्दल असा आमचा समज झाला आहे खरा. तो समज जर चुकीचा आहे असें आम्हांला कोणी दाखवील तर फार आनंद होईल व आम्हांला कृतकर्माबद्दल पश्चात्तापहि होईल! या संतांच्या प्रेमाच्या वेडांत अज्ञानपणानें प्रो. सा. च्या विद्वत्ताप्रचुर लेखाचा विपर्यास आमच्या हातून होणें जितकें शक्य आहे, तितकेंच तें प्रेमाच्या वेडांतील असल्यामुळें क्षम्यहि आहे. आम्ही अविद्वत्तेच्या जोरावर मुद्दा सोडून वहावत जाणें शक्य असल्यामुळें त्यांत मजकूर चर्वितचर्वण, कंटाळवाणी भाषा इ. चुका होणें स्वाभाविक आहे. तसेंच प्रो. सा. च्या विद्वत्ताप्रचुर मुद्यांचें खंडण करण्याला न्यायमीमांसातर्कव्याकरणादिकांचें आमच्याजवळ भोपळ्याएवढें पूज्य, अर्थात विद्वत्तेच्या मनगटाचा जोर आम्हांला नाहींच. तेव्हां 'शेषं कोपेन पूरयेत्' या अशास्त्र शस्त्रास्त्राशिवाय आमच्याजवळ दुसरें काय असणार? अर्थात् एखाद्या मुद्याच्या खंडणाला 'शेषं कोपेन पूरयेत्' चा आम्ही उपयोग केला असेल.

या वेडाच्या प्रेमांत "**मर्मवाक्यमपिनोच्चरणीयम्**" याचें आम्हांस भान न राहून मर्मभेदक कटु शद्बांचाहि आमच्याकडून उपयोग झाला असेल, आमची योग्यता नसतांना ह्या अव्यापारेषु व्यापार करून विद्वान् प्रो. सा. शीं आम्ही जास्त लगट केली असेल, अशा अनेक चुका आमच्या हातून झाल्या असतील त्या सर्वापराधांबद्दल प्रो. सा. ची त्रिवार क्षमा मागतों ! आणि मराठी साधुकवींवर नसली, तरी आमचेवर प्रो. सा. हे क्षमा करतील यांत संशय नाहीं. आम्ही प्रो. सा. विरुद्ध किती जरी कडक टीका केली, तरी त्यांच्या विद्वत्तेबद्दलची पूज्यबुद्धि व ते आपल्या महाराष्ट्रांतीलच विद्वान् आहेत याबद्दलचें प्रेम आमच्या अंतःकरणांतून यत्किंचितहि ढळलेलें नाहीं ! इतकें सांगून प्रो. सा. ची आम्ही रजा घेतों. आतां प्रिय वाचकांनींहि आमचें हें चऱ्हाट बंद करण्याबद्दल मुमुक्षुकारांस पत्रें न पाठवितां स्वस्थ चित्तानें ऐकून घेतलें, याबद्दल वाचकांचे, आणि विद्वान मुमुक्षुकारांनीं विद्वानाच्या लेखावरील टीकेकरितां अविद्वानाला जागा दिली याबद्दल त्यांचेहि आभार मानून अंतर्धान पावतों !

**बोला ! संस्कृत प्राकृत सब संतनकी जय !!**

ॐ तत् सत् !!!

समाप्त.

# महाराष्ट्र भाषेंतील वेदान्तपर ग्रंथ लिहिण्याच्या पद्धतींचें पर्यालोचन.

वेदान्त हा विषय फार महत्त्वाचा आहे. त्या विषयाची अपेक्षा प्रत्येक मनुष्याला अतिशय असते. आपल्या जीवनाचें ध्येय काय, हें मनुष्याला या वेदान्तशास्त्राच्या प्रमेयांवरून ठरवितां येतें. आपण येथें आलों कां, आणि आपल्याला पुढें जावयाचें आहे कोठें, या दुर्ज्ञेय गोष्टीचें यथार्थ ज्ञान होण्यावरच जन्म आणि मरण यांच्या दरम्यानचा मनुष्याचा व्यवहार बरोबर रीतीनें नियमित करतां येण्यासारखा असतो. मागे झालें काय, आणि पुढें व्हावयाचें आहे काय, याच्या धोरणावरच मध्यंतरींच्या अवकाशांत आपण करावयाचें काय. याचा निश्चय ठरवावयाचा असतो. सारांश, आपला जो सर्व व्यवहार पुढच्या पारमार्थिक उपयोगासाठीं असतो, तो वेदान्ताच्या कल्पनांवर अवलंबून असतो. इहजन्मींचा व्यवहार चुकला, तर तो पुढील पारमार्थिक हिताचा नाश करतो; व परमार्थाच्या कल्पना चुकीच्या झालेल्या असल्या, तर त्या चुकीच्या कल्पनांवर चालणाऱ्या मनुष्याचा सर्व ऐहिक व्यवहार व्यर्थ होतो. याकरितां—स्वार्थाकरितां आणि परमार्थाकरितांहि— वेदान्तशास्त्राचा विचार अत्यंत अवश्यक आहे. हा विचार अनेक विद्वान् लोक अनादिकालापासून करीत आलेले आहेत व त्यांच्या विचारांचा फायदा त्यांच्या पाठीमागून आलेल्या आपल्यासारख्या लोकांना करून घेतां येण्यासारखा

आहे. संस्कृतमध्यें या विषयावर अनेक उपयुक्त ग्रंथ झालेले आहेत व त्यांच्या अनुरोधानें आणि स्वतंत्र स्फूर्तीनें महाराष्ट्र भाषेमध्येंहि अनेक ग्रंथ झालेले आहेत व होत आहेत.

परमार्थासंबंधानें कोणीहि ग्रंथकार ग्रंथ लिहावयाला प्रवृत्त झाला, तर त्या ग्रंथांत आपल्याला कोणकोणते विषय आणावयाचे आहेत, ते कोणत्या क्रमानें एकापुढें एक मांडावे, त्यांचा प्रारंभ कोठून करावा, आणि विषयाच्या महत्त्वाप्रमाणें व काठिण्याप्रमाणें त्यांचा क्रम चढवीत नेऊन अखेरीस आपल्या प्रतिपाद्य विषयाची परिसमाप्ति कोणत्या अत्यंत इष्ट अशा आपल्या अंतिम ध्येयामध्यें करावी, या गोष्टींचा विचार ठरवून नंतर मग तो अनुबंधचतुष्टयाच्या नियमानुसारानें ग्रंथरचना करण्याला प्रारंभ करितो. वेदांत हा विषय आधींच गहन आणि दुर्बोध आहे; त्याच्या प्रतिपादनांत जितकी स्वच्छता असेल, त्या मानानें वाचणाराचें मन संशयादिक मलांपासून स्वच्छ होतें. नाहीं तर विषय घोंटाळ्याचा आणि पद्धतीही चक्रव्यूहाची, अशी स्थिति झाली, तर संशयाच्या चक्रव्यूहांतून मनोरूपी अभिमन्यूला बाहेर पडण्याची मुळींच आशा नको. वेदांत विषयावर संस्कृतमध्यें पुष्कळ ग्रंथ आहेत आणि त्यांतील भावार्थ आणि मुख्यार्थ घेऊन मराठीमध्येंही पुष्कळ ग्रंथ लिहिले गेलेले आहेत. परंतु संस्कृतांतील वेदांतग्रंथ व मराठींतील वेदांतग्रंथ यांच्या रचनेच्या पद्धतमिध्यें पुष्कळ अंतर आहे. आणि त्या अंतरास कारणेंही आहेत. संस्कृतांतील वेदांताचे लेखक हे बहुधा महान् पंडित होते. व्याकरण, न्याय, पूर्वमीमांसा, इत्यादि बुद्धीला सूक्ष्मता आणि कुशाग्रता देणाऱ्या शास्त्रांमध्यें पारंगत झाल्यानंतरच ते पंडित उत्तरमीमांसेवरील ग्रंथ लिहिण्याला प्रवृत्त होत असत. न्याय आणि पूर्वमीमांसा हीं आपल्यामधील शास्त्रें अशीं आहेत

कीं, त्यांचे संस्कार ज्या मनावर एकदां झाले, तें मन सदोदित नियमित पद्धतीचाच अंगीकार करील, व त्या मनाला न्यायसिद्ध मार्ग सोडून अणुरेणुभरही इकडे तिकडे कोणीं गेलेलें सहन व्हावयाचें नाहीं. रस्ते आंखून घेऊन तेवढ्यांतच अगदीं नियमित मर्यादेमध्यें ग्रंथाचे विषय यावयाचे आणि त्यांचें प्रतिपादन व्हावयाचें, अशी संस्कृत लेखकांची पद्धत असे. एखादा शब्द कमी अगर जास्ती होऊं द्यावयाचा नाहीं, किंवा एखाद्या भलत्याच विषयाला दुसऱ्या चालू विषयाच्या खिडकीमधून उगीच डोकावूं द्यावयाचें नाहीं, अशाबद्दल ते फार दक्षता ठेवीत असत. संस्कृतमधील मूळ ग्रंथांवर टीका लिहिण्याचा पुष्कळ प्रघात आहे. असल्या टीकाग्रंथांतील टीकाकार मूळ टीकाविषयक ग्रंथामध्यें अव्यवस्था आढळल्यास, कोठें पूर्वापार प्रतिपादनाचा संबंध जुळत नसल्यास, कोठें लिहिण्याचा हेतु स्पष्ट कळत नसल्यास, अगर आणखी काहीं मूळामध्यें संदिग्धता असल्यास, त्या सर्व गोष्टींच्या स्पष्टीकरणासाठीं आणि उद्घाटनासाठीं कसे धडपडत असतात, आणि कशा कल्पना लढवून मूळ लेखकाच्या लेखाची सुसंगतता संस्थापित आणि स्थिर करण्याचा प्रयत्न करीत असतात, हें ज्यांना माहीत आहे, त्यांना, संस्कृतांतील पूर्वींच्या लोकांच्या मनामध्यें न्यायमीमांसादिकांच्या सर्वत्र अवश्यक अशा नियमांना अनुसरून विषयप्रतिपादन पद्धतशीर आणि मुद्देसूद असण्याविषयीं किती कळकळ वसत असे, हें सांगावयाला पाहिजे आहे, असें नाहीं. या कारणानें संस्कृतांतील वेदान्तग्रंथांमधील विषयविवेचनाच्या बाबतींत अव्यवस्था, असंबद्धता किंवा अस्ताव्यस्तपणा, हे दोष क्वचितच आढळतात. परंतु संस्कृतमधून मराठीमध्यें वेदान्तांतील विषय प्रतिपादिले जाऊं लागले, तेव्हां

ही स्थिति अगदीं बदलून गेली. जसजसे मराठी भाषेमध्यें ग्रंथ निर्माण होऊं लागले, तसतशी संस्कृत भाषा आणि तिच्यांतील सद्गुण साहजिकपणेंच मागें पडूं लागले. संस्कृत ग्रंथ हे विद्वानांकरितां होते, तर मराठींतील ग्रंथ हे बोलून चालून प्रतिज्ञापूर्वक स्त्रीशूद्रादिक जे अल्प बुद्धीचे लोक त्यांच्याकरितां होते. विद्वानांनीं विद्वानांकरितां लिहिलेले ग्रंथ आणि विद्वानांनीं व अविद्वानांनीं अविद्वानांकरितां लिहिलेले ग्रंथ यांच्या पद्धतीमध्यें साहजिकपणें अंतर पडलेंच पाहिजे. मराठी भाषेमध्यें जे नवीन लेखक झाले, त्यांनीं मराठी भाषेचें महत्त्व वर्णन करणें हें स्वाभाविकच होतें, आणि तसें करतांना कित्येक ठिकाणीं कित्येकांचे हातून संस्कृत भाषेचा त्या मानानें अगौरव आणि उपमर्द होणें हेंही स्वाभाविकच होतें. अशा रीतीनें संस्कृताला गौणत्व येऊं लागलें, आणि त्याबरोबरच संस्कृत वाणींतील गुणही हळूहळू मराठी भाषेच्या क्षितिजावरून लोप पावूं लागले. शिवाय संस्कृत भाषेंतील टापटिपीचें आणि पद्धतशीरपणाचें मराठीमध्यें अनुकरण करण्याचीही कोणाला फारशी इच्छा होती, असें नाहीं. संस्कृतमधील साधारण गोळा बेरीज घेऊन ती मराठी भाषेमध्यें आपल्या श्रोत्यांपुढें मांडावयाची, याच्या पलीकडची इच्छा असलेली कोठें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. ज्यांच्या योगानें विषयाच्या प्रतिपादनाला व्यवस्थितपणा आणि पद्धतशीरपणा प्राप्त होतो, अशीं जीं उपरिनिर्दिष्ट न्यायमीमांसादिक शास्त्रें, त्यांच्याबद्दल अभिरुचि, आदर किंवा अध्ययन, यांची कोणाला अवश्यकता तर वाटत नव्हतीच पण उलट या सद्ग्रंथनिर्मितीच्या मित्रांबद्दल तुच्छता आणि तिरस्कार मात्र कित्येक प्रसंगीं मोठ्या फुशारकीनें व्यक्त केलेले आढळतात. वेदाध्ययनापासून तों थेट शास्त्राध्ययनापर्यंत सर्व काहीं निरुप-

योगी आहे, असलीं विधानें एका प्रकारच्या आवेशामध्यें केलेलीं मराठी कवींच्या काव्यांतून शोधूं गेल्यास थोडीं थोडकीं आढ-ळतील, असें नाहीं. हीं विधानें त्यांनीं जरी वेदान्तच्या एका विशिष्ट आणि श्रेष्ठ भूमिकेवर बसून केलेलीं होतीं, तरी त्यांच्या तोंडच्या त्या विधानांचा आपल्या व्यवहारावर आणि वाङ्मयावर परिणाम झाल्याशिवाय राहिलेला नाहीं. हा जो विद्यादेवीचा उघड उघड अनादर आणि उपमर्द मराठी लोकांनीं चालविलेला होता, त्याचा परिणाम त्यांच्या ग्रंथांवर दिसून येतो.

जुन्या मराठीमध्यें जे मोठमोठे लेखक झाले आहेत, त्यांच्या अंगामध्यें एक प्रकारचा मोठा दांडगा गुण होता. तो गुण भक्ति हा होय. भक्तीचा गुण त्यांच्या रोमरोमामध्यें भरला होता, त्यांच्या आचरणांत भक्ति भरलेली होती. त्यांच्या तोंडांतून प्रेमळ काव्याच्या रूपानें भक्ति बाहेर पडत होती. व त्यांच्या डोळ्यां-तून भक्तीचे प्रेमाश्रु गळत होते. या भक्तीच्या बळाच्या जोगवर पूर्वीचे मराठी साधु कवि जशी लौकिक प्रपंचांत तशीच काव्य-विषयक प्रपंचामध्येंही कशाची पर्वा बाळगीत नसत. त्यांच्या अंतःकरणामधून भक्तीच्या अतिरेकाचा प्रवाह इतक्या तुफानी वेगानें वहात असे कीं, तो आपल्या वाटेंत येणाऱ्या लहान मोठ्या सर्व नियमांच्या झाडांझुडपांना पार खणून नेत असे. अशा रीतीनें जरी व्यवहाराच्या आणि वाङ्मयाच्या निबंधनांना भक्ति धाब्यावर बसवीत असे, तरी त्या भक्तीनें युक्त अशा त्या पूर्वीच्या भगवद्भ-क्तांच्या कृत्यांमध्यें किंवा काव्यांमध्यें रसहानि बहुधा होत नसे. व तसें होण्याचें काहीं कारणही नव्हतें. कां कीं, काव्याच्या प्रदेशापुरतें बोलावयाचें म्हणजे अलंकारशास्त्रामध्यें जसे शृंगार, वीर, करुण, हास्य, इत्यादि रस सांगितले आहेत, तसाच

वत्सलता, शांति इत्यादि स्थायिभावमूलक असा भक्ति हाही एक रस बहुतेक साहित्यशास्त्रकारांनीं स्वीकारलेला आहे. तेव्हां तो रस ज्यांत परिपूर्णपणें भरलेला आहे, तें काव्य. काव्य या दृष्टीनें उत्कृष्ट झालेंच पाहिजे. जेव्हां कोणत्याही मनोविकाराची तार अगदीं वरच्या व शेवटच्या सप्तकांतील उच्च सुरामध्यें वाजत असेल, जेव्हां कोणताही एखादा मनोधर्म अगदीं पराकाष्ठेपर्यंत उद्दीपित झालेला असेल, तेव्हां तशा स्थितीतील मनुष्याच्या तोंडांतून जे जे उद्गार निघतील, ते ते एक उत्कृष्ट काव्यच झालें पाहिजे. अशी जर सामान्य मनोविकारांच्या सामर्थ्याची स्थिति आहे, तर मग जेथें नामसंकीर्तनाची एकाग्रता, जेथें नारद, वाल्मीकि, शुक, उद्धव, इत्यादिकांसारख्यांचे परमपवित्र उपदेश, आणि जेथें प्रत्यक्ष भगवंताच्या सगुणस्वरूपाचें दर्शन, त्या भक्तिरसाच्या प्रचंड प्रवाहामध्यें कोणत्या रसाची उणीव भासणार आहे? आणि कोणतें काव्य हीनरस होणार आहे? सामान्य लेखकही असल्या विषयाच्या वर्णनामध्यें वरिष्ठ प्रतीचा कवि म्हणून भासावयाचा; मग प्रतिभादेवीचा मूर्तिमंत अवतार ज्ञानेश्वर, प्रेमळपणाचा मूर्तिमंत अवतार नामदेव, आणि कडकडीत वैराग्याचा मूर्तिमंत अवतार तुकाराम यांच्यासारख्या कवींच्या काव्यांच्या उत्कृष्टपणाची योग्यता काय वर्णन करावी? हा भागवतधर्मांतील भक्तिपंथ महाराष्ट्र भाषेंत प्रथमतः ग्रंथरूपानें श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं प्रचलित केला; व त्यांचे पाठीमागून त्या पंथामध्यें अनेक साधु आणि कवि झाले. केव्हांहि झालें तरी कवित्वापेक्षां साधुत्वाची योग्यता अर्थातच जास्त असावयाची. तेव्हां या भक्तिपंथामध्यें जे अनेक लोक झाले, त्यांच्यापैकीं जे अलौकिक प्रकारचे साधु होते, त्यांच्या

साधुत्वाला जनता जास्त मान देत असे. त्यांच्या ... गुणावगुणाकडे कोणी फारसें लक्ष देत नसे. तुकाराम महाराजांनीं एका प्रसंगासंबंधानें बोलतांना " परस्त्रीचे ठायीं जा... नपुंसक त्याचे अंगा राख असो नसो ॥ " इत्यादि ... ज्या प्रकारचें वर्णन केलें आहे, त्या प्रकारचें अनुकरण करून बोलावयाचें झाल्यास ज्यांच्या अंगामध्यें उत्कृष्ट साधुत्व बाणलेलें आहे, " त्यांच्या काव्यीं गुण असो नसो " अशाच प्रकारची त्यांच्या संबंधाची लोकांची भावना असे. व अशी भावना असणें हें अगदीं स्वाभाविकही आहे. कारण, साधुत्व हें ईश्वरीय आहे, आणि कवित्व हें मानवीय आहे. साधुत्व हें परलोकोपयोगी आहे, आणि कवित्व हें केवळ ऐहिक आहे. असा फरक असल्यामुळें कवित्वापेक्षां साधुत्व हें लोकांना जास्त पूज्य होत होतें, यांत कांहीं विशेष नाहीं. जे भिंतींना चालवीत होते आणि रेड्यांना बोलवीत होते; जे दगडी देवांच्या तोंडांत घांस भरवीत होते आणि दगडी देवळांचीं तोंडें फिरवीत होते; जे मेलेलीं माणसें जिवंत करीत होते, आणि जिवंत माणसांना उद्धरीत होते; ज्यांच्या अभंगांच्या वह्या पाण्यांतहि भिजत नव्हत्या आणि ज्यांचा देह विमानांतून वैकुंठास जात होता; अशी ज्यांच्या साधुत्वाबद्दल लोकांची दृढभावना, त्यांच्या ओव्यांतील आणि अभंगांतील गुणदोषांसंबंधानें कोण पर्वा करीत बसणार ? या सृष्टींतील अद्भुत सामर्थ्यांच्या पुढें मनुष्यांचे किरकोळ कल्पनांचे विचार नेहमींच दिपून आणि लोपून जातात! परंतु महाराष्ट्र भाषेमध्यें कित्येक जे चांगले साधु झाले, तेच चांगले कविहि जसे झाले, तसेच

जर सगळे झाले असते, तर तें ठीक झालें असतें. परंतु सृष्टिक्रमामध्यें सदोदित असें होणें शक्य नाहीं. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, असल्या विभूति कांहीं फारशा स्वस्त नसतात. सृष्टिकर्त्याच्या दुकानामध्येंही असलीं रत्नें बेताबाताचींच शिल्लक असतात. त्यामुळें महाराष्ट्रांत पुढें पुढें असें होऊं लागलें कीं, या भक्तिपंथामध्यें साधुत्वाच्या आणि कवित्वाच्या अशा दोन्हीहि बाबतींमध्यें कमी कमी दर्जाचे लोक उत्पन्न होऊं लागले. तरी पण सामान्यजनसमूह अज्ञानावस्थेंत असल्या कारणानें व त्याच्यामध्यें परीक्षकपणा आणि चिकित्सकपणा फारसा जागृत झालेला नसल्या कारणानें एखादा अगदीं सामान्य आणि रेम्याडोक्या हरिभक्तिपरायण असला, तरी तो प्रत्यक्ष ज्ञानेश्वर किंवा तुकाराममहाराज आहे अशी त्या ढोंगी लोकाबद्दल भोळे लोक आपली भावना करून घेत आणि त्यामुळें त्यांच्या साधुत्वाविषयीं वाजवीपेक्षां जास्त अशी भलतीच कल्पना झाल्याकारणानें त्यांच्या काव्यांतील गुणदोषांकडे दुर्लक्ष्य होऊन त्यांच्या अगदीं टाकाऊ ओव्यांनाही साधुवाक्यांचा मान मिळूं लागला. आणि अशा रीतीनें मराठी भाषेच्या सराफकट्यामध्यें वाईट माल चांगल्या भावानें खपूं लागला. आपण साधु होऊन कविता करूं लागलों, म्हणजे मग आपल्या अंगामध्यें फारशी विद्वत्ता नसली, तरी आपल्या कवितेचें कांहीं अडावयाचें नाहीं, व आपण त्यांत वाटेल तें दडपून दिलें, किंवा प्रमाणांचा अभाव असतांहि प्रमेयाची सिद्धि झाल्याचें ठासून सांगितलें, किंवा कसलाही गचाळ आणि गाबाळ ग्रंथ कंटाळवाणा होईपर्यंत भाराभर लिहिला, तरी त्याला वाईट म्हणण्याची कोणाची छाती होणार नाहीं; अशी कल्पना स्वाभाविकपणें त्या वेळच्या खालच्या

दर्जाच्या असाधु कवींच्या मनामध्यें उत्पन्न होऊं लागली. अंगीं विद्वत्ता नसेल, तर साधुपणाचा आविर्भाव आणावा आणि देवाच्या नांवाखालीं काहीं तरी संबद्ध किंवा असंबद्ध, विश्वसनीय किंवा अविश्वसनीय, अशा गोष्टी लिहून काढाव्या, आणि त्याला कोणीं नांवें ठेवूं लागल्यास हा दुष्ट आहे, छलक आहे, निंदक आहे, नास्तिक आहे, देवाचा द्रोह करणारा आहे आणि भक्तीचा विरोध करणारा आहे, अशा प्रकारचा उलट त्यालाच शह द्यावा, अशी युक्ति अमलांत येऊं लागली. आणि ह्या युक्तीच्या संरक्षणाच्या छत्राखालीं ढोंगी साधुत्व आणि वाईट कवित्व यांचा अभ्युदय मोठ्या झपाट्यानें झाला. पूर्वीच्या ज्ञानेश्वरादिकांसारख्या मोठमोठ्या साधुकवींनीं एका विवक्षित भूमिकेवरून विद्वत्तेला जें गौणत्व दिलेलें होतें, तें या पुढील हलक्या दर्जाच्या मंडळींनीं सरसकट प्रस्थापित करून, खरी भक्ति---किंवा खरी भक्ति नसल्यास तिच्या ऐवजीं ढोंगीं भक्ति---असली म्हणजे विद्वत्तेची आपल्याला काहीं एक अपेक्षा नाहीं, अशा प्रकारच्या एका हानिकारक मन:स्थितीपर्यंत त्यांनीं मजल आणून ठेविली. विद्वत्तेसंबंधानें अशी परिस्थिति झाल्यावर, मग विद्वत्तेच्या अंगांपैकीं व्याकरण न्याय मीमांसा, इत्यादि कुशाग्रतोत्पादक शास्त्रांच्या अध्ययनाची अपेक्षा कोण बाळगणार ? आणि या नियामक शास्त्रांच्या राजसत्तेच्या संस्काराचा दाब नसल्यामुळें जिकडे तिकडे स्वाभाविकपणेंच अंदाधुंदी आणि बेबंदशाही सुरू झाली. शिवाय अशा स्थितीमध्यें जे विषय विवेचनाकरितां या मंडळीकडून घेतले जात असत, तेही हलके सलके नसून ईश्वर, माया, पुरुष, प्रकृति, अहंकार, गुणत्रय,

पंचभूतें, पंचीकरण, जगदुत्पत्ति, जीव, जन्ममरण. पुनर्जन्म, कर्म, मोक्ष, अशांसारखे अत्यंत बिकट आणि अत्यंत अज्ञेय असे असावयाचे! जे साधु म्हणून मिरवावयाचे, त्यांनीं असल्या गहन विषयांचीच निवडणूक केली पाहिजे, हें उघडच आहे! हे विषय मूळचेच कठिण, आणि त्यांतून ते लिहिण्यामध्यें व्यवस्थितपणा नसला, म्हणजे तर घोंटाळा चक्रवाढव्याजाच्या दरानें वाढत जावयाचा! शिवाय एकदां जें कोणीं लिहिलेलें असेल, त्याचेंच चर्वितचर्वण पुढच्या ग्रंथांमधून चाललेलें असावयाचें! त्यांत कोणी नवीन शंका काढील, किंवा नवीन समाधान सांगेल, असें सहसा व्हावयाचें नाहीं. आणि ओंवी वगैरे सारख्या कोणत्यातरी छंदांमधून हें घोंटाळ्याचें विवेचन चाललें असल्यामुळें या छंदाच्या निर्बंधानें त्या घोंटाळ्यामध्यें उलट जास्तच भर पडत असे. आणखीही एक घोंटाळ्याचें कारण असें झालें कीं, मूळचे मराठींतील चांगले लेखक हे थेट संस्कृतांतील ज्ञानाच्या झऱ्यावर आपलें पाणी भरून घेत असत; परंतु पुढील मंडळीमध्यें मराठीच्या अभिमानाची आणि संस्कृताच्या उपमर्दाची विशेष गोडी असल्यामुळें, मूळ संस्कृताविषयीं अज्ञानी असलेल्या या मंडळीला आपली तहान दुसऱ्यांनीं मराठीच्या भांड्यांत भरून ठेवलेल्या सांचवणीच्या पाण्यावर भागवून घ्यावी लागत असे. त्यामुळेंही विषयामध्यें संदिग्धता जास्त राहूं लागली. विषय दुर्ज्ञेय, ग्रंथ घोंटाळ्याचे आणि लोक अज्ञानी, अशा या गुणत्रयाच्या——अथवा दुर्गुणत्रयाच्या——संमेलनापासून आणखीही एका गोष्टीची उत्पत्ति झाली. ती अशी कीं, गुरु आणि शिष्य ह्यांचें बंड विशेष जोरानें माजूं लागलें. जेथें ग्रंथांचीं विवेचनपद्धति स्फटिकासारखी शुद्ध आहे, आणि जेथें

ते ग्रंथ वाचून समजण्याइतकी बौद्धिक शक्ति वाचकांच्या मनामध्यें आहे तेथें गुरुशिष्यभावाच्या स्तोमाची अपेक्षा तरी काय आहे? जें ग्रंथांत लिहितां यावयाचें नाहीं, तेवढेंच कानांत सांगण्याकरितां कदाचित् गुरूंची गरज शिल्लक राहील. परंतु एवढ्यापुरतेच गुरु ठेवावयाचे आणि बाकीचें काम ग्रंथांनीं भागावयाचें, इतकी ज्या समाजाची बौद्धिक उन्नति आणि उत्क्रांति झालेली आहे, त्या समाजामध्यें ढोंगी गुरूंची आणि मूर्ख शिष्यांची लोकसंख्या साहजिकपणेंच पुष्कळ कमी होईल. जुन्या संस्कृत वाङ्मयाचें परीक्षण केलें असतां त्यांत या गुरुशिष्यांचा स्तोत्रें कोठें फारशीं--निदान मराठींतल्या इतकीं--- आढळत नाहींत. लोक ग्रंथ वाचीत असत, आणि त्यांतील भावार्थ समजून लक्ष्यांत घेत असत. प्रत्येक साध्या गोष्टीसाठीं त्यांना कानमंत्राची जरूरी लागत नव्हती. परंतु अशिक्षित समाज ही कान फुंकणाऱ्या रूंच्या पिकांची एक फार सुपीक जमीन आहे. आणि त्याचा अनुभव आपल्याकडे पदोपदीं आलेला आहे.

अशा रीतीनें विद्वत्ता आणि भक्ति यांची फारकत झाली. पूर्वींचे संस्कृतांतील वेदान्ताचे लेखक हे फारसे भक्त नव्हते, आणि अलीकडचे मराठींतील वेदान्ताचे लेखक हे फारसे विद्वान् नव्हते. आणि येथें असाही एक प्रश्न उत्पन्न होतो कीं, शास्त्र या दृष्टीनें वेदान्ताचें विवेचन करण्याला कोणाची अवश्यकता आहे? विद्वत्तेची कीं भक्तीची? वेदान्तविषयाच्या यथास्थित प्रतिपादनामध्यें नुसती भक्ति काय करणार? या शास्त्रांत विषय कोणकोणते यावेत, त्यांचा क्रम कसा असावा, त्यांतील प्रमेयें प्रमाणांनीं कशीं सिद्ध करावीं, तीं सुलभ रीतीनें समजून देण्याकरितां मार्मिक ग्रंथकारानें काय योजना

करावी, इत्यादि गोष्टींच्या कामांत भक्तीचा काय उपयोग होणार? भक्तीनें अंतःकरण पवित्र होईल, नेत्र अश्रूंनीं ओले होतील, कंठ सद्गदीत होईल, आणि सर्वांग रोमांचित होईल; परंतु याच्या पलीकडे ग्रंथलेखनाच्या कामांत भक्तीच्या हातून दुसरें काय व्हावयाचें आहे? ग्रंथलेखनांत विद्वत्ता हेंच प्रधान अंग आहे. तें असून भक्ति असेल, तर विशेष चांगलें. पण भक्ति नसली, तरी विद्वत्तेचें ग्रंथलेखनाचें काम अडून राहील, असें मात्र नाहीं. उलट विद्वत्तेचें साहाय्य नसलें, तर मात्र एकट्या भक्तीचें ग्रंथलेखनाचें काम फारसें चांगलें होईल, असें नाहीं. याचीं उदाहरणें मराठीं वाङ्मयांतील उत्तरकालीन काहीं भारुड ग्रंथांमधून चांगलीं दिसून येतात. वेदान्त शास्त्राचे आद्य प्रतिपादक श्रीमत् शंकराचार्य हे काहीं भक्तकोटी-मध्यें प्रामुख्येंकरून पडण्यासारखे नव्हते.. याच्या उलट महाराष्ट्रभाषेचे आणि त्या भाषेंतील वेदान्ताचे आद्य प्रति-पादक श्रीमत् शंकराचार्य--जे श्रीज्ञानेश्वर महाराज—ते विद्वान्-ही होते व भक्तही होते. त्यामुळें त्यांच्या ग्रंथांमध्यें विद्वत्तेचें जि-तकें कार्य व्हावयाचें तितकें सगळें होऊन शिवाय त्यामध्यें भक्तीचा प्रेमळपणाही उत्पन्न झालेला आहे. परंतु हें विद्वत्तेचें आणि भक्तीचें प्रमाण पुढें पुढें चुकत चाललें. विद्वत्ता कमी होत चालली, आणि ढोंगी भक्तीचें प्रमाण जास्त वाढूं लागलें. याचे एकंदर परिणाम वेदान्तविषक ग्रंथलेखनावर काय झाले, हें वर सांगितलेंच आहे. विद्वत्ता ही कठीण आणि भक्ति ही सोपी. सज्ञान समाजामध्यें विद्वत्ताप्रेरित ग्रंथांचा प्रसार होतो, आणि जनसमूह अशिक्षित झाला असतां त्यामध्यें भक्तिप्रचुर ग्रंथांचें प्राबल्य वाढतें. जसा खटपटीचा आणि सज्ञानपणाच्या अवश्यक-

तेचा कर्ममार्ग मागें पडला. आणि सोपा व अडाणीपणामध्येंही समजण्याला शक्य असा भक्तिपंथ पुढें सरसावला. त्याचप्रमाणें विद्वत्तेचा वेदांत मागें पडला आणि भक्तीचें तट्टू अशिक्षित समाजामध्यें पुढें दामटलें गेलें. समाजाच्या अशिक्षितपणाच्या अवस्थेचें आणखीही एक चिन्ह आहे. सुशिक्षित समाजाला प्रमाणबद्ध विस्तृत ग्रंथ झेंपतात. परंतु ज्यांच्या मनाची ज्ञानग्रहण-शक्ति फारशी परिपक्वतेला पोंचलेली नसते, अशा समाजाला आणि त्यांतील लोकांना लहान लहान काव्यें, स्फुट कविता, चुटके, उपाख्यानें, त्रोटक ओंव्या किंवा परस्परांशीं फारसे संबद्ध नाहींत असे अभंग, अशा जातीचेंच वाङ्मय पसंत पडतें. व तसलेंच वाङ्मय इतर विषयांवरच्या वाङ्मयाप्रमाणें वेदान्त-विषयावरही पूर्वीं प्रसिद्ध होत होतें.

परंतु हल्लींची स्थिति बदललेली आहे. हल्लींच्या काळांत दोन तीन शतकांच्या पूर्वींच्या ग्रंथ लिहिण्याच्या पद्धतींत फेर-फार करणें अवश्यक आहे. वेदान्त विवेचनासारख्या विष-याला पद्यरचनेपेक्षां गद्यरचना जास्त चांगली, ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. व यासंबंधानें आतां कोणाला सूचना देण्याचेंही कारण उरलें नाहीं. कां कीं, हल्लीं 'तूं आपला वेदान्तविषयावरील ग्रंथ ओंव्यांमध्यें किंवा अभंगामध्यें लिही,' असें मुद्दाम आग्रहानें सांगितलें, तरीही कोणी ऐकणार नाहीं ! तसेंच वेदांतांतील तुटक तुटक विषयांवर त्रोटक चुटके लिहिण्याची ही पद्धत सोडून दिली पाहिजे. तसेंच कोठला तरी एखादा अभंग किंवा कोणती तरी एखादी ओंवी घेऊन तिचा आधार दाखवून आपला सिद्धांत स्थापित करावा, ही पद्धतीही फारशी चांगली नाहीं. कारण एक अभंग जर एका अर्थाचा

मिळाला, तर दुसरा अभंग त्याच्या अगदीं उलट अर्थाचा दाखवून देतां येण्यासारखा असतो. त्यामुळें खऱ्या सिद्धांताचा निश्चय ठरणें कठीण होतें. वेदांमध्यें आणि उपनिषदांमध्यें कित्येक ठिकाणीं अशींच परस्परविरोधी अनेक वाक्यें सांपडतात. परंतु आचार्यांसारख्या संस्कृतांतील ग्रंथकारांनीं त्या वाक्यांची चिकित्सापूर्वक मीमांसा करून त्यांच्या संबंधानें एकेकदां सिद्धांत ठरवून ठेविलेले आहेत. तसें मराठींत झालेलें नाहीं. वस्तुतः तसे प्रयत्न मराठींतील श्रेष्ठ साधुकवींच्या संबंधानें व्हावयाला पाहिजे आहेत. श्रीज्ञानेश्वरमहाराज किंवा श्रीतुकाराममहाराज, यांच्या सारख्यांनीं निरनिराळ्या प्रसंगांच्या ओघानें निरनिराळे उद्‌गार काढिलेले आहेत; ते एकत्र करून त्यांच्या वचनांत कोठें विरोध असतील, तर त्यांची एकवाक्यता करून ब्रह्म, माया, जगदुत्पत्ति, जीवात्मा, मोक्ष, इत्यादि अनेक विषयांसंबंधानें त्यांच्या मतांचा निष्कर्ष काय निघतो यांविषयीं संगतवार आणि पद्धतशीर असे ग्रंथ तयार झाले तर ते फार महत्त्वाचे होतील. व तसले वेदान्तावरील निश्चयात्मक ग्रंथ महाराष्ट्र वाङ्मयाला आज पाहिजे आहेत. अध्यात्मविषयक प्रश्न पुष्कळ आहेत, आणि बिकटही आहेत. व त्यांचीं समाधानकारक उत्तरें आपल्याला कळावीं अशी पुष्कळांची उत्कट इच्छाही आहे. ही इच्छा पद्धतशीरपणानें आणि ममांसामूलक विवेचनानें तृप्त होण्याचीं साधनें उत्पन्न होतील तर त्यांचें प्रेमपूर्वक स्वागत कोणता चिकित्सक वाचक करणार नाहीं? परंतु तीं साधनें पद्धतशीर आणि मीमांसामूलक मात्र असलीं पाहिजेत. उगाच घोंटाळा आणि गडबडगुंडा असतां कामा नये. आपल्यांत

आणि विशेषतः आपल्यामधील वेदांतांत गडबडगुंडा आधींच पुष्कळ झालेला आहे. त्यांत नवीन ग्रंथकारांनीं आणखी जास्त भर घातली नाहीं, म्हणून त्यांच्यावर कोणीही रागावणार नाहीं. नवीन ग्रंथ जो करावयाचा, तो लोकांचें मन घोंटाळ्यांत घालण्यासाठीं नाहीं, तर त्यांतून काढण्यासाठीं होय, ही गोष्ट विशेषतः वेदान्तग्रंथ लिहितांना प्रत्येकानें आपल्या डोळ्यांपुढें ठेवणें अत्यंत अवश्यक आहे. शास्त्र हें काहीं कोणाच्या घरचें नाहीं. मनुष्याच्या बुद्धीच्या आकलनशक्तीप्रमाणें प्रत्येकाच्या बुद्धीला जितकें काहीं नवीन सुचेल, तितकी त्यांत भर घालून तें वृद्धिगत करावयाचें, अशी वृत्ति नेहमीं शास्त्रांच्या संबंधानें असावी. म्हणजे साहजिकपणेंच त्या शास्त्रांमध्यें प्रामाणिकपणा उत्पन्न होत जातो. जें प्रमाणांनीं सिद्ध करतां येण्यासारखें असेल तें प्रमाणांनीं सिद्ध करून दाखवावें; व जें नसेल, तें प्रमाणांनीं सिद्ध करतां येत नाही, म्हणून स्पष्ट सांगावें. मनुष्याच्या बुद्धीला समजण्यासारख्या अमुक गोष्टी आहेत, आणि त्यांच्या पलीकडच्या गोष्टी अतींद्रिय आहेत, असा स्पष्ट विषय विभाग करून दाखवावा. अमुक गोष्टी प्रत्यक्ष व अनुमान या प्रमाणांनीं सिद्ध होतात, व अमुक गोष्टी शब्द प्रमाणाच्या भिस्तीवर मान्य कराव्या लागतात, असें उघड उघड बोलावें. होतां होईल तों शब्द प्रमाणावर अतिभार टाकूं नये. माझ्या बुद्धीला इतकें इतकें समजतें व याच्या पलीकडील गोष्टी मी श्रद्धायुक्त असल्यामुळें मानतों, किंवा अश्रद्धावान् असल्यामुळें मानीत नाहीं, असें जें खरें खरें असेल, तें स्पष्ट सांगावें. खरें सांगण्या-

पासून कोणत्याही शास्त्राची कधींही हानि झालेली नाहीं. उलट दांभिकपणापासून शास्त्राच्या प्रगतीचें नुकसान झालेलें आहे. ईश्वर आणि मनुष्य, परमात्मा आणि जीवात्मा, यांच्या परस्परसंबंधांचें विवेचन सामान्यतः या अध्यात्मशास्त्रामध्यें येत असल्याकारणानें, सर्व मनुष्यांना ज्या गोष्टी साधारण असतील, त्याच गोष्टी सिद्धांत म्हणून घेतल्या जाव्यात. आणि म्हणून एकाद्या विवक्षित लोकांमधील शाब्दप्रमाण दुसऱ्या लोकांच्या शाब्दप्रमाणाशीं विरोधी असेल, तर अन्य प्रमाणांनी निर्णय होईपर्यंत आपल्याच शाब्दप्रमाणांचा आग्रह आणि अभिमान धरणें व दुसऱ्यांचा अधिक्षेप करणें, इत्यादि गोष्टी शास्त्रीय विवेचनामध्यें ज्या अगदी गैर मानिलेल्या आहेत, त्यांचा आपण होतां होईल तों बिलकूल अवलंब करूं नये. अशा पद्धतीनें स्वतंत्र रीतीनें वेदांतावर ग्रंथ लिहिले, किंवा ज्ञानेश्वर, तुकाराम, यांच्यासारख्यांच्या ग्रंथांमधून त्यांच्या मतांचा निष्कर्ष काढून तो व्यवस्थित रीतीनें लोकांपुढें मांडला, तर त्यापासून आपल्या समाजाचा खरोखर पुष्कळ फायदा होईल.

( प्रो॰ शि॰ म॰ परांजपेकृत साहित्य संग्रह भाग २ रा पृष्ठ १२८ ते १२९. )

REFBK-0003030

मराठी ग्रंथ ... क्र. 3030